ISSN 2230 - 7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

* वर्ष - २८ वे * अंक १२ वा * एप्रिल २०११ ते मार्च २०१२ * किंमत : रु. ५०/-

मुंबईतील बालकामगार : एक विश्लेषण
- डॉ. कल्पना देवकर

महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता आणि शेत मजुरांचे स्थलांतर : कोल्हापूर जिल्ह्यातील अभ्यास - डॉ. बालाजी केंद्रे

मानवी हक्क : जारवा आदिवासी स्त्रिया
- प्रा. मंदा वाघ

शिक्षण : दहशतवादाच्या परिहाराचे एक साधन
- डॉ. स्मृति भोसले

ग्रामीण मातंग स्त्री: एक सामाजिक वर्जित समूह
- डॉ. विजय सूर्यवंशी, डॉ. रामचंद्र भिसे

डॉ. अनुराधा भोईटे - काही आठवणी....
डॉ. स्मिता अवचार

वसाहतवाद आणि असमानतेचे तत्त्व
- डॉ. राहुल हजारे, डॉ. दिलीप खैरनार

७८ वर्षांपूर्वीची मराठवाड्यातील ब्राह्मणेत्तर चळवळ ...
- प्रा. अशोक नाईकवाडे

खेडेगावचा समाजशास्त्रीय अभ्यास : वसाहतकाळ ते जागतिकीकरण - प्रा. भाऊसाहेब सोनवणे

७४ वी घटना दुरूस्ती आणि महिला नेतृत्व, सबलीकरण व परिवर्तन - डॉ. प्रमिला जाधव

प्रख्यात समाजशास्त्रज्ञ, जैन धर्माचे अभ्यासक आणि सामाजिक इतिहासकार : प्रा. डॉ. विलास संगवे
- प्रा. महेंद्रकुमार जाधव

२१ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा वृत्तांत - सचिव, म.स.प.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

# मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्र. महाराष्ट्र / २७-८३ औरंगाबाद)

द्वारा - समाजशास्त्र विभाग पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | डॉ. दिलीप खैरनार |
| सचिव | - | डॉ. दादासाहेब मोटे |
| खजिनदार | - | प्रा. सिद्धार्थ निसर्गंध |
| सदस्य | - | डॉ. विजय मारूलकर |
| | | डॉ. एन.जी. कांबळे |
| | | डॉ. जगन कराडे |
| | | डॉ. श्रुती तांबे |
| | | डॉ. नारायण चौधरी |
| | | डॉ. डी. एल. तोरवणे |
| | | डॉ. पी. एम. शिंदे |
| | | डॉ. अरुण चव्हाण |
| | | डॉ. अशोक गायकवाड |
| | | प्रा. महेंद्रकुमार जाधव |
| | | प्रा. सुलभा गावंडे |

ISSN 2230 - 7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

✻ वर्ष - २८ वे ✻ अंक १२ वा ✻ एप्रिल २०११ ते मार्च २०१२ ✻ किंमत : रु. ५०/-

संपादक : डॉ. दिलीप खैरनार

संपादक मंडळ :
डॉ. दादासाहेब मोटे
डॉ. स्मिता अवचार
डॉ. पद्माकर सहारे
डॉ. राहूल हजारे
डॉ. सिद्धार्थ निसर्गंध

संपादकीय सल्लागार मंडळ -
डॉ. उत्तमराव भोईटे
डॉ. पु. ल. भांडारकर
डॉ. द. ना. धनागरे
डॉ. शरयू अनंतराम

संपर्क पत्ता -
सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा - समाजशास्त्र विभाग
पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
पिनकोड - ४३१ ००१
मो. - ९४२२७०७२६३

या अंकात लेखकांनी व्यक्त केलेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

**ICSSR यांचे अर्थ साहाय्य.**

www.msp-maha.com
E-mail : samajpatrika7@redifmail.com
Marathisocial@gmail.com

संपादकीय - डॉ. दिलीप खैरनार

मुंबईतील बालकामगार : एक विश्लेषण- डॉ. कल्पना देवकर १

वसाहतवाद आणि असमानतेचे तत्त्व - डॉ. राहुल हजारे, डॉ. दिलीप खैरनार ५

महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता आणि शेत मजुरांचे स्थलांतर : कोल्हापूर जिल्ह्यातील अभ्यास - डॉ. बालाजी केंद्रे १०

७८ वर्षापूर्वीची मराठवाड्यातील ब्राह्मणेत्तर चळवळ ... - प्रा. अशोक नाईकवाडे २०

मानवी हक्क : जारवा आदिवासी स्त्रिया - प्रा. मंदा वाघ २७

खेडेगावचा समाजशास्त्रीय अभ्यास : वसाहतकाळ ते जागतिकीकरण - प्रा. भाऊसाहेब सोनवणे ३२

शिक्षण : दहशतवादाच्या परिहाराचे एक साधन - डॉ. स्मृति भोसले ३५

७४ वी घटना दुरूस्ती आणि महिला नेतृत्व, सबलीकरण व परिवर्तन - डॉ. प्रमिला जाधव ४०

ग्रामीण मातंग स्त्री: एक सामाजिक वर्जित समूह - डॉ. विजय सूर्यवंशी, डॉ. रामचंद्र भिसे ४४

प्रख्यात समाजशास्त्रज्ञ, जैन धर्माचे अभ्यासक आणि सामाजिक इतिहासकार : प्रा. डॉ. विलास संगवे - प्रा. महेंद्रकुमार जाधव ४७

डॉ. अनुराधा भोईटे - काही आठवणी.... डॉ. स्मिता अवचार ५०

२१ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा वृत्तांत - सचिव, म.स.प. ५२

# बाराव्या अंकाच्या निमित्ताने ...

समग्र व्यवस्थेचा ऐतिहासिक क्रम त्याचे समाजशास्त्रीय आकलन डोक्यात ठेऊन समाजशास्त्राच्या विकासात भर टाकणारे मोजकेच का होईना परंतु काही अपवाद महाराष्ट्रात आहेत. यासारख्या अभ्यासकांनी केवळ समाजशास्त्र या विषयामध्येच संशोधनपर लिखाण करून मार्गदर्शन केले आहे असे नाही, तर सर्वच सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासातही भर टाकलेली आहे. ही मान्यवर मंडळी चांगले वक्तेही असल्याकारणाने महाराष्ट्रभर त्यांनी समाजप्रबोधनाचेही कार्य केलेले आहे व समाजशास्त्राच्या अभ्यासाला नविन दिशा दिलेली आहे. यातीलच डॉ. विलास संगवे, डॉ. अनुराधा भोईटे व प्रा. बा. ह. कल्याणकर या समाजशास्त्रज्ञांच्या, अभ्यासकांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक, समाजशास्त्रीय विश्वाची हानी झाली आहे. ज्ञान व संशोधन यावर निष्ठा असणाऱ्या पिढीचे ते प्रतिनिधी होते.

मराठी भाषेतून समाजशास्त्रावरील ग्रंथ निर्मिती करण्यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे संस्थापक सदस्य डॉ. विलास संगवे यांनी समाजविज्ञान ग्रंथमालाच्या रूपाने प्रसिद्ध केलेली ग्रंथ समाजशास्त्राच्या अभ्यासात भर घालणारे होते. डॉ. विलास संगवे, प्रा. बा.ह. कल्याणकर हे समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या सल्लागार मंडळावरही होते.

भारतीय समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक परिवर्तनाच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू असताना या परिवर्तनाचे दूरगामी परिणाम भारतीय समाजावर होणार आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे एकूणच संदर्भ बदलले आहेत. यातून नवीन संकल्पनांची निर्मिती, सैद्धांतिक मांडणी करण्याची गरज असल्यामुळे समाजशास्त्राच्या अभ्यासकांची आज विशेष जबाबदारी आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांची जुनी पिढी कालवश होत असताना नवीन पिढीने अधिकाधीक जबाबदारीने ही पोकळी भरून काढावयास हवी त्यासाठीच नवीन ज्ञानाचे खुली असणारी क्षितीजे पादाक्रांत करून संशोधनात्मक, चिकित्सक दृष्टीने समाजाकडे पाहून संशोधनात्मक कार्याकडे - लिखाणाकडे आपण वळूया! हीच खऱ्या अर्थाने ह्या प्रभूतींना श्रद्धांजली ठरेल.

- संपादक

# मुंबईतील बालकामगार : एक विश्लेषण

डॉ. कल्पना देवकर *

**प्रस्तावना**

राहणीमानाचा उत्तम दर्जा, सोई-सुविधांची उपलब्धता, कोणतेही का असेना पण उदरनिर्वाह करण्यापुरते मिळणारे काम तसेच कौशल्य आणि प्रशिक्षण असो वा नसो, फक्त कोणतेही काम करण्याची तयारी ठेवली तर काम मिळते हा विश्वास लोकांना मुंबईत स्थलांतर करण्यास कारणीभूत ठरतो. यामुळे मुंबई शहरात लोकसंख्यावाढीबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या, त्यापैकी बालकामगार ही एक समस्या.

मुंबईतील कोणत्याही भागात चक्कर टाकली तर लहान मुले कोणते ना कोणते काम करतांना दृष्टिस पडतात. लहान मुलांचे कोवळे हात अभ्यासात नव्हे तर कामामध्ये गुंतलेले दिसतात. लहान वयातच कामाला लागलेल्या आणि शिक्षणाची, आरोग्याची आबाळ झालेल्या या निरागस मुला/मुलींची स्थिती पाहता राष्ट्राची ही पुढची पिढी स्वत:बरोबर देशाचीही दशा स्पष्ट करते. चौदा वर्षाखालील शाळेत न शिकणारी मुले/मुली कामधंदा करून अर्थाजन करतात, अशी मुले/मुली बालकामगार होय.

कायदयानुसार, "पगार, रोख रक्कम किंवा जीवनावश्यक जिन्नस मिळण्याच्या मोबदल्यात शारीरिक श्रम करणारी चौदा वर्षाखालील कोणतीही व्यक्ती म्हणजे बालकामगार." आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने मात्र हे वय पंधरा असावे असे स्पष्ट केले.

बालमजूरीचे उच्चाटन करण्यासाठी बालकामगार कायदा- १९८६ (Child Labour Act -1986), हा कायदा संपूर्ण भारतभर लागू करण्यात आला. असुरक्षित आणि धोकादायक वातावरणात चौदा वर्षाखालील कोणालाही काम करायला लावणे हा या कायदयानुसार गुन्हा आहे.

बालकामगार निर्माण होण्यास त्यांचे आई-वडील जबाबदार असतात. आई-वडिलांचे अज्ञान, अशिक्षितपणा, व्यसन कारणीभूत असतात. त्यातही मुख्य कारण म्हणजे कुटुंबाचे तुटपुंजे उत्पन्न. त्यामुळे अशी मुले/मुली काम करण्यासाठी पाठवली जातात. मुलांपेक्षा मुलींची अवस्था अधिकच वाईट असते, कारण इतर घरी जाऊन काम करण्याबरोबर स्वत:च्या घरची कामेही त्यांना करावी लागतात.

**बालकामगारांच्या संदर्भात केलेल्या सर्वेक्षणातुन हाती आलेले निष्कर्ष**

मुंबईतील वेगवेगळया उद्योगात सद्यस्थितीत ३० ते ३५ हजार बालकामगार काम करीत आहेत (२०१० च्या सर्वेक्षणानुसार). यापैकी ११९६ मुले वेगवेगळया कारणांमुळे रस्त्यावर राहत असुन त्यात ३ ते १४ या वयोगटातील १०२४, तर १५ ते १८ या वयोगटातील १७२ मुले आहेत. पालकांसमवेत राहणा-यांचे प्रमाण २२१ आहे. धारावी, गोवंडी, ठक्कर बाप्पा, मदनपुरा-भायखळा, मलवणी आणि भुलेश्वर येथे बालकमागारांचे प्रमाण जास्त आढळले.

कुटुंबाचे अत्यंत कमी उत्पन्न किंवा दारिद्रय हे बालकामगार समस्येमागील एक महत्वाचे निदर्शक आहे. कुटुंबाच्या एकुण मिळकतीत या मुला/मुलींच्या कमाईचा

* एस.एन.डी.टी. विद्यापीठ संचलीत मुंबई येथील महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक

वाटा ३३% इतका आहे. गरिबी आणि घेतलेले कर्ज फेडण्यासाठी मुलांच्या कमाईचा आधार घेतला जातो. एकुण बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. मुलींची संख्या जास्त असण्याचे कारण या मुली मोठया प्रमाणात घरकाम करतात शिवाय स्वत:च्या घरी कामे करून कुटुंबाला हातभार लावतात. घरकामामध्ये लहान मुलांना सांभाळणे, केर काढणे, लाद्या/ फरशी पुसणे, मुलांना शाळेत पोहचवणे व आणणे, भाज्या चिरून देणे अशी कामे करतात. १३ ते १७ या वयोगटातील बालकामगार मुली भांडी-कपडे धुणे, स्वंयपाक ही कामेही करतात. ज्या बालकामगार मुली घरकाम करत नाही त्या लोकल/रेल्वेमध्ये वस्तु विकणे, माल घरी आणुन वस्तु तयार करणे ही कामे करतात. मुले मात्र हॉटेलमध्ये चहा देणे, टेबल साफ करणे, कपबाश्या/ भांडी धुणे, बुटपॉलीश, रेल्वे किंवा रस्त्यावर वस्तु विकणे, बांधकामाच्या ठिकाणी, तर काही मुले कारखान्यात काम करतात. साधारणत: दिड हजार व त्यापेक्षा कमी मासिक उत्पन्न असणाऱ्या मुलांची संख्या ७८% असुन दिवसाचे आठ तास काम करणाऱ्या बालमजुरांची संख्या ४६% आहे.

दारिद्रय आणि बालकामगार यांचा जवळचा संबंध आहे. या दारिद्रयामुळे मुलांना शिक्षण घेता येत नाही. मुलांना शिक्षण देण्याइतपत आर्थिक प्राप्ती नसल्याने त्यांना काम करण्यास पाठवले जाते. थोडेफार शिक्षण घेतलेली मुले शाळेतील शैक्षणिक वातावरण आणि पुरेश्या सुविधा उपल्बध नसल्याने पुढे शिक्षण घेण्यास नाखुश असतात. पालक स्वत: अशिक्षित असल्याने शिक्षण आणि शिक्षणाचे महत्व याबाबत उदासीन असतात. बहुतेक कुटुंबातील कर्ता पुरूष/कुटुंब प्रमुख दारूच्या आहारी गेले असल्याने ते पत्नी व मुलांचा छळ करतात. अशा कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची हेडसांड होते, त्यातच त्यांच्या कामाचे स्वरूप हंगामी किंवा तात्पुरते असल्याने एका ठिकाणचे काम संपले की, त्यांना दुस-या ठिकाणी कामासाठी जावे लागते. सहाजिकच मुलांना शाळा सोडावी लागते. नवीन वातावरणात रूळण्यास वेळ लागतो. हळुहळु शिक्षणाविषयीची आवड, गोडी कमी होत जाते, त्यामुळे शिक्षण घेण्याऐवजी ही मुले छोटी छोटी कामे करण्याकडे वळतात. (११% मुलांनी शिक्षणाची आवड नसल्याने शिक्षण सोडल्याचे सांगितले). मुलांना शिकवून काय करायचे आहे, मुलांना शिकवू पण त्यांच्या रोजगाराची खात्री आहे का? असे प्रश्न पालक विचारतात. त्यातच अकुशल कामगारांची मागणी असल्याने शिकविण्यापेक्षा मुलांना आत्ताच कामाला लावले तर आपल्या उत्पन्नात भर पडेल असे त्यांना वाटते. जे कर्ज घेतलेले असते त्यावरील व्याज एवढे वाढलेले असते की, ती रक्कम फेडून मुलाला दुस-या ठिकाणी कामासाठी पाठवणे अशक्य होते. ही एकप्रकारची वेठबिगारी असुन सर्वच बाजुंनी मुलांचे शोषण कारणारी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जोपर्यंत दारिद्रय आहे, तोपर्यंत बालकामगारांची समस्या सुटणार नाही या निष्कर्षाप्रत यावे लागते.

बालकामगारांच्या संदर्भात आणखी एक घटक महत्वाचा ठरतो, तो म्हणजे त्यांचे वय. चौदा वर्षाखालील मुला/मुलींना काम करण्यास बंदी आहे. मात्र त्यांच्या वयाबाबतचा दाखला किंवा नोंदी उपलब्ध नाहीत. काही वेळा खोटा दाखला तयार केला जातो ज्यामुळे, त्यांचे वय जास्त दाखवता येते. वाढत जाणारे वय, शिक्षणाचा अभाव, दैंनदिन गरजा पूर्ण न होणे आणि पालकांचा दबाब यामुळे ते स्वत:ला असहाय्य समजतात. परिणामी काम करण्याशिवाय पर्याय नसतो.

**कायदयाच्या दृष्टिकोनातुन बालकामगारांचा विचार**

बालाकामगारांची समस्या सोडविण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक प्रयत्न झाले मात्र ते अपुरे पडत आहेत. सरकारी पातळीवर १९७९ मध्ये प्रथमच या समस्येचा विचार झाला. या समस्येचा आढावा घेऊन उपाय सुचविण्यासाठी श्री. गुरूपादस्वामी समिती नेमण्यात आली. या समितीच्या शिफारसीनुसार बालकामगार प्रतिबंधक आणि नियंत्रण कायदा १९८६ मध्ये करण्यात आला. या कायद्यान्वये धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास बालकामगारांना बंदी घालण्यात आली आणि इतर काही उद्योगांवर नियंत्रणे ठेवण्यात आली. हे धोकादायक उद्योग वा कारखाने म्हणजे बिडी वळण्याचे कारखाने, गालिचे विणणे, सिमेंट उत्पादन, काडेपेटया, स्फोटके व फटाके यांचे कारखाने, चामडे कमावणे, लोकर साफ करणे, धोकादायक वस्तु तसेच शिसे, पारा, मॅगनिज, कॅडमियम, बेन्झिन, कीटकनाशके, ॲस्बेस्टॉस यांच्याशी संबंधित कोणतेही उद्योग, काजू प्रक्रिया उद्योग, इलेक्ट्रॉनिक उद्योगातील सोल्डरिंगची कामे वगैरे. विसंगती अशी आहे की याच उद्योगांमध्ये बालमजूर मोठया संख्येने आढळतात.

**बालकामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी केले गेलेले प्रयत्न**

प्रत्येक राज्याच्या मदतीने भारत सरकार बालकामगार समस्या नष्ट करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. यासाठी सरकारने राष्ट्रीय बाल श्रम कार्यक्रम/ प्रकल्प (National Child Labour Programme-NCLP) सुरू केला. या योजनेतंर्गत एक विशेष शाळा चालविली जाते ज्यामध्ये बालकामगारांचे पुनर्वसन केले जाते. या शाळेचा अभ्यासक्रम वैशिष्टपूर्ण असुन भविष्यात या मुलांना मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी त्याचा फायदा होतो. या शाळांमधुन व्यावसायिक शिक्षण, भोजन आणि आरोग्यविषयक सुविधा मुलांना पुरविल्या जातात.

१९८६ च्या बालकामगार कायदयातंर्गत केवळ धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास बालकामगारांना बंदी होती, परंतू १० ऑक्टोबर २००६ मध्ये या कायदयाची व्याप्ती वाढवून उपहारगृहे, घरकाम, कृषी, नागरी आणि ग्रामीण भागातील अनेक क्षेत्रामध्ये बालकामगारांना काम करण्यास बंदी घालण्यात आली. याशिवाय राष्ट्रीय प्रौढ साक्षरता उपक्रमाव्दारे मुलांना शाळेत पाठविण्याचा संदेश, सर्वशिक्षा अभियानाव्दारे मुलांची शाळेतुन होणारी गळती थांबविणे तसेच केंद्र सरकारचे कामगार मंत्रालय आणि अमेरिकन कामगार विभाग यांनी १९८० मध्ये संयुक्तपणे प्रसिद्ध केलेल्या निवेदनात बालाकामगार प्रथचे उच्चाटन करण्यासाठी दोन्ही देशांदरम्यान परस्पर सहकार्य करण्याचा निर्धार इ. व्दारे प्रयत्न केले जात आहेत.

मुंबईत टास्क फोर्सने एप्रिल २००५ ते २००६ या कालावधीत एकोणीस हजार बालकामगारांना सोडवले. शिवाय वेगवेगळया ठिकाणी धाडी घालुन अनेक बालमजुरांना मुक्त केले. सामाजिक संस्थांच्या मदतीने २०१० पर्यंत बावीस हजार बालकामगारांची सुटका करण्यात आली. पालकांसमवेत राहणा-या दहा हजार नऊशे बालकामगारांची नावे सरकारने शाळेत घातली. शहरातील सुमारे पाच हजार बालकामगारांसंदर्भात सरकार लवकरच कारवाई करेल अशी ग्वाही देण्यात आली.

**आवश्यकता आहे...**

राज्यातील बालकामगार प्रथेचे सन २०१० पर्यंत समूळ उच्चाटन करू ही पाच वर्षापूर्वीची सरकारची घोषणा केवळ घोषणाच राहिली. याबाबत सरकारला अपयश आले हेच सिद्ध झाले.

एवढया प्रयत्नानंतर बालकामगारांची समस्या सुटू शकली नाही तर, दशकागणिक वाढतच असल्याचे दिसुन येते. शाळाबाहेरचे प्रत्येक मूल हे बालकामगार असल्याचे मानुन आणि रोजगाराचे किमान वय पधंरा करण्याच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा निकष प्रमाण धरून या कामात समाजाचा सहभाग वाढविला पाहिजे. बालकामगारविरोधी कायदयान्वये खटले दाखल करण्याचे प्रमाण खूपच कमी असुन त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सामाजिक संस्थांमधील कार्यकर्त्याच्यामते बालकामगार विरोधी हा कायदा अधिक कठोर करणे व तितक्याच कठोरपणे त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. कारण सरकारी शक्तीच बालमजूरीवर निय‍ं ठेवू शकते. तसेच शाळांमध्ये मूल येईपर्यंतचेच प्रय न करता शिक्षणाचा दर्जा उंचावयला हवा आ रोजगाराभिमुख दार्जेदार शिक्षण द्यायला हवे. असे झा तरच केवळ मुंबई शहरच नाही तर गावापासुन शहरांप असलेल्या बालाकामगारांच्या समस्येवर प्रभावी तोड काढता येईल.

बालकामगार एक 'माणूस' आहे हे समजून त्या स्वत:ची ओळख जोपाण्याची संधी देणे गरजचे आ कोणत्याही हक्क-अधिकारापासून त्यांना वंचित न ठेव समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे अत्यंत महत्वाचे आ

## संदर्भ


Ahemad, M : Child Labour in Indian Politics
Kalpuz Pub, New Delhi 2004, PP 46- 48, 62-67

Anandharaja Kumar, P : Female Child Labour
A P H House New Delhi 2004, PP 22-25

Anker, Richard and Org Ed.: Economics of Child Labour in hazardus Industries in Ind
Centre for Operation research Training-Baroda

Bahara, D. S.: Child Labour : Dimension and Issues
Cyber Teh Pub, New Delhi, 2008, PP 6-9, 17-28, 104-10

Dasgupta, B.: Child Labour and Society
Oxfard University Press, New Dehli, 1997, PP 4 -9

Kumar, A Selva : Child Labour in home based sector
Sonali Pub, New Delhi 2005, PP 33-52

Nanjunda, D. G.: Child Labour and Human Rights
Kalpuz Pub, New Delhi 2008, PP 30, 61, 119

वृत्तपत्रे :
लोकसत्ता : २३ सप्टे. २००८
महाराष्ट्र टाईम्स : १२ ऑक्टो. २००६


✧ ✧ ✧ ✧ ✧

# वसाहतवाद आणि असमानतेचे तत्त्व

डॉ. राहुल हजारे *, डॉ. दिलीप खैरनार **

'असमानता' ही संकल्पना प्रामुख्याने सामाजिक व आर्थिक संदर्भाने वापरली जाते. सामाजिक असमानता जगभर सर्वच देशांमध्ये प्रत्ययास येते. गरिबी, अतिश्रीमंती आणि विषमता, मागसलेपणा, बकाली समजून घ्यायची असेल तर अनेक निकषांचे आधार घ्यावे लागतात. शिवाय देश, समाजगट, विभाग, वर्ग व स्तर श्रीमंत का झाले व काही गरीब तथा निकृष्ट का राहिले हेदेखील समजून घ्यावे लागेल. आज प्रत्ययास येणारे स्तरीकरण समाजामध्ये केव्हा रूजले याचे विश्लेषण गरजेचे आहे. मुळात असमानता उदयाची पार्श्वभूमी काय होती? जगभर अनेक देशांमध्ये सामाजिक स्तरीकरण व विशेषत: देशांतर्गत असणारी विषमता यांची कारणे काय आहेत याचे विश्लेषण क्रमप्राप्त ठरते. भारतासह युरोपातील बऱ्याच देशात मध्यमवर्गीय स्तरामध्ये कनिष्ठ-मध्यम, मध्यम-मध्यम आणि उच्च-मध्यम हे स्तर समाजातील विभाजन दर्शवितात. आफ्रिका, आशिया, युरोप, उत्तर अमेरिका व रशिया या सर्वच देशात सामाजिक स्तरीकरण आढळते; परंतु यातील विकसित व अविकसित किंवा मागास देश असे विश्लेषण केल्यास या विभाजनाच्या पार्श्वभूमीवर 'वसाहतवादाचा' विचार करावा लागतो. किंबहुना वसाहतवाद (Colonialism) हा जगभरातील विषमतेस किंवा असमानतेचे तत्त्व रूजवण्यास कारणीभूत असणाऱ्या अनेक घटकांपैकी एक आहे. या गृहितकासह प्रस्तुत निबंधामध्ये विश्लेषण केले आहे.

'असमानतेचे तत्त्व' या संकल्पनेमध्ये विषमता प्रत्ययास येण्यासाठीची सामाजिक, राजकीय व मानसशास्त्रीय पार्श्वभूमी अपेक्षित आहे. प्रामुख्याने समान संधी, उत्पन्नाचे समान साधन, सामाजिक अधिकारांचे वितरण, सामाजिक गतिशिलता व जीवनशैली या निकषांच्या आधारे असमानतेचे मोजमाप करता येईल. तर असमानता ही वैयक्तिक, कुटुंब, समुदाय किंवा समाज पातळीवर असू शकेल.

मॅक्सवेबर या समाजशास्त्रज्ञाने आपल्या समाजशास्त्रीय विश्लेषणामध्ये (Substantive Sociology) सामाजिक असमानतेच्या विविध संकल्पनांच्या माध्यमातून अभ्यास व मांडणी केली आहे. त्याने मांडलेल्या 'सत्ता', 'दर्जा', 'राजकीय पक्ष', 'अधिकार' इ. संकल्पनामध्ये श्रेष्ठ, कनिष्ठता, स्तरीकरण, असमानतेला व केंद्रीकरण व्यवस्थेला सामाजिक संबंधांचा आधार म्हणून विचार केला आहे.

वेबरच्या मते, 'असमानता' ही सत्ता व अधिकार यांच्या केंद्रीकरणामुळे उत्पन्न होते. सत्ता हस्तगत करण्याच्या क्षमतेमुळे विविध सामाजिक स्त्रोतांचे नियंत्रण मिळविल्या जाते. या सामाजिक स्त्रोतामध्ये (Social Resources) जमीन, भांडवल, भौतिक शक्ती, बौद्धिक संपदेवरील नियंत्रण व सामाजिक प्रतिष्ठा यांचा समावेश होतो. सत्ता प्राप्तीमुळे सत्ता वापरण्याचे कौशल्य प्राप्तहोते. ज्याचा वापर हा वारंवार सत्ता हस्तगत करण्यासाठी होतो. कालांतरने सत्ताधिकाऱ्याकडे सत्ता वापराचे कौशल्य निर्माण होते. सत्ता वापरामध्ये ज्यांच्यावर सत्ता गाजवली जाते त्यांनी प्रतिकार करू नये याचीही दक्षता घेतली जाते. साहजिकच श्रेष्ठत्वाच्या प्रक्रियेमुळे कनिष्ठांचे शोषण होते. मॅक्सवेबरच्या विश्लेषणात त्याने अधिकार प्राप्त समूह हे साधनांचे नियंत्रण मिळवत असल्याचे स्पष्ट केले आहे. साहजिकच समाजात उपलब्ध विविध संधी व स्त्रोत यांना प्राप्त करण्यासाठी असमान पद्धतीने रचना

* समाजशास्त्र विभागप्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर, जि. जालना.
** समाजशास्त्र विभागप्रमुख, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.

निर्माण होते. वेबरने आर्थिक शक्तीचा सबंध दर्जा व राजकीय शक्ती प्राप्ती यांच्याशी लावला आहे. थोडक्यात वेबरच्या विश्लेषणामध्ये सत्ता, अधिकार व राजकीय शक्ती या घटकामुळे सामाजिक स्तरीकरण अथवा उतरंड असलेला मानवी समुदाय निर्माण होतो. या सिद्धांताचे समर्थन होते. 'वसाहतवादा'चा काळ हा या विश्लेषणाप्रमाणे 'असमानतेचे तत्त्व' निर्मिती करणारा ठरला असे मानावे लागेल. वसाहतवाद व असमानतेचे तत्त्व या अनुषंगाने खालील मूलभूत क्रम लक्षात घ्यावे लागतील.

अ) वसाहतवादातून 'भांडवली संचय', 'संपत्तीची मालकी', 'बौद्धिक संपदेवरील नियंत्रण', 'व्यापारवाद' या संकल्पनांचा विकास.

ब) वसाहतकारामुळे उत्पन्नाचे स्रोत, खनिज संपत्ती व उपजाऊ जमिनीचे केंद्रीकरण.

क) सामाजिक संबंध व सामाजिक स्तरीकरण यातील महत्त्वाचा घटक म्हणजे 'जमीन मालकी हक्क' या घटकाचे निर्धारण

ड) वसाहतकारांचा आर्थिक व राजकीय व्यवस्थेवरील प्रभाव.

इ) वसाहतोत्तर कालखंडातील सामाजिक संस्थाची पुनर्रचना.

इ.स. १४५० ते १९७० हा कालखंड वसाहतवाद्यांचा मानला जातो. हा व्यापारक्रांती (Commerical Revolution) चा काळ संबोधला जातो. या कालखंडामध्ये त्या काळातील प्रभावशाली देश फ्रेंच, डच, ब्रिटिश, पोर्तुगीज, जर्मन यांनी जगातील अनेक प्रदेशावर वसाहती स्थापन करून आपले वर्चस्व निर्माण केले. समुद्रमार्गाने वरील वसाहतवादी हे आशिया, आफ्रिका खंडाकडे प्रवास करत होते. सुरुवातीला या देशांसमोर व्यापारी दृष्टिकोन होता. व्यापारी म्हणून मिळवलेली मान्यता हळूहळू वर्चस्व प्रस्थापित करणारी ठरली. स्थानिक पातळीवरील बौद्धीक, नैसर्गिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रावर वसाहतकारांनी नियंत्रण मिळवले. अर्थातच सर्व नैसर्गिक स्रोत यावरही नियंत्रण प्रस्थापित केले. या वसाहतवादातूनच 'वैश्विक व्यापारवाद' संकल्पनेचा उदय झाला. भांडवलशाही किंवा भांडवली संचय यावर भर दिला जाऊ लागला. वसाहतकारांनी आपल्या व्यवसायास अनुकूल नोकरशाही व सैनिकीकरणाकडे अधिक लक्ष केंद्रीत केले. व्यापारवाद सोडून साहजिकच या देशांनी साम्राज्यवाद म्हणजेच आपला विस्तार करण्यास सुरुवात केली.

| | |
|---|---|
| ब्रिटिश वसाहती | सुदान, गयाना, बर्मा, कॅनडा, भारत, आयर्लंड, मलाया, नायजेरिया, ओमान, दक्षिण आफ्रिका, त्रिनिदाद, टोबॅगो, गांबिया, पूर्व आफ्रिका |
| फ्रेंच वसाहती | अल्जेरिया, फ्रेंच गयाना, पश्चिम आफ्रिका, मोरोक्को न्यू कॅलेडोनिया, सोमालिया |
| जर्मन वसाहती | कॅमेरून, पूर्व आफ्रिका, पश्चिम आफ्रिका, गिलबर्ट, आईसलँड, मरीना टोगो |
| पोर्तुगीज वसाहती | अँजोला, गोवा, मोझाबिक, पोर्ट गियाना |
| डच वसाहती | डच इस्ट इंडीज, डचगियाना |

**तक्ता क्र. १ : वसाहती व देश**


१८ व्या शतकात जगातील अनेक प्रदेशांवर पाश्चात्य देशांनी नियंत्रण मिळवले होते. वसाहती स्थापन करताना तांत्रिकदृष्ट्या सक्षम देशांनी दुबळ्या देशावर प्रभाव निर्माण केला. युरोपीय देशांनी अनेक गरीब व असहाय राष्ट्रांवर अतिक्रमणच केले. वसाहतकारांनी व्यापारवादातून सुरू केलेले स्थलांतर साम्राज्य विस्तारामध्ये परिवर्तित झाले. एकानंतर एक वसाहती मिळवून त्यातून आर्थिक हित साध्य करण्यात येऊ लागले.

वसाहतवाद हा बाजारपेठेच्या शोधातून निर्माण झालेला होता. कच्च्या मालाचा शाश्वत पुरवठा झाला पाहिजे ही पश्चिमी देशांची गरज होती; परंतु वसाहतकारांना या प्रदेशामध्ये अमर्याद खनिज संपत्तीचा शोध लागताच त्यांची महत्त्वाकांक्षा वाढली. भविष्यामध्ये वसाहतीवरील नियंत्रण कायम राहावे या दृष्टीने स्थानिक रहीवाशांना हतबल करण्यासाठी त्यांचे अधिकार मर्यादित करण्यात आले. खाजगी मालकी व संपत्तीचा हक्क हिरावून घेण्यात आला.

दक्षिण आफ्रिकेच्या आपल्या राजवटीमध्ये ब्रिटिशांनी शेती व खनिज स्त्रोत यावर प्रभाव ठेवत स्थानिकांना जमीन मालकीचे मर्यादित अधिकार दिले होते. लॅटिन अमेरिका व सहारन आफ्रिका भागात वसाहतकारांनी उपजाऊ सुपीक जमिनीचे केंद्रीकरण करून ठेवले होते. आफ्रिकन प्रदेशातील निग्रो समुदायाची तर जगभर गुलाम म्हणून निर्यात करण्यास सुरुवात झाली. या देशांची चौफेर लूट करण्यात आली.

युरोपीय देशांनी ज्या वसाहती स्थापन केल्या त्या भागातील आर्थिक, राजकीय व सामजिक संस्थावर त्यांचा यात 'जमिनीचा मालकी हक्क' हा महत्त्वाचा घटक होता; परंतु युरोपीय देशांनी या घटकांची त्यांच्या प्रशासकीय सोयीसाठी व आर्थिक हितासाठी पुनर्रचना करून त्याचे केंद्रीकरण केले होते. अनेक कर लादण्यात आले होते. या देशांनी स्थानिक पीक पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल केले. तंबाखू, कॉफी, साखर इ. नगदी पिकांचे चलन दृढ करण्यात ते यशस्वी झाले.

वसाहतकारांनी आपल्या सोयीसाठी नव्या सामाजिक मूल्यांची पेरणी केली. उदा. भारतात 'फोडा व राज्य करा' या नितीचा अवलंब केल्यामुळे भारतीय समाजाची झालेली विभागणी आजही एक समस्याच आहे. अफ्रीकन समुदायाला गुलाम (Slave) करणारा पाश्चात्य समुदाय आजही दोन समुदायात अंतर ठळक स्पष्ट करणारा आहे. वसाहत काळातील करण्यात आलेली प्रशासकीय रचना व राजकीय संस्थामधील हस्तक्षेप दूरगामी परिणाम करणारा ठरला. वसाहतोत्तर काळात सामाजिक संस्थाचा विकास व त्या त्या समुदायाची वाटचाल यावरून त्या त्या भागातील पाश्चात्यांच्या वर्चस्वाचे दर्शन होते. प्रदेशांच्या अंतर्गत व्यवस्थेवर परिणाम तर झालेच परंतु




प्रभाव वसाहतोत्तर काळात आढळून येऊ लागला. जगभरातील सर्वच वसाहतीचे राज्य असलेल्या प्रदेशात पिळवणूक व अत्याचाराच्या खुणा दिसू लागल्या. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला सर्वच प्रदेशात स्वातंत्र्याची चाहूल लागली होती; परंतु तोपर्यंत वसाहतकारानी ज्या अर्थव्यवस्थेची तथा सामाजिक व्यवस्थेची नांदी घातली होती. त्याचे परिणाम आता दिसून येऊ लागले होते. वसाहतकारांचा प्रभाव केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर सामाजिक संस्थांवर झाला होता. अनेक प्रदेशामध्ये तेथील सामाजिक रचना व सामाजिक संस्था जगाचा विचार केल्यास विकसित व मागास हा भेद स्पष्टपणे निर्माण झाला तो आजही प्रत्ययास येतो. ज्या ज्या प्रदेशावर वसाहतीचे राज्य होते तेथील मूल्यांकन केल्यास हे लक्षात येईल की, पाश्चात्य युरोपीय देशांच्या अनेक वर्षाच्या राजवटीमुळे अनेक देश मागासलेल्या अवस्थेत आहे. शाश्वत विकास व समानता यासाठी मानवी विकास निर्देशांक हे प्रमाण आज महत्त्वाचे मानले जाते. नुकत्याच प्रकाशित मानवी विकास अहवाल २०११ (HDI) नुसार वसाहती असलेल्या देशांची आज बिकट अवस्था असल्याचे दिसते.

| देशाचे नाव | मानवी विकास क्रम (HDI Rank) | मानवी विकास निर्देशांक HDI Index | दर्जा |
|---|---|---|---|
| नॉर्वे | ०१ | ०९४३ | उच्च |
| ऑस्ट्रेलिया | ०२ | ०.९२९ | उच्च |
| अमेरिका | ०४ | ०९१० | उच्च |
| त्रिनिदाद व टोबॅगो | ६२ | ०७६० | मध्यम |
| गयाना | ११७ | ०६३३ | मध्यम |
| द. आफ्रिका | १२३ | ०६१९ | कनिष्ठ |
| भारत | १३४ | ०५४७ | कनिष्ठ |
| घाना | १३५ | ०५४१ | कनिष्ठ |
| केनिया | १४३ | ०५०९ | कनिष्ठ |
| कॅमेरून | १५० | ०४८२ | कनिष्ठ |
| टोगो | १६२ | ०४३५ | कनिष्ठ |
| नायजेरिया | १५६ | ०४५९ | कनिष्ठ |
| झिम्बाब्वे | १७३ | ०३७६ | कनिष्ठ |
| मोझम्बीक | १८४ | ०३२२ | कनिष्ठ |
| गाबिया | १६८ | ०४२० | कनिष्ठ |
| सुदान | १६९ | ०४०८ | कनिष्ठ |
| मलावी | १७१ | ०४०० | कनिष्ठ |

**तक्ता क्र. २ : मानवी विकास निर्देशांक २०११**

वर दर्शविलेल्या तक्त्यामध्ये जगातील १८७ देशांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. जीवनमान, जीवनशैली, दरडोई उत्पन्न, शिक्षण व एकूण राष्ट्रीय उत्पन्न या परिमाणाच्या साहायाने गुणांकन करून त्यांना मानवी विकास निर्देशांक देण्यात आला आहे. ज्या देशांची स्थिती उत्तम आहे त्यांना उच्च निर्देशांक प्रवर्गात तर ज्यांच्या स्थिती वाईट आहे त्यांना अनुक्रमे मध्यम व निच्चतम प्रवर्गात स्थान देण्यात आले आहे. या क्रमवारीमध्ये नॉर्वे, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जर्मनी, स्पेन, डेन्मार्क इ. पश्चिमी देशांना उच्च प्रवर्ग गटात स्थान मिळाले; परंतु भारतासह दक्षिण आफ्रिका, टोगो, केनिया, झिम्बाब्वे इ. देशांना निच्चतम प्रवर्गात स्थान मिळाले आहे. साहजिकच वर उल्लेखित घटकामध्ये हे देश पिछाडीवर आहे. ज्या देशाचे स्थान हे या प्रवर्गात आहे ते बहुतांश सर्व वसाहतवादाचे शिकार ठरलेले आहे. वसाहती असणारे अनेक देश क्रमवारीत १२० व्या स्थानानंतर आहेत. यावरून त्यांची आंतरिक व्यवस्था समानतेच्या दृष्टीने कमकुवत आहे हे स्पष्ट होते.

वसाहतपूर्व व वसाहतोत्तर कालखंडाचे विश्लेषण केल्यास सेनेगल व केनिया यासारख्या देशामध्ये असमानता व मागासलेपणा उदयास आल्याचे चित्र दिसते. ज्या देशांनी युरोपीय व पश्चिमी राजवट पाहिली ते आजही अविकसित राहिल्याचे स्पष्ट होते. याउलट जे देश कोणत्याही राजवटीखाली नव्हते. तिथे स्थानिकांना

प्रगतीच्या अधिक संधी आहेत व पर्यायाने त्या देशांच्या समानतेच्या (Equality) दृष्टीने विकास झाला असल्याचे दिसते.

अनेक अभ्यासकांच्या मते वसाहतवादामुळे अविकसित देशांना विकासाच्या संधी प्राप्त झाल्या व भौतिक, वैज्ञानिक, शैक्षणिक क्षेत्रात विकास घडून आला; परंतु तुलनात्मकदृष्ट्या वसाहतवादामुळे सामाजिक आकृतीबंधामध्ये अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. युरोपीय राष्ट्रांनी वसाहती स्थापन केल्या खऱ्या; परंतु त्यांना अनेक मूलभूत बदल घडवून आणावे लागले. जे त्यांच्या दृष्टीने सोयीचे होते. तोकड्या नोकरशाही व सैन्याच्या आधारे राज्य करणे शक्य नसल्याने त्यांनी वसाहतीमध्ये फूट पसरवली. 'फोडा व राज्य करा' या नितीचा अवलंब केला. स्थानिक संस्थानिकाना एकतर नष्ट केले किंवा मध्यस्थ बनवून त्यंच्या माध्यमातून राज्य केले. या सर्वाचे समुदायातील परस्पर विश्वासार्हतेवर दूरगामी परिणाम झाले.

आशिया, आफ्रिका, अमेरिका व इतर समुद्री देशावर युरोपातील राष्ट्रांनी वेगवेगळया कालखंडात राज्य केले. त्यांना प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या परिस्थितींचा सामना कराव लागला. आशिया खंडातील देशांची सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक स्थिती युरोपीय देशांच्या अगदी उलट होती. युरोपीय राष्ट्रांनी या संस्थांमध्येच असमानतेच्या तत्त्वाचे बीजारोपण केले. युरोपीय राष्ट्रांच्या खनिज संपत्तीची लूट, आफ्रिकी देशातील गुलामांचा व्यापार, जंमिनीचे केंद्रीकरण व समाजात फूट पाडण्याच्या नितीमुळे गेल्या कित्येक वर्षाच्या विकासानंतरही वसाहतीचे प्रदेश मागासलेलेच आहेत. वरील विवेचनावरून हेदेखील स्पष्ट होते की, विकासाचे विश्लेषण करताना ऐतिहासिक दृष्टिकोनदेखील महत्त्वाचा ठरतो. उत्तर वसाहतवाद म्हणजेच जागतिकीकरण हे वसाहतवादाचे पुन्हा प्रतीक बनू पाहत आहे. वैश्विक व्यापारातून असमानतेची तत्त्वे पुन्हा समाजव्यवस्थेत विष कालवतील. आर्थिक घटकाच्या माध्यमातून पश्चिमी देश नियंत्रण मिळवू पाहत आहेत; परंतु वसाहतवादाचा परिणाम आजही प्रभावीपणे अस्तित्वात असतांना आशियाई व आफ्रिकी देश हा धोका वेळीच ओळखतील.

## संदर्भ


- Satish Sabarwal - 'Sociologist and Inequality In India' Essay, Social inequality in india' - K. L. Sharma (Rawat Publication Jaipur, 2009)
- Frank Parkin - 'Max Weber' (Routledge Publication, London, 2007 )
- Biroy Verma - 'Agrarian relation in translation' Class caste relation & Dynamics of Land transfer- (Ashish publication, 1993 )
- Chris Livelsey - 'Social Inequality: Theoretical perspective of Weber' (www.sociology.org.uk)
- Frank A Cowell - 'Measuring inequality' (Dec 2009)
- Denis Cogneau - 'Colonization, Institutions and Inequality' (DIAL IRD Seminar, France, 2003)
- Dasgupta & Driskell - 'Discourse on Applied sociology' (Anthem Press,2007)
- Benjamin Kidd - 'Social evolution' (Shalabh Publication, 2011)
- Hiren Gohain - 'Roads to decolonization' (EPW VOl XLVI No 31 July- Aug 2011)
- Stanley Engerman & Kenneth - 'Colonialism Inequality & Long run path of development'(National bureau of eco research Cambridge 2005)
- कुमार केतकर – 'बदलते विश्व' (प्रेस्टीज प्रकाशन)


✧ ✧ ✧ ✧ ✧

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता आणि शेत मजुरांचे स्थलांतर : कोल्हापूर जिल्ह्यातील अभ्यास

डॉ. बालाजी केंद्रे *

महाराष्ट्रातील सामाजिक-आर्थिक आणि प्रादेशिक असमतोल सुरूवातीच्या काळापासूनच वाढलेला आहे. याची कारणे भौगोलिक स्थिती, राजकीय नेतृत्त्व, आर्थिक समावेशक विकासातील विषमता ही आहेत. म्हणून आजही महाराष्ट्रात प्रादेशिक विकासाचा असमतोल आढळतो. परिणामी मागासलेल्या भागातून (मराठवाडा व विदर्भ) विकसित असणाऱ्या (पश्चिम महाराष्ट्र) भागाकडे मजूरांचे स्थलांतर ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या शेती विकासामुळे रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत तर मराठवाड्यातील उदरनिर्वाहासाठी असणाऱ्या शेतीतील रोजगार फारच कमी आहे. पर्यायी साखर कारखाने चालू असलेल्या हंगामात ऊसतोड मजुरांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होते.

प्रस्तुत लेखात महाराष्ट्रातील सहकारी व खाजगी क्षेत्रातील साखर उद्योग आणि स्थलांतरित उसतोड मजूर यांच्यातील संबंध आणि ऊसतोड मजूरांची सामाजिक, आर्थिक स्थिती आणि समस्या यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या साखर उद्योगात महत्त्वाच्या असणाऱ्या ऊसतोड मजुरांच्या बाबतीत कोणतेच सहकारी तत्त्व लागू दिसत नाही. याबाबत पुनर्विचार होणे गरजेचे आहे अन्यथा या घटकाचा परस्परावर होणारा परिणाम भविष्यात चांगला असणार नाही.

**प्रस्तावना**

औद्योगिक क्रांतीमुळे मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात (उद्योग, शेती, वाहतूक, दळणवळण इ.) आमूलाग्र बदल घडून आले आहेत. याची खरी सुरुवात जरी इंग्लंडमध्ये झाली असली तरीही त्याचा प्रचार आणि प्रसार कमी कालावधीतच जगभर झाला. ब्रिटिशांनी आपल्या वसाहतीवरील पकड मजबूत करण्यासाठी नव्या यंत्राचा/तंत्राचा वापर केला, तो ब्रिटिश साम्राज्य वाढवण्यासाठीच. शेतीतील मालाचे उत्पादन माणसाची भूक भागवण्यासाठी नसून त्यापासून नफा मिळवण्याची प्रथा ब्रिटिशांनी त्यांच्या तत्कालीन वसाहतीमध्ये रुजवली आहे. जसे नीळ, कापूस, मिरची, कॉफी, चहा, ताड याचे शेतीतील उत्पादन व्यापारीकारणासाठीच वाढवले. त्यामुळे त्यापासून मिळणारा नफा हा भांडवलशाहीच्या वाढीसाठी पूरक ठरला.

भारतातील या सर्व प्रकारच्या कामासाठी लागणाऱ्या मजूर व कामगारांना ब्रिटिश कालावधीत गुलामी पद्धतीचीच वागणूक मिळत होती व ते हालाखीचे जीवन जगत होते हे सत्य होते. परंतु आज आपल्याला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षापेक्षा जास्त काळ झाला असला तरी शेती व्यवसायातील सर्वात मोठा घटक शेतमजूर सर्व बाजूनी उपेक्षितच राहिला आहे.

भारतातील मजूरांचे स्थलांतर ही घटना जरी जुनी असली तरी मोठ्या प्रमाणात मजूरांचे स्थलांतर हे भारतातील व भारताबाहेरील भांडवलवादी विकासासाठी ब्रिटीश काळात वाढवले. विशेषतः मजूर हे ग्रामीण व अदिवासी भागातून खाणकाम, मळे (Plantation) आणि उद्योगधंद्यासाठी स्थलांतरीत करण्यात आले. याकाळात स्थलांतर हे नियंत्रित स्वरूपाचे होते: स्त्रिया आणि लहान मुले यांना मुळ ठिकाणी ठेवून पुरुषांना

* सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

स्थलांतरीत केले जात असे. स्थलांतरीत मजुर तुलनात्मकदृष्ट्या कमी मोबदल्यात अपलब्ध होत असे. अशा पध्दतीने मजुर हे आधुनिक क्षेत्राकडे वळवल्या नंतर फक्त वैयक्तिक मजूरी (Individual Wages) त्यांना देण्यात येत असे. परंतु कौटुंबिक मजूरी (Family wages) देण्यात येत नसे. याचा पुरेपूर फायदा भांडवल वाढीसाठी ब्रिटिशांना मिळाला. यामुळे कामगारांचा उत्पादित वेळ (Productive Time) भांडवलवादी विकासासाठीच जास्त खर्च झाला (ऑमव्हेड, १९८०).

भारत सरकारने व्यवस्थित नियोजनाद्वारे समाजवादी भांडवलशाही हे विकासाचे प्रारूप स्वीकारल्यामुळे उत्तरवसाहत काळात (Post Colonial Period) थोडाफार बदल झाला. त्यासाठी पंडीत नेहरुंनी पंचवार्षिक योजनांचा मार्ग अवलंबिला. पहिल्या योजनेत त्यांनी कृषी क्षेत्राला प्राधान्य दिले. अन्यधान्याची गरज ओळखून तिसऱ्या पंचवार्षीक योजनाच्या काळात ज्येष्ठ कृषीतज्ञ एम.एस. स्वामीनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली हरित क्रांतीची घोषणा करण्यात आली. याचा परिणाम म्हणून शेती व्यवसायात भांडवलवादाचा प्रभाव वाढला. परिणामतः सिमांत शेतकरी, शेतमजूर यांचे स्थलांतर आधुनिक भांडवली शेती व्यवसायाकडे वाढले. श्रीमंत शेतकरी शेती विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत असे त्यामुळे गरीब शेतकरी स्थलांतर करु लागला व त्याने आधुनिक क्षेत्राचा जीवनमार्ग अवलंबिला. त्याचा परिणाम सामाजिक आणि आर्थिक जीवनात झाला. सलग मैदानी प्रदेश पोषक वातावरण आणि पाण्याची मूबलकता यामुळे पंजाब, हरियाणा या राज्यामध्ये हा प्रयोग यशस्वी ठरला. त्यानंतर पंजाब व हरियाणा ही राज्ये देशाला अन्नधान्य पुरविणारी कोठारे ठरली. याच काळात भारतात प्रादेशिक विषमता वाढू लागली. त्यामुळे बिहार, उत्तरप्रदेश, ओरिसा राज्यातील मजूर या भागाकडे आकर्षित झाले. परंतु तेथे त्याची पिळवणूक झाली. याच हरीतक्रांतीच्या कालावधीत महाराष्ट्रामध्येही अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली. ऊसासारखी नगदी पीके पश्चिम महाराष्ट्रात जोमाने वाढली त्यासाठी लागणारा मजूर मात्र मागासलेल्या भागातून स्थलांतरीत झाला. याचा फायदा मात्र सधन असणाऱ्या शेतकऱ्यांना झाला अणि मजूर आहे तसाच राहिला.

अशा कारणांमुळे उत्तर वसाहतकाळ मार्क्सच्या दृष्टिकोनातून समजून घेणे गरजेचे आहे. शेती आणि उद्योगाचा विकास भारतात झाला आहे. औद्योगिकदृष्ट्या मुंबई, दिल्ली, कोलकोता, मद्रास अशी शहरे प्रगतीपथावर पोहोचली आहेत. शेती विकासाच्या बाबतीत तथाकथित 'हरितक्रांती' भारतात झाली आहे. उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश यासारखी राज्ये यामध्ये समाविष्ट आहेत परंतु देशाच्या इतर भागात याचा प्रचार आणि प्रसार अपेक्षे प्रमाणे झालेला नाही. याचा परिणाम प्रादेशिक विषमता वाढण्यात झाला आहे. श्रीमंत-गरिबी तफावत वाढतच आहे. याचाच अर्थ जे घटक यापूर्वीच सबल आहेत यांनाच याचा फायदा झालेला आहे.

सूक्ष्म स्तरावर (Micro level) सामाजिक जीवनातील दरी दिवसेंदिवस वाढतच गेली. पश्चिम महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती चांगली असल्याने मिळालेल्या संधीचा फायदा येथे घेण्यात आला. तर उर्वरित विदर्भ व मराठवाडा सरंजामशाही पद्धतीने विकसित होत गेला याचा परिणाम आज दिसत आहेः शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतच आहेत, विकासाचा अनुशेष दिवसंदिवस वाढतच आहे त्याचबरोबर दुष्काळी परिस्थितीही दिवसेंदिवस नाजूक होत आहे. जे काही मराठवाड्याला मिळाले ते काही प्रस्थापित राज्यकर्ते आणि भ्रष्टाचारी प्रशासनाने गरिबापर्यंत पोहचू दिले नाही याचा परिणाम सामाजिक व आर्थिक जीवनावर मोठ्या प्रमाणात झाला आहे.

### संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हाती घेतल्यानंतर ते पूर्ण करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर करून उसतोड मजुरांचे स्थलांतर ही घटना समग्रपणे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून समजून घेणे गरजेचे आहे. कारण

समाजशास्त्रात सैद्धांतिक बाबीवर जास्त भर देण्यात आला असला तरी त्यामध्ये क्षेत्रीय कार्य महत्त्वाचे मानले आहे. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात क्षेत्रीय कार्य आणि सैद्धांतिक दृष्टीकोन यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला आहे.

**उदिष्ट्ये**

१. कोल्हापूर जिल्ह्यातील स्थलांतरीत ऊसतोड मजुरांची पार्श्वभूमी व स्थिती समजून घेणे.

२. ऊसतोड मजुरांच्या स्थलांतराची कारणे व समस्या जाणून घेणे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत अभ्यासासाठीच्या तथ्यसंकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर केला आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रत्यक्ष मुलाखत, अनुसूची, निरीक्षण या प्राथमिक तथ्य संकलनाच्या साधनाबरोबरच शासनाचे विविध अहवाल, पूर्वीचे संशोधन व वर्तमान पत्रातील बातम्यांचा आधार घेतला आहे.

**महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता**

भारतातील राज्यव्यवस्था व शासनव्यवस्था जरी भारतीय राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वावर आधारित चालत असतील तरी गटातटाच्या राजकारणामुळे ही प्रादेशिक विषमता, सामाजिक आणि आर्थिक विषमता वाढतच आहेत. महाराष्ट्र शासनाने प्रादेशिक विकासातील असमानता दूर करण्यासाठी ३ ऑगस्ट १९८३ रोजी व्ही.एम. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीची स्थापना केली. या समितीचा अहवाल १९८३ ला शासनाला सुपुर्त करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने प्रादेशिक विकासाच्या अनुशेषाचा आढावा घेणारी एक समिती पुर्नगठीत केली. या समितीने आपला अहवाल ३१ मार्च १९९४ ला शासनाला सादर केला. याच आधारावर तत्कालीन राज्यपाल आणि पुढील राज्यपाल यांनी अनेकवेळा अनुशेषासंदर्भात सरकारला विचारणा केली आहे. काही प्रमाणात अनुशेष दूर करण्यात आला असला तरी अजूनही पूर्ण अनुशेष दूर झालेला नाही. परिणामी प्रादेशिक विकासाचा समतोल ढासाळतच चाललेला आहे.

लोकशाहीतील राजकारण लोकांच्या हितासाठीच असते हे म्हणणे आजच्या स्थितीला योग्य ठरत नाही. देशाच्या विकासाचे राजकारण होणे गरजचे आहे परंतु तसे चित्र दिसत नाही. ही स्थिती राज्याची आहे. प्रस्थापित जातीचे राजकारण, अर्थकारण आणि सामाजिक जीवनातील वर्चस्व वाढतच आहे. अशा स्थितीत असणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रातील वंचित असणाऱ्या ऊसतोड कामगारांची सामाजिक आर्थिक स्थिती आणि समस्या समजून घेणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्रातील साखर उद्योग ( सहकारी/खाजगी )**

विकासाचा फायदा फक्त भांडवलदार वर्गाला होऊ नये म्हणून सहकारी तत्त्वाचा स्वीकार ग्रामीण विकासासाठी महत्त्वाचा आहे हे विसरून चालणार नाही. कारण खाजगी साखर उद्योग हा सहकारी उद्योगापेक्षा वेगळ्या तत्त्वावर चालणारा उद्योग आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्रातील साखर उद्योगविकासाचा दृष्टिक्षेपात आढावा घेणे अपरिहार्य ठरेल.

साखर उद्योगांची महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक विकासात भूमिका महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात सर्वात प्रथम पहिला साखर कारखाना १९२० मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील बेलापूर येथे उभारण्यात आला. त्यानंतर कालांतराने दहा साखर कारखाने खाजगी तत्त्वावर महाराष्ट्रात स्थापन झाले. महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने सहकारी तत्त्वावरील साखर उद्योगाची सुरुवात ही १९५० ला झाली. अशा पध्दतीचा पहिला साखर कारखाना धनंजयराव गाडगीळ आणि पद्मश्री विखे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आला. अशा प्रकारे सहकारी तत्त्वावरील साखरकारखान्यामध्ये सरकाराचेही भाग

### तक्ता क्रमांक १
### महाराष्ट्रातील प्रादेशिक आणि विकास क्षेत्रानुसार अनुशेष

(आकडे कोटीमध्ये)

| अ.क्र. | विकास क्षेत्र | इतर महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंचन | ९३४ | २४०१ | ४०८३ | ७४१८ |
| २ | रस्ते | ७७६.०८ | ५५४.३२ | ९९०.७६ | २३२१.१६ |
| ३ | शिक्षण | १०१.३३ | ३६.४५ | ३९.५८ | १७७.३६ |
| ४ | तांत्रिक शिक्षण | ३२५.७७ | ९५.८५ | ११२.४९ | ५३४.११ |
| ५ | आरोग्य | ६५०.४० | ३५९.४४ | २१३.१६ | १२२३ |
| ६ | पाणी पुरवठा | ४४.६५ | ९८.७९ | १७२.९९ | ३१६.४३ |
| ७ | जलसंधारण | ३१८.९० | १६२.०० | ३०७.६२ | ७८८.५५ |
| ८ | पशु संवर्धन | ३.०५ | १.०४ | १.३५ | ५.४४ |
| ९ | उर्जा | २२४.०२ | २९५.६६ | ७०३.०४ | १२२.७२ |
| | एकूण | ३३७८.२० | ४००४.५५ | ६६२३.९९ | १४००६.७७ |

(स्त्रोत: दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, २८ सप्टेंबर, २००८ पान क्रं. १)

भांडवल समाविष्ट करण्यात आले. या यशानंतर भारत सरकारने १९५६ मध्ये धोरणात्मक निर्णय घेऊन सहकारी तत्त्वावरील साखर कारखान्यांना परवाना देण्याबाबतीत प्राथमिकता दिली. याच्यातूनच महाराष्ट्रातील गोड चळवळीला (Sweet Movement) उत्तेजन मिळाले. याचाच परिणाम म्हणून १९५३-५४ पर्यंत १२ साखर कारखान्यांची असणारी संख्या २००६-०७ मध्ये १६३ एवढी झाली. सद्यस्थितीत यापैकी १४१ साखर कारखाने सहकारी तत्त्वावरील आहेत तर २२ साखर कारखाने खाजगी तत्त्वावर कार्यरत आहेत. या विस्तारामुळे साखर कारखान्यांनी त्यांच्या लाभ क्षेत्रातील सभासदांच्या विकासासाठी अनेक योजना राबवण्यास सुरुवात केली. जसे पाण्याचे नियोजन, शेतजमीन विकास, शेती पीक नियोजन इ.

ऊस हे नाशवंत पीक आहे आणि योग्य साखर उतारा मिळवण्यासाठी किमान २४ तासाच्या आत त्याचे गाळप होणे गरजेचे आहे. त्यामुळे ऊसतोडणीसाठी योग्य प्रमाणात श्रम करणारा मजूर वर्ग आवश्यक आहे. कारखान्यांच्या वाढत्या संख्येमुळे व ऊसाच्या क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे मजुरांची मागणी वाढत गेली. ऊसतोड मजुर अनियंत्रित असून अनौपचारिक पध्दतीने नियंत्रीत केले जात असल्यामुळे कोणत्याही प्रकारची यंत्रणा या मजुरांच्या संख्येबाबत ठामपणे सांगू शकत नाही.

साखर कारखान्याचा हंगाम साधारणपणे सहा महिन्यांचा असतो. कारखाना २४ तास चालण्यासाठी आवश्यक प्रकारचे नियोजन कारखाना प्रशासनास करावे लागते. साखर कारखान्यात काम करणारे कायम कामगार, हंगामी कायम, हंगामी, तात्पुरते शिकाऊ आणि इतर अशा स्वरूपाचे असतात. बहुदा हे कामगार स्थानिकच असतात. कारखान्याचे कामगार म्हणून त्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे पगार, बोनस, भत्ते दिले जातात परंतु काही वेळा यांनाही संपासारखे हत्यार वापरावे लागते. दुसऱ्या प्रकारचे कामगार म्हणजे शेती कामगार. शेती कामगार संबंधीत काम करतात. ऊसतोड मजूर हा

शेती कामगारंचाच एक भाग आहे. ऊसतोड मजूर बहुदा स्थलांतरीत असतात. अशा मजूरांना कारखाना आपले नोकर मानत नाही. कारण त्यांची नेमणूक कंत्राटदाराच्या मध्यस्थीने होते. म्हणून त्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे पगार, बोनस, भत्ते मिळत नाहीत. कामाची मजूरी मात्र मिळते. बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन ॲक्ट १९४६ (BIR) कायद्यानुसार हे मजूर कारखान्याचे घटक आहेत (जुगळे, १९९७, पृ. ७१). परंतु कोणताही साखर कारखाना त्यांना आपला घटक /भाग समजण्यास तयार नाही.

**स्थलांतरित ऊसतोड मजूरांची भरती (Recruitment of Migrant Sugarcane Cutters)**

साखर कारखानदारीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ऊसतोडणी वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत कामगारांचा वापर केला जातो (ब्रिमन १९९४, पृ. १४४). अनेक वर्षापासून आजही राज्यातील सहकारी/खाजगी साखर काखान्यांना लागणारे ऊसतोडणी मजूर मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, विदर्भातील यवतमाळ, वर्धा, पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूरचा दुष्काळी भाग व सातारा जिल्ह्याचा दुष्काळी भाग येथून आणले जातात. त्यातही मराठवाड्यातील बीड जिल्हा हा सर्वात जास्त ऊसतोड मजूर मिळणारा जिल्हा आहे (कासार १९९२, जुगळे १९९७). या कामगारांची भरती औपचारिक पद्धतीने पूर्ण करून पूर्णपणे अनौपचारिक पध्दतीने नियंत्रीत केली जाते. सर्वप्रथम एप्रिल-मे महिन्यात कारखान्याचे शेती अधिकारी (Agricultural Officer) कामगारांच्या मूळ ठिकाणी भेटी देतात. त्यानंतर तेथील विश्वासातील योग्य व्यक्तीस (आर्थिक, सामाजिक दृष्ट्या) मुकादम म्हणून निवडतात. हे मुकादम सर्वात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यांना २५ ते ३०% एवढे कमिशनही मिळते. मुकादम स्वत:च्या ऐपतीवर काम करू शकणाऱ्या व्यक्तीस स्वत: जबाबदारी घेऊन (मध्यस्थी करून) कामगारांना कारखान्याकडून अनामत रक्कम मिळवून देतो व त्याच्या कामाला येण्याची हमी देतो. स्थलांतरीत कामगारांच्या सर्व बाबींची काळजी मुकादम घेतो. त्याला लागणारे सर्व प्रकारचे सहकार्य कारखान्यांकडून मिळत असते.

महाराष्ट्रामध्ये १९७२-७३ आणि १९७६-७७ मध्ये काही भागात पडलेल्या भयानक दुष्काळामुळे शेतमजूर स्थलांतरीत झाला (विशेषत: मराठवाड्यातील). या शेतमजूरांना आपल्या कुटुंबाच्या उपजिवीकेसाठी व गुरे-ढोरे जिवंत ठेवण्यासाठी स्थलांतर करणे हा एकमेव पर्याय त्यांच्यासमोर होता. पश्चिम महाराष्ट्रात त्या दरम्यान दुष्काळाची तिव्रता एवढ्या प्रमाणात नसल्याने या काळात स्थलांतरितांची संख्या वाढली होती. त्यावेळेपासून आजतागायत ही संख्या वाढतच आहे (जुगळे १९९७, पृ. ४८). या वाढत्या स्थलांतरामुळे कारखान्यांना स्वस्तात मजूर उपलब्ध होत आहेत. स्थानिक मजूरांकडून हे इतर कारणामुळे (कामाच्या बाबतीत) स्थलांतरीत मजुराइतके काम करुन घेणे शक्य होत नाही. कारण स्थानिक असणे ही एक महत्त्वाची बाब आहे. प्रतिष्ठेच्या कल्पना व पारंपारिक धारणा उदा. लग्न समारंभ, राजकीय सहभाग इ.साठी कामगार ऊसतोडीकडे दुर्लक्ष करतात. कारखाना त्यांच्यावर जास्त बंधने लादू शकत नाही. म्हणून स्थलांतरित कामगार ही एक साखर उद्योगाची गरज आहे. स्थलांतरीत ऊसतोड कामगार आणि महाराष्ट्रातील साखर उद्योग हे जणूकाय एक समीकरणच बनले आहे.

ऊसतोड मजूर स्वत:कडे उपलब्ध असणाऱ्या व्यक्ती व इतर साधने जसे बैल इ. आधारावर अनामत रक्कम घेतो व ती रक्कम आपल्या गरजांसाठी वापरतो जसे शेती सुधारणा, बि-बियाणे, विहीर, पाईप लाईन, मुलीचे लग्न किंवा इतरांचे देणे इ. अनामत रक्कम ही बैल असणाऱ्या जोडप्यांना जास्त मिळते. (साधारणपणे एका जोडप्यास ३० ते ३५ हजार) तर बैल नसणाऱ्या जोडप्यास (२० ते २५ हजार रुपयांपर्यंत) रक्कम मिळते. सध्या कामगारांच्या वाढत्या मागणीमुळे मुकादम एकापेक्षा जास्त कारखाण्याकडून तसलमात घेण्याच्या घटना दिवसेंदिवस

वाढत चाललेल्या आहेत. यामुळे वाहन मालक व कारखाने आर्थिक अरिष्टात सापडले आहेत. याचा परिणाम मजूरांच्या विश्वासार्हतेवरही होत आहे.

**ऊसतोड मजुरांची ने-आण**
**(Transportation of Sugarcane Cutters)**

स्थलांतरीत ऊसतोड कामगारासाठीचा प्रवास खर्च (घरापासून कारखान्यापर्यंत दोन्ही वेळा) साखर कारखान्यामार्फत दिला जातो तसेच बैल वहातूकीसाठीही खर्च मिळतो. याबाबतीत काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. साखर कारखान्याचा गळीत हंगाम साधारणपणे ऑक्टो.-नोव्हेंबर या महिन्यात चालू होतो. त्यावेळी कामगारांच्या घराकडील कामे संपत आलेली असतात. त्यामुळे ते काही कामे घराकडील मंडळींसाठी ठेवतात आणि बाकीचे लोक स्थलांतरीत होतात. गाव सोडतेवेळी सर्व कामगार आपल्या नातेवाईकांना भेटतात व पुढील सहा ते आठ महिन्यांसाठी आम्ही बाहेर जाणार असल्याची कल्पना देतात. अशावेळी भावनिक झालेले कामगार फार दुःखी होतात. बऱ्याचवेळा काम करणारी महिला जर एक-दोन महिन्यांची गरोदर (Pregnant) असेल तर तिचा गर्भपातही (Abortion) ही मंडळी करण्याचा प्रयत्न करतात. कारण कामाच्या ठिकाणी अशी कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नसते. बऱ्याच महिलांना प्रवासादरम्यान लैंगिक छळ (Sexual Haressment) ला सामोरे जावे लागते (देशपांडे २००८). अशा विचित्र कोंडीस या स्त्रियांना सामोरे जावे लागते.

**निवास व्यवस्था (Accumodation)**

ऊसतोड कामगार जेव्हा साखर कारखान्यावर पोहोचतात त्यावेळी ऑक्टो.-नोव्हेंबर महिन्यात साधारणतः हा कालावधी थंडीचा असतो. थंडीपासून संरक्षण होण्याइतके मजबूत किंवा सक्षम घरे ऊसतोड कामगारांसाठी महाराष्ट्रात कोठेही नाहीत आणि बांधणे शक्यही नाही. कारण जसजसे उसाचे कापणी क्षेत्र समाप्त होते तसतसे त्यांना आपल्या घराची बदली करून घ्यावी लागते. बदलते घर ऊसतोड कामगारांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. बैलगाडी ऊसतोड कामगारासाठी ही समस्या भेडसावत नाही. हंगामी घर उभारणीसाठी कारखाना स्थलांतरीत ऊसतोड कामगारांना बांबू, चटई सारख्या साहित्याची मदत करतो. परंतु हे साहित्य हंगाम संपल्यानंतर कारखान्याकडे जमा करावे लागते. खराब झाल्यास किंवा मोडल्यास त्या बदल्यात काही रक्कम कपात करून घेतली जाते.

स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत स्थिती अतिशय निराशाजनक आहे. कारण हिवाळ्यातील थंडीपासून संरक्षण करण्याइतपत चांगली घरे नसतात. तर नंतरच्या कालावधीत (उन्हाळ्यात) सर्वात जास्त असुरक्षितता कामगारांच्या मनात घराविषयी तयार होते.कारण घरासाठी वापरले जाणारे साहित्य जसे बांबू, चटई, पाचट हे उन्हाळ्यामध्ये अतिशय ज्वालाग्रही पद्धतीचे असतात. एक झोपडी पेटली तर सर्व कामगारांचे जीवनावश्यक साहित्य, पैसे, लहान मुले, म्हातारी माणसे, बैल इ.चे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. याची अनेक उदाहरणे आपल्याला माहिती आहेतच. अशा घटना प्रत्येकवर्षी घडतातच. परंतु यावर उपाय योजना आतापर्यंत आखलेली दिसून येत नाही. यामुळे अगोदरच दारिद्र्यात जगणारा ऊसतोड कामगार अशा आपत्तीमुळे सर्वच गमावून बसतो. अशावेळी त्याच्या जीवनाची अवस्था काय असेल कल्पना करणे योग्य ठरेल.

**स्थलांतरीत ऊसतोड मजूरांची पार्श्वभूमी**
**(Background of Migrant Sugarcane Cutters)**

ऊसतोडणी करण्यासाठी येणाऱ्या स्थलांतरीतामध्ये सर्वांत जास्त प्रमाण हे मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, विदर्भातील यवतमाळ व पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील आहे. मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग विकासात्मक दृष्ट्या पश्चिम महाराष्ट्र विभागापेक्षा मागासलेले आहेत. साहजितकच पश्चिम महाराष्ट्रातील सामाजिक जीवन व इतर मागासलेल्या विभागातील सामाजिक जीवन यामध्ये मोठी तफावत आहे. राजकीय,

सामाजिक जीवनात सक्रिय व प्रभावी जात म्हणून ओळखली जाणारी मराठा जात ही यामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. इतर मागासवर्गीयांमध्ये माळी, तेली, धनगर, वंजारी इ. जाती या मध्यम प्रकारच्या स्तरात येतात आणि यांचे प्रमाणही जास्त आहे. तर दलित (मांग, महार, चांभार) जाती आजही सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात इतरांच्या तुलनेत विकसित झालेल्या नाहीत. त्याचेही भरपूर प्रमाण या व्यवसायात आढळून येते. असे अशा जातीवैविध्यामुळे ऊसतोडणी कामगारामध्ये जाती व्यवस्था जशास तशी टिकून आहे. परंतु एकंदरीत स्थलांतरीत ऊसतोड कामगारांमध्ये बहुजन समाजातील जातीचा भरणा सर्वात जास्त आहे. दलित जातीचे प्रमाणही जास्त आहे. परंतु उच्च जाती जसे ब्राह्मण, मारवाडी, जैन-मराठा यांचे प्रमाण शून्य आहे.

आर्थिकदृष्ट्या विचार केला तर मजूरांच्या आर्थिक जीवनात शेती व ऊसतोडणी हेच दोन व्यवसाय महत्त्वाचे आहेत. ऊसतोडणी मजूरांची आर्थिक स्थिती लक्षात घेण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे ज्या ऊसतोडणी मजूरांकडे बैलगाडी आहे त्याचा आर्थिक स्तर तुलनेने जास्त आहे. सामाजिकदृष्ट्या मराठा आणि गुजर जातीचा आर्थिक स्तर चांगला आहे. परंतु चांगला आर्थिक स्तर असणाऱ्या कोणत्याही मजूरांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त नाही. त्याचबरोबर या मजूरांमध्ये सीमांतशेतकरी, छोटे शेतकरी, भूमिहीन मजूर यांचा समावेश आहे.

**स्थलांतरित मजूरांना पुरवल्या जाणाऱ्या सुविधा (Facilities provided to the migrant Sugarcane Cutters)**

मागासलेल्या प्रदेशातील मजुरांना काहीतरी वेगळ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ज्यामुळे कामगारांना त्यांच्या रिकाम्या वेळेत काहीतरी मदत होईल आणि कारखान्यांना मजूर मिळतील या दोघांच्याही गरजा पूर्ण होण्यासाठी दोघांमध्ये काही गोष्टींची तडजोड होत असते. त्यात प्रत्येक साखर कारखाना इतर कारखान्यापेक्षा आम्ही तुम्हाला काहीतरी वेगळ्या सुविधा देऊ, असे आमिषही दाखवितो. अर्थातच याचा थोडाफार फायदा मजूरांनाही होतोच. सर्वसाधारणपणे सर्वच कारखान्यामार्फत खालील सुविधा स्थलांतरीत ऊसतोड मजूरांना पुरविल्या जातात.

कोल्हापूर व इतर जिल्ह्यातील बहुतांशी साखर कारखान्यांनी साखर शाळा उपक्रम चालू केलेले आहेत. परंतु याचा फायदा बैलगाडी असणाऱ्या ऊसतोड मजुरांना मुलांना होतो तर ऊसतोड करणाऱ्या मजूरांना याचा फायदा काहीच होत नाही. कारण ते ऊसतोडणीच्या ठिकाणीच शेतीत वास्तव्य करतात व त्यांना नेहमीच राहण्याचे ठिकाण बदलावे लागते.

**तक्ता**

| अ. क्र. | सुविधा | भाडे, मोबदला (होय/नाही) | दिलेली वस्तू खराब झाल्यास नुकसान भरपाई द्यावी लागते होय/नाही |
|---|---|---|---|
| १ | ऊसतोडणी हत्यार | नाही | नाही |
| २ | घरउभारणी साहित्य (बांबू, चटई) | नाही | होय |
| ३ | लाईट, पाणी | होय | होय |
| ४ | मुलांसाठीच्या शाळा | नाही | नाही |
| ५ | घर उभारणी जागा | नाही | नाही |
| ६ | ऊस वाहतुकीसाठी बैलगाडी | होय | होय |
| ७ | औषधोपचार | होय | - |

## स्थलांतरित ऊसतोड मजूरांच्या अडचणी (Dificulties of Migrant Sugarecane Cutters)

मागासलेल्या प्रदेशात, दारिद्र्यात खितपत पडलेल्या, सिमांत शेतकरी (Marginal farmers), शेतमजूर, भूमिहीन शेतमजूर यांना अडचणीच्या काळी घेतलेल्या अनामत रकमेची फेड करणे हेच मुख्य ध्येय असते. त्या ध्येयापुढे सर्व सुविधा व समस्या यांचा विचार करण्याची क्षमताच संपलेली असते. सुविधा मिळाल्या किंवा नाही मिळाल्या त्याबद्दल ते कोणालाही बोलू शकत नाहीत. कारण अनामत घेतलेले पैसे परतफेड करण्यासाठी दुसरा पर्याय त्यांच्याकडे नसतो. ऊन, वारा, पाऊस, थंडी हे नैसर्गिक घटक जरी मानवी जीवनासाठी आवश्यक असले तरी ते काही परिस्थितीत प्रतिकूल असतात. या प्रतिकूल परिस्थितीत ऊसतोड मजूरांना जास्त ऊन, जास्त थंडी, वाऱ्याचा पाऊस इ. गोष्टी अनुकूल नसतात. परंतु ऊसतोड मजूरांना यातूनही पुढे मार्ग शोधतच असतात. सर्व बाजूंनी असमर्थ असणाऱ्या ऊसतोड मजूरांना निसर्गही साथ देत नाही हे सत्य.

ऊसतोड मजूरांना एक प्रश्न विचारला की, आपल्या जिल्ह्यात केंद्र किंवा राज्य सरकारच्या रोजगार हमी योजना आहेत का? तर उत्तर होते 'होय आहेत'. दुसरा प्रश्न असा होता की, मग तुम्ही तेथे काम न करता येथे का येता. त्याचे उत्तर होते, 'रोजगार हमी योजनेचे काम नियमित नसते व पैसे कामानंतर मिळतात भ्रष्टाचार व वशिलेबाजी तेथेही चालते'. ऊस तोडीसाठी अनामत रक्कम एकरकमी मिळते. यावरून लक्षात येते की, साखर कारखाने मजूर मिळविण्यासाठी त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना अनामत रक्कमेने आगाऊ मिळवून ठेवतात. यामुळेच कारखाना आणि ऊसतोड मजूर संबंध टिकून आहेत.

## दैनंदिन व इतर समस्या

१) ऊसतोड मजूरांचा कामाचा वेळ निश्चित नाही. दररोज १५ ते १८ तासांपर्यंत काम करावे लागते.

२) पुनर्रोजगाराची कोणतीही हमी या मजुरांना नाही.

३) ऊसतोड मजूरांना कोणत्याही प्रकारचा सन्मान दिला जात नाही.

४) ऊसतोड मजूरांच्यामध्ये अजूनही वर्ग जाणीव नाही. जाती व्यवस्थेचा पगडा मोठा आहे.

५) बहुतांश ऊसतोड मजूर स्थलांतरित व गरीब असल्याने आणि राजकीय स्वार्थासाठी याचा काहीच उपयोग नसल्यामुळे त्यांना राजकीय संरक्षण मिळत नाही.

६) ऊसतोड मजूरा विषयी स्थानिक लोकांची मानसिकता सन्मानाची नाही. त्यांच्याकडे उपेक्षेने बघितले जाते. त्यामुळे कामगारांना (गबाळे, कोयते) या सारख्या नावाने संबोधले जाते. पण त्याबद्दल मजूर काहीही बोलू शकत नाहीत.

७) ऊसतोडणी-वाहतूकदारांचा संप होतो पण त्याचा फायदा हा ट्रक, ट्रॅक्टर-वाहतूकदार, कंत्राटदार इ.ना होतो. मजूरांसाठी त्याचा फायदा होत नाही. परंतु संप करण्यासाठी ऊसतोड मजूरांना वेठीस धरले जाते. ऊसतोड मजूरांची स्वतंत्र संघटना अस्तित्वात नाही.

८) स्त्रियांसाठी येथे कोणतीही वेगळी सुविधा नाही. जसे प्रसुतिपूर्व उपचार, प्रसुती सुविधा, पाळणाघर, स्वच्छता गृह अशी कोणतीही सुविधा त्यांना नसते. म्हणून कामाच्या ठिकाणी ऊसतोड मजूर स्त्रियांना वाईट परिस्थितीत जीवन जगावे लागते.

९) कारखाना प्रशासन ऊसतोड मजूरांना आपले/ नियमित कामगार म्हणून कधीच मान्य करत नाही.

म्हणून कोणत्याही प्रकारची कायदेशीर सुरक्षितता कामगारांना कारखान्यांकडून पुरवली जात नाही.

१०) सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या साखर उद्योगातील सर्वात महत्त्वाचा घटक ऊसतोड मजूर असून सुध्दा त्याच्यासाठी मात्र सहकार हा शब्द लागू नाही. सहकारी तत्त्वात या कमजोर वर्गाला भांडवलशाहीचीच वागणूक मिळते ती म्हणजे ऊसतोड मजूर म्हणून.

११) रोजगाराच्या शोधात असलेला मजूर स्वानुभवाने आपल्या कामाचा जास्त मोबदला मिळविण्यासाठी जागृत होत आहेत. त्यामुळे जेथे मजूरी थोडी फार जास्त असेल तेथे ते स्थलांतर करण्यास तयार झाले आहेत. म्हणून बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार आता कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू मध्येही दिसत आहेत. महाराष्ट्राबरोबरच हे आता इतर राज्यातही स्थलांतरीत होत आहेत. कारण या राज्यात मिळणारी मजूरी व कामाचे दिवस महाराष्ट्रातील मजूरीपेक्षा जास्त आहे.

### शासन स्तरावरील निष्फळ प्रयत्न

कमी पैशात जास्त काम करुन घेणे हे भांडवलशाहीचे तत्त्व आहे. गरीब हे भांडवलदाराचे भांडवलच आहे. सद्यस्थितीत सहकारी साखर कारखाने भांडवलशाही प्रवृत्तीने वागताना दिसतात. कमकुवत असणाऱ्या ऊसतोड मजूरांशी न्याय भावनेने न वागत अमाप पैसा शिल्लक राहाण्यासाठी ते प्रयत्नशील असताना दिसतात. या ऊसतोड मजूरांचेसर्व बाजूनी शोषण होते आहे. या सर्व बाबीवर देखरेख, उपाय शोधण्याचे काम सरकारी यंत्रणेचे आहे. परंतु सरकारच साखर सम्राटांचे/शिक्षण सम्राटांचे आणि सरंजामशाही मनोवृत्तीच्या लोकप्रतिनिधीचे व सामाजिक न्यायाचा सोंग करणारे असल्यामुळे या मजूरांना न्याय मिळविणे इतके सोपे नाही. म्हणून आजपर्यंत ऊसतोड मजूरांच्या बाबतीत कोणताही ठोस धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला नाही. की ज्यामुळे या कमकूवत गरिबीत अडकलेल्या मजूरांना न्याय मिळेल. या संदर्भात वेगवेगळ्या समित्या नेमण्यात आल्या जसे दादासाहेब रुपवते आणि पंडीतराव दौंड यांच्या समितीने सूचविलेल्या शिफारशीमध्ये माथाडी कामगारांच्या धरतीवर ऊसतोड कामगार कल्याण मंडळ स्थापनेबाबत महत्वाची शिफारस केलेली आहे परंतु याबाबत सरकार उदासीनच राहिले असल्याचे दिसते. कारण याबाबत निर्णय घेण्यासाठी मजूरांना कुणाचेतरी समर्थन, सहकार्य मिळणे आवश्यक असते. पण विरोधी पक्षातही याच लोकप्रतीनीधींची संख्या जास्त असल्याने त्याबाबत निर्णय होणे अशक्य वाटते. याचा परिणाम (२००९-१०) च्या ऊस हंगामात दिसण्यात सुरुवात झाली आहे. ऊसतोड मजूर हा कमकुवत घटक या भांडवली वृत्तीच्या सहकार व्यवस्थापनाला कंटाळलेला आहे. त्यामुळ त्यांनी त्याकडे पाठ फिरविण्यास सुरुवात केली आहे. असेच राहिले तर साखर कारखाना आणि ऊसतोड मजूर यांच्यातील परस्परातील असणारी गरज संपुष्टात येईल.

सहकार शिक्षण, प्रशिक्षण, जागृतीसाठी स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने या बाबत योग्य धोरण ठरवावे व त्याची अमलबजावणी सर्व सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना करण्यास भाग पाडावे त्याशिवाय गोड चळवळीतील महत्त्वाचा असणारा घटक (ऊसतोड मजूर) याकडे आपले म्हणून पाहणार नाही. त्यामुळे सहकारी चळवळीची सामाजिक बांधीलकीची भूमिका लयास जाणार नाही याची काळजी घेण्यासाठी सहकारी संघाची भूमिका महत्त्वाची आहे.

# संदर्भ


देशपांडे, एम. (२००८) : हेल्थ अॅण्ड न्युट्रिशनल स्टेटस ऑफ वुमेन शिझनल मायग्रंट : ए स्टीड ऑफ शुगेरकेन कटर्स इन कोल्हापूर डिस्ट्रीक्ट, (अप्रकाशित पीएचडी प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

जुगळे व्ही. बी. (१९९७) : इम्प्लायमेंट वेजेस ऑन इंडस्ट्रेयल रिलेशन्स : क्लासिकल पब्लीशींग कंपनी, न्यू दिल्ली.

ऑमव्हेड गेल (१९८०) : 'मायग्रेशन इन कोलोनियल इंडिया : द अर्टीकुलेशन ऑफ फ्यूडॉलिझम अॅण्ड कॅपीट्यालिझम बाय कोलोनियल स्टेट', द जर्नल ऑफ पिझंट स्टडिज, (२) : पृ. १९९-२०४.

ब्रीमन जॉन (१९९४) : वेज हंटर्स अॅण्ड गॉदरर्स : सर्च फॉर वर्क इन द अर्बन अॅण्ड रुरल इकॉनॉमी ऑफ साऊथ गुजरात. ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस. दिली. पृ. १३३-२१०.

इतर :

दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, २८ सप्टेंबर, २००८, पृ.क्र. १


✧ ✧ ✧ ✧ ✧


# आवाहन

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सभासदत्वासाठी रु. १०००/- सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट अथवा चेक द्वारा डॉ. दिलीप खैरनार, अध्यक्ष - मराठी समाजशास्त्र परिषद, समाजशास्त्र विभाग, पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या नावे पाठवावा.

नोंदणी अर्ज परिषदेच्या www.msp-maha.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# ७८ वर्षांपूर्वीची मराठवाड्यातील ब्राह्मणेत्तर चळवळ...

प्रा. अशोक नाईकवाडे *

स्वातंत्र्यपूर्व काळात निझाम राजवटीत मराठवाड्यातील बहुजन समाजातील तरुण नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी शिक्षण प्रसारासाठी फार मोठी चळवळ उभी केली होती. हैद्राबाद येथे शिक्षणाच्या निमित्ताने एकत्रित आलेल्या मराठवाड्यातील या तरुणांनी १९३४ मध्ये ''हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळ'' स्थापन केले होते. हैद्राबाद, नांदेड, परभणी,जिंतूर,हिंगोली,जालना, अंबाजोाई, बीड,औरंगाबाद, लातूर,निलंगा, तुळजापूर, उमरगा, उस्मानाबाद आदी ठिकाणी मंडळातर्फे बहुजन व मागास जाती जमातीतील ग्रामीण, गरीब, हुशार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे चालविली जात. मोफत आणि अल्प दराने अशी राहणाऱ्या जेवण्याची व्यवस्था केली जात असे. गरीब, हुशार विद्यार्थ्यांना काही शिष्यवृत्तीही दिल्या जात. १९४१ नंतर मंडळातर्फे काही ठिकाणी प्राथमिक व माध्यमिक शाळाही सुरू करण्यात आल्या.

२५ मे १९४६ रोजी या मंडळाचे जनरल सेक्रेटरी जालन्याचे वकील श्री. भगवंतराव गाडे यांनी जो संस्थेचा ''कार्यवृत्तांत व अहवाल'' प्रसिद्ध केला आहे,त्यात त्यांनी संस्थेच्या स्थापनेचा संक्षिप्त इतिहास दिलेला आहे. ''शहरेवर स.१३४३ फसलीमध्ये (इ.स.१९३४) हैद्राबाद येथे शिक्षण घेत असलेल्या मराठा व तत्सम् वर्गाच्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना हैद्राबाद येथे संस्थानातील शैक्षणिक हलाखी व जनतेचे सार्वत्रिक अज्ञान नाहीसे करण्यासाठी बीडचे तरुण वकील दे.भ. बलभीमराव कदम यांच्या पुढाकाराने व इतर सहकारी यांच्या प्रयत्नाचे श्री. श्रीरंगराव कुपटेकर,वकील, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली ''हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळाची'' स्थापना केली. (श्री. बलभीमराव कदम हे संस्थेचे पहिले जनरल सेक्रेटरी होते. त्यांच्या पुरोगामी, धाडसी कार्यामुळे हितशत्रुंनी त्यांच्यावर विषप्रयोग करून त्यांनामारले असे म्हणतात. त्यामुळेच त्यांचे वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्ष १९४४ मध्ये दु:खद निधन झाले. त्यानंतर श्री. भगवंतराव गाडे हे मंडळाचे जनरल सेक्रेटरी आणि अध्यक्षपदी उस्मानाबादचे वकील श्री. नरसिंगराव देशमुख, काटीकर यांची निवड करण्यात आली. मंडळाच्या स्थापनेपासून ५ वर्षानंतर सन १९३९ फसली (इ.स. १९३९) मध्ये कार्यवाही समितीवरील विद्यार्थी सभासदांनी हैद्राबाद येथील शिक्षणक्रम संपवून आपापल्या व्यावसायिक जीवनात मराठवाड्यातील निरनिराळ्या विभागात आरंभ केला. वेगवेगळ्या ठिकाणी स्थाईक झालेल्या कार्यकर्त्यांनी त्या-त्या भागात मंडळाचा संदेश पोहचविला. वसतीगृहे स्थापन करून कार्याला सुरूवात केली. मंडळाचे मध्यवर्ती कार्यालय श्री.बलभीमराव कदम यांच्याकडे बीडला ठेवण्यात आले होते. दोन वर्षांच्या सतत परिश्रमानंतर बीड येथे सप्तवार्षिक उत्सव श्री. नारायण चव्हाण (वकील) यांच्या अध्यक्षतेखाली १९४१ मध्ये साजरा करण्यात आला. उत्सवाकरिता मराठवाड्यातील बहुतेक सर्व विभागातील जवळ जवळ २०० प्रमुख कार्यकर्ते एकत्रित आले होते. यावेळी सविस्तर चर्चा करून एक ठराव समंत करण्यात आला आणि मंडळाची घटना व नियम बनविण्यात आले.[१]

* राज्यशास्त्र विभागप्रमुख, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.

हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे पहिले जनरल सेक्रेटरी श्री. बलभीमराव कदम यांनी १९४२ मध्ये संस्थेची ''घटना, नियम व धोरण'' ही पुस्तिका प्रकाशित केली आहे. त्यात १९४१ मध्ये संस्थेने जो ठराव पास केला व घटना संमत केली आहे, ती प्रसिद्ध केलेली आहे. त्यात दिलेले मंडळाचे धोरण पुढील शब्दात मांडले आहे. ''कोणत्याही राष्ट्रीय चळवळीला किंवा संस्थेला विघातक व प्रतिकूल होईल असे मंडळाचे धोरण पूर्वी कधी नव्हे आणि यापुढेही राहणार नाही. काल्पनिक गैरसमजामुळे काही ठिकाणी परस्पर विरोधी वातावरण निर्माण झालयाचा भास होत असेल तर तो नाहीसा करण्याचा शक्यतोवर प्रयत्न हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळाने करावा अशी ही समिति मंडळाच्या कार्यकर्त्यांना शिफारस करीत आहे. सर्व प्रकारच्या अन्याचा प्रतिकार करणे हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तरी या समाजावर जे जे अन्याय इतरांकडून होतील त्यांच्या निवारणार्थ सनदशीर व शिस्तवार प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे या समितीचे स्पष्ट मत आहे. ''मराठे''व ''तत्समवर्ग'' राष्ट्रातील बहुजनसमाज व दलित वर्ग शोषित (Exploited) असल्यामुळे शोषक (Exploiting) वर्गाच्या हितसंबंधाचे संघर्षन दलित व बहुजन समाजाच्या हितसंबंधाशी होणे अनिवार्य व क्रमप्राप्त होऊन बसले आहे. निर्भेळ राष्ट्रीय व निस्वार्थी कार्यकर्त्यांचे शक्य ते सहकार्य मिळवने समितीस आवश्यक वाटते. जास्तीत जास्त लोकांना उपयुक्त आणि सर्वांना भाग घेता यावा या भावनने प्रेरित होऊन स्वतंत्र केवळ शैक्षणिक असे कार्य करणारी अशी एक संस्था असावी असे ही समिती आपले मत व्यक्त करीत आहे. (२)''

या पुस्तिकेत संस्थेचे ध्येय स्पष्ट केलेले आहे आणि ''तत्सम'' जातीत शिक्षण प्रसार करणे हे संस्थेचे ध्येय राहील. ''तत्सम'' जातीत सर्वसाधारणपणे पुढील जातींचा समावेश सदरील पुस्तिकेत दिलेला आहे.

१) राजपूत, २) कुणबी, ३) माळी, ४) धनगर, ५) हटकर, ६) साळी, ७) कोष्टी, ८) शिंपी, ९) वंजारी, १०) कोळी, ११) वारीक, १२) तेली, १३) परीट १४) भोई, १५) जाट १६) कोल्हाटी, १७) भाट, १८) गवंडी, १९) सुतार, २०) लोहार, २१) कुंभार, २२) भूते, २३) ओतारी, २४) जोशी, २५) आंध, २६) गोपाळ, २७) गवळी, २८) गोंधळी, २९) देवांग, ३०,कलाल, ३१) रेड्डी, ३२) येल्लम, ३३)सोनार, ३४) कासार, ३५) भावसार, ३६) गीर, ३७) इतर सर्व मागास जाती–जमाती.

संस्थेची ध्येय पूर्तीस्तव स्वीकारण्यात येणाऱ्या साधनांचा तपशील :

१) जिल्हा व तालुका निहाय शाखा स्थापन करणे.
२) आवश्यक अशा ठिकाणी शाखा उघडणे.
३) विद्यार्थी वसतीगृह व संलग्न अशी वाचनालये आणि क्रीडांगणे स्थापन करणे.
४) प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणे.
५) विद्यार्थी संघ स्थापन करणे.
६) मराठा शिक्षण फंड या नावाचा द्रव्यनिधी जमा करणे.
७) अनाथ आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, कपडे, पुस्तके इ. स्वरूपात सहाय्य करणे.
८) वार्षिकोत्सव साजरा करणे.
९) मराठा व दिलेल्या तत्सम जातीच्या शिक्षण परिषदा भरवणे.
१०) शिक्षण विषयक चळवळीचे नियम आणि शिक्षण संस्थाचे संघटन व केंद्रीकरण करणे.(३)

''हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात वाढावे, खेड्यापाड्यातील शिक्षणाचा प्रसार व्हावा, पद्दलित

वर्ग व स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून लोकजागृती करण्यासाठी, जनतेचा सहभाग वाढावा म्हणून १९४२ पासून दरवर्षी ''हैद्राबाद संस्थान मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषद'' या व्यापक नावाने अधिवेशने घ्यावे, असे १९४१ च्या बीड येथील संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकत निर्णय झाला होता.[४] अशा परिषदांना ''सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात अखिल भारतीय कितीचे बहुजन समाजातील अनुभवी व तळमळीचे पुढारी, कार्यकर्ते श्री. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे, बॅ. रामराव देशमुख, क्रांतीसिंह नाना पाटील, सत्यशोधक केशवराव जेधे, भाई माधवराव बागल, शंकरराव मोरे, ज.ब. जगताप यासारख्या नेत्यांना निमंत्रित करण्यात येत असे.''[५] यातील काही मान्यवर उपस्थित राहिले तर काही मान्यवरांनी शुभ संदेश पाठविल्याची नोंद संस्थेच्या अहवालात दिलेली आहे.

**इ.स. १९४२ पासून १९५४ पर्यंत या परिषदेचे वतीने सहा अधिवेशन झाली, त्याचे स्थळ व अधिवेशनाचे अध्यक्ष, पुढीलप्रमाणे आहेत –**

१. पहिले –१९४२, हिंगोली – नारायणराव चव्हाण

२. दुसरे–१९४३, बीड – अण्णासाहेब गव्हाणे

३. तिसरे –१९४५, तुळजापूर – व्यंकटराव जाधव

४. चौथे–१९४६,औरंगाबाद –डॉ. पंजाबराव देशमुख

५. पाचवे–१९४७, नांदेड – डॉ. पंजाबराव देशमुख

६. सहावे –१९५४, जालना – व्यंकटराव जाधव

१९४४ मध्ये तुळजापूर येथे अधिवेशन होणार होते पण ऐनवेळी निझाम सरकारने ''बे'' फॉर्मची अट लावून परवानगी नाकारली व त्याचप्रमाणे देशभक्त बलभीमराव कदम यांच्या अकाली व आकस्मिक मृत्यूमुळे (१९४४) अधिवेशन स्थगित करावे लागले. दे.भ. बलभीमराव कदम यांच्या मृत्यूमुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांवरील कामाचा जबाबदाऱ्या वाढल्या व त्यांनी हाती घेतलेले काम तडीस नेण्यास कार्यकर्त्यांनी निश्चय केला व पुन्हा एकदा मंडळाच्या कार्यात मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातून जोमाने सुरूवात झाली. यानंतर एक वर्षांनी तीर सन १९५३ फसली (१९४४) मध्ये पूर्वी स्थगित करण्यात आलेले अधिवेशन तुळजापूर येथे (१९४५ मध्ये) अत्यंत उत्साहाने पार पाडले. [६] या शिक्षण परिषदांमध्ये अध्यक्षांची भाषणे अत्यंत उद्बोधक प्रेरणादायी असत. पुरोगामी विचाराद्वारे समाजात चैतन्य निर्माण करणारी असत. १९५४ च्या ६ व्या शिक्षण परिषदेत अध्यक्षपदावरून बोलताना श्री. व्यंकटराव जाधव आपल्या भाषणात ''स्त्री–पुरुषांच्या'' संदर्भात म्हणतात की, ''पुरुष कोणत्याही बाबतीत स्त्रियांच्या बाबतीत वरचढ नाहीत. शेकडो वर्षांच्या चुकीच्या समजुतीमुळे, चालीरितीमुळे आणि जुलमी कायद्यांमुळे स्त्रियांवर आतापर्यंत अन्याय होत आला आहे. स्त्री बिस्तरा नाही. आराम शय्या नाही. खेळणे नाही.... स्त्री म्हणजे मास्तर, गृहलक्ष्मी, स्फूर्ती, उत्साह, शक्ती असते. स्त्रिया पुरुषांपेक्षा कोणत्याही बाबतीत मागे नाही. आपल्याला हे लक्षात ठवले पाहिजे की, स्त्रियांच्या कडेवर राष्ट्र वाढतात नि उत्कर्ष पावतात.'' परिषदेचे कार्य स्पष्ट करताना हे पुढे म्हणतात की, ''मराठा शिक्षण प्रसारक मंडळ कोण्या एका विशिष्ट जातीची अथवा पंथाची नाही. मागासवलेल्या वर्गातून शिक्षण प्रसार करणे या संस्थेचे ध्येय आहे. विशिष्ट प्रयत्नावाचवून मागासलेल्या जाती जमातींचे प्रश्न सुटू शकत नाहीत. शतकानुशतके घोर अज्ञान अंध:कारात ठेवले गेलेल्या लाखो लोकांच्या उद्धाराकरिता

धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांची ही चळवळ आहे. वर्षानुवर्षे महार मांगादी पददलित वर्गाचे प्राण होरपळून काढणाऱ्या व काळीज कुरतडणाऱ्या निंद्य व तिरस्कारणीय सामाजिक चालीरितीची जाणीव असून देखील ज्यांची या पापाविरुद्ध ब्र काढण्याची छाती होत नाही तो येथील पुढारी आहे. उच्चभ्रू वर्ग आहे. आमच्या अज्ञानाचा, अंधश्रद्धेचा ते लोक फायदे घेतात म्हणून विद्येचे महाद्वार सर्वांना खुले झाले पाहिजे.[७] अशा भाषणांतून लोकजागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणात होत असे.

**कार्यवाही समितीच्या बैठका :**

वार्षिक अधिवेशनाप्रमाणे संस्थेच्या 'कार्यवाही समितीच्या बैठकीत मराठवाड्यातील निरनिराळ्या भागात जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना व निमंत्रितांना एकत्रित आणण्याचा प्रघात असल्यामुळे, प्रचाराचे दृष्टीने या बैठकीचा मोठा उपयोग झाला. तसेच काही बैठकीच्या वेळी निधी गोळा करण्यात आला. बीड येथील १९४१ च्या बैठकीनंतर १९४६ पर्यंत मराठवाड्यात विविध १४-१५ ठिकाणी बैठकी घेण्यात आल्या.

संघटनेची अधिवेशने, बैठकीशिवाय ठिकठिकाणी स्थानिक संस्थानच्या वार्षिकोत्सव प्रसंगी शिक्षणविषयक जाहीर सभाही घेण्यात आल्या.[८] अशा प्रकारे या संस्थेचे अतिशय प्रभावीपणे कार्य चालीत असे. संस्थेतर्फे वसतीगृहासोबतच आता हायस्कूलची स्थापना करण्यात येऊ लागली.

''बहुजन समाजाची शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी'' मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, हैद्राबाद संस्था या संस्थेचे चौथे अधिवेशन वऱ्हाडचे सुप्रसिद्ध डॉ. पंजाबराव देशमुख (एम.पी.) यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल १९४६ मध्ये औरंगाबाद येथे झाले. त्याप्रसंगी औरंगाबाद येथे 'मराठा विद्यालय' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १ जून १९४६ रोजी या विद्यालयाची सुरवातकरण्यात आली. या विद्यालयास व वसतीगृहात कायदामंत्री ना.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. शंकरराव मोरे, श्री.नाना पाटील, श्री.भाई सध्या व श्री. संत तुकडोजी महाराज इत्यादी थोर व्यक्तींनी भेटी देऊन संस्थेच्या कार्याबद्दल धन्योद्‌गार काढले आहेत. विशेषत: नामदार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्थेच्या ध्येयाशी समरस होऊन संस्थेला शक्य तेवढी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे हे उल्लेखनीय आहे.''[९]

कै. सं.म.शि.प्र. मंडळ या मध्यवर्ती संस्थेमार्फत मराठवाड्यात वसतीगृह ठिकठिकाणी चालविली जात. औरंगाबाद येथे श्री छत्रपती मराठा बोर्डिंग १९४१ मध्ये सुरू करण्यात आले होते. या वसतीगृहाचा तृतीय वार्षिक अहवाल वृत्तांत श्री. पंडितराव गव्हाणे,सेक्रेटरी यांनी प्रसिद्ध केले आहे. त्यात म्हटले आहे की, 'शिक्षणाशिवाय समाज किंवा राष्ट्र याची उन्नती होणे शक्य नाही. कारणे काही असली तरी आज बहुजन समाज अंधकारात चाचपडत पडला आहे हे कुणीही कबूल करील. ज्या शेतकरी, कारागीर नि मजूर या तीन वर्गांच्या परिश्रमाने मानव प्राण्यांच्या जीवनोपयोगी वस्तू तयार होतात तोच समाज आज अत्यंत कष्ट व दारिद्र्यात दिवस काढीत आहे. कष्ट करावे व मरून जावे याशिवाय त्यांना अन्य काहीच माहीत नाही.''[१०] असे विचार मंडळाचे होते आणि त्यावरून त्यांची पुरोगामी विचारसरणी दिसून येते.

या वसतीगृहाचा १९५२-५३ चा वार्षिक अहवाल वसतीगृह प्रमुख श्री.पी.के. गरूड यांनी प्रसिद्ध केला आहे. त्यात म्हटलेले आहे की, विद्यार्थ्यांकडूनच सर्व व्यवस्था व देखरेख केली जात असे.सर्व कामे करण्यासाठी विविध मंडळे निर्माण करण्यात येत असत. त्याची माहिति दिलेली आहे. ''विद्यार्थ्यांचे अंगी स्वावलंबन व स्वयंसेवीकरण व ते व्यवहारकुशल

व्हावेत, म्हणून संस्थेची सर्व कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात. कामाची पाहणी करण्यासाठी विद्यार्थ्यांनीच निवडून दिलेले विद्यार्थ्यांचेच कार्यकारी मंडळ असते. विविध मंडळे १) सल्लागार मंडळ २) भोजन मंडळ ३) व्यायाम मंडळ ४) सांस्कृतिक मंडळ''(११)

अशा प्रकारची वसतीगृहे मराठवाड्यात अनेक ठिकाणी सुरू करण्यात आली होती. शाळाही सुरू होत होत्या. त्यामुळे मराठवाड्यात शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय जागृती निर्माण होत होती. या ऐतिहासिक आणि तत्सम वर्गीय परिषदेच्या माध्यमातून जिद्दीने, कष्टकरी समाजातील ही सर्व मंडळी आपल्या अज्ञानी, अंधश्रद्धाळू, निरक्षर दरिद्री व परंपरावादी समाजाला शहाणे करण्यासाठी गेल्या ६०-७० वर्षांपूर्वी किती कष्ट घेत होते आणि ते किती दूरदृष्टीने कार्य करीत होते हे पाहिल्यावर आजच्या अत्याधुनिक काळात आम्ही त्यांचे वारसदार असूनही त्यांच्या तुलनेत आम्ही मात्र स्वार्थी, आत्मकेंद्री आणि बोलके सुधारक आहोत, याची प्रचिती आल्याशिवाय रहात नाही. या चळवळीत प्रारंभीच्या पिढीतील प्रमुख नेते जे आज हयात नाहीत त्यात प्रामुख्याने बलभीमराव कदम, भगवंतराव गाडे, नरसिंगराव काटीकर देशमुख, श्रीरंग (सोळंके),कुपटेकर, अण्णासाहेब गव्हाणे, भीमराव पाटील, पंडितराव गव्हाणे, उद्धवराव पाटील, रंगराव कदम, शंकरराव जाधव, बाबुराव गोरेगावकर, ज्ञानदेव मोहेकर, रामचंद्र पाटील, विश्वंभरराव हराळकर,साहेबराव हंगरगेकर,व्यंकटराव जाधव, नारायण चव्हाण, बाबासाहेब सोवणेकर आदी या संस्थेचे आधारस्तंभ आणि नेते होते.

या चळवळीत वरील सर्व ज्येष्ठ नेत्यांसोबत काम करणारे त्यांच्या समकालीन अथवा त्यानंतरच्या पिढीतील प्रमुख नेते मंडळी त्या त्या काळातील घडामोडीचे इतिहासाचे साक्षीदार आज आमच्यात आहेत ही सुदैवाची बाब आहे. त्यांनी पुढील काळात ठिकठिकाणी वेगवेगळ्या स्थानिक संस्था स्थापन करून बहुजनांच्या शिक्षण प्रसाराचे कार्य पुढे चालविण्यासाठी कार्य केलेले आहे आणि करीत आहेत. स्वांत्र्यानंतरच्या गेल्या ६०-६५ वर्षात या सर्व बहुजन समाजातील नेत्यांनी राजकीय, शैक्षणिक, पंचायत राज, सहकारी अशा सर्व क्षेत्रात सक्रीय भाग घेतला म्हणून यातील नेत्यांना राष्ट्रीय व राज्य स्तरावरील राजकीय क्षेत्रात फार मोठ्या स्थानावर पदावर जाण्याची संधी मिळाली. देशाचे गृहमंत्री, मुख्यमंत्री व मंत्री होण्याचा मान या चळवळीमुळेच यातील नेत्यांना मिळाला. इतर अनेक नेते मंत्री आणि खासदार आले. आमदार तर मोठ्या संख्येने झाले. या चळवळीतून ताऊन-सुलाखून हे नेते तयार झाल्यामुळेच ही सर्व मंडळी देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात, त्यानंतर हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यात आणि संयुक्त महाराष्ट्र निर्मिती चळवळीत सक्रीय राहिले. गोवा मुक्ती लढ्याही मराठवाड्यातील ही नेते मंडळी सहभागी होती.

**नव्याने इतिहास लेखनाची गरज :**

अशा या आमच्या मराठवाड्याच्या गतकाळातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विकासाचा आणि चळवळीचा सुसंगत आणि वस्तुनिष्ठ इतिहास अद्याप लिहिला गेला नाही. प्रामुख्याने १९६० पूर्वी येथील बहुजन समाजाचे शिक्षण, समाजकारण आणि राजकारण आदि क्षेत्रात जे बहुमोल योगदान दिले, जे क्रांतिकारक कार्य केले त्याची आम्ही नव्याने संशोधनात्मक पद्धतीने मांडणी केली पाहिजे. कारण त्याची नोंद त्या काळातील उच्चभ्रू वर्गाने घेतली नाही. येथील उच्च वर्णीयांकडे जी प्रसार मध्यमे होती, जे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक नेतृत्व होते त्यांनी या बहुजन समाजाच्या चळवळीला महत्त्व दिले नाही. उलट ही मराठ्याची वर्चस्व असणारी चळवळ

म्हणून अनुल्लेखाने व प्रसंगी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष टीका करून या 'हैद्राबाद संस्थान मराठा व तत्सम वर्गीय परिषदेला' महत्व दिले नाही. हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्याचा जो राजकीय चळवळीचा इतिहास या उच्चवर्णीयातील काही मान्यवर नेत्यांनी, पत्रकारांनी, स्वातंत्र्य सैनिकांनी लिहिला, त्यात बहुजन समाजातील शेकडो मान्यवर नेत्यांचा, क्रांतीकारकांचा आणि त्यांच्या चळवळींचा उल्लेख केलेला नाही. जर कुठे उल्लेख केला तर तो फारच अपुरा, नाममात्र केला आणि सर्व श्रेय त्यांया चळवळींचा उल्लेख केलेला नाही. जर कुठे उल्लेख केला तर तो फारच अपुरा, नाममात्र केला आणि सर्व श्रेय मात्र आपल्या समाजातील नेत्यांना, कार्यकर्त्यांना दिले. इतिहास लेखनातील हा उघड-उघड अन्याय आणि दुजाभाव होय. स्वातंत्र्यानंतरही या उच्चभ्रू वर्गाने बहुजनांच्या नेतृत्वाला, चळवळीला एक प्रकारे टाळण्याचेच प्रयत्न केलेले आहेत पण अलीकडच्या काळात गेल्या २५-३० वर्षांपासून समाजात पत्रकरिता या विभागात मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. शिवाय बहुजनातील लेखक निर्माण झाले. अभ्यासक निर्माण झाले. अभ्यासक निर्माण झाले. त्यामुळे अशा प्रकारच्या सत्यघटना, घडामोडी प्रकाशात येऊ लागल्या, गतकाळात मात्र बहुजन समाजाच्या चळवळींना अनुलेखाने टाळण्याचे प्रकार झालेले आहेत, म्हणूनच मराठवाड्यातील बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय चळवळीच्या इतिहासाचे नव्याने लेखन करण्याची गरज आहे.

तेव्हा ''हैद्राबाद संस्थान मराठा आणि तत्सम वर्गीय परिषद'' ही मराठवाड्यातील बहुजन समाजाची म्हणजेच ब्राह्मणेत्तर समाजाची चळवळ होती. १९३४ ते १९५४ पर्यंत या परिषदेमार्फत प्रचंड असे कार्य झालेले आहे. १९४२ ते १९५४ पर्यंत शैक्षणिक,सामाजिक आणि राजकीय जागृतीसाठी ठिकठिकाणी ६ अधिवेशने घेण्यात आली. १९५४ नंतर मात्र अशी अधिवेशने झाली नाहीत. कारण संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आणि इतर गतिमान राजकीय, सामाजिक घडामोडीमुळे ही परंपरा खंडित झाली. शिवाय मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषदही हळूहळू अस्त पावली. कारण प्रत्येक जिल्ह्यात बहुजनांच्या वेगवेगळ्या स्थानिक संस्था निर्माण होऊ लागल्या. या संस्थांना सरकारी अनुदान सुरू झाले. त्यांना आता जनतेच्या मदतीची पूर्वीसारखी गरज उरली नाही. एकूण सर्व संदर्भच बदलत चालले. १९५८ मध्ये या संस्थेतील प्रमुख नेत्यांनी एकत्र येऊन 'मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेची स्थापना केली आणि इतर अनेक शिक्षण संस्था निर्माण झाल्या.

आणि एक प्रकारे १९३४ मध्ये स्थापन झालेली संस्था या नव्या संस्थेची आणि मराठवाड्यातील अशा अनेक संस्थांची मातृ संस्थाच ठरली आहे, असे असूनही या पायाभूत संस्थेबद्दल, त्या काळातील प्रभावी चळवळीबद्दल आणि त्यातील प्रमुख नेत्यांबद्दल आजच्या नव्या पिढीला फारच कमी माहिती असेल. कारण गेल्या ७०-७५ वर्षापूर्वी मराठवाड्यात ब्राह्मणेत्तर चळवळ सुरु झालेली होती. १९६० नंतरचे मराठवाड्यातील सर्व क्षेत्रातील नेतृत्व या चळवळीतूनच तयार झाले पण दुर्दैवाने आमचा गेल्या ७०-७५ वर्षापूर्वीचा इतिहास आमच्याकडे नाही. म्हणून १९३४ ते १९६० या काळातील मराठवाड्यातील बहुजनांच्या चळवळीचा इतिहास, त्या काळातील आज हयात असलेल्या व्यक्तींच्या गाठीभेटी घेऊन उपलब्ध साधनांचा शोध घेऊन, वस्तुनिष्ठपणे लिहिण्याची गरज आहे. कारण स्वामी रामानंद तीर्थ यांच्या हिप्परग्याच्या ''राष्ट्रीय शाळेचा'' जेवढ्या गौरवाने उल्लेख केला जातो,संदर्भ दिले जातात तसे उल्लेख आणि संदर्भ १९३४ पासून कार्य करणाऱ्या 'मराठा व तत्सम वर्गीय

परिषदेच्या' मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यात, तालुक्यात आणि हैद्राबाद येथे जी अनेक वसतीगृहे होती आणि नंतर ज्या अनेक ठिकाणी शाळा सुरू करण्यात आल्या, तसेच लोक जागृतीसाठी ज्या शिक्षण परिषदा घेण्यात आल्या त्याचा मात्र साधा उल्लेखही कुठे होत नाही. अशा या बहुजन समाजातील नेत्यांचे प्रचंड असे योगदान असूनही त्याची नोंद पाहावयास मिळत नाही. कारण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. म्हणून हा सर्व इतिहास आज पर्यंत प्रकाशात न आल्याने या समाजाचा सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाच्या चळवळीतील सहभाग बहुमोलचा असूनही त्याकडे दुर्लक्ष झाले. म्हणून या अप्रकाशित इतिहासाकडे सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी नव्याने संशोधन करण्याची गरज आहे. कारण त्यामुळे या समाजाच्या चळवळीची प्रागतिक उंची आणि मर्यादा, उणिवा लक्षात येतील. अशा प्रकारचे काम माझ्या माहितीप्रमाणे आजपर्यंत झालेले नाही. जर असे कार्य झाले तर वर्तमान काळातील आम्हा सर्वांना आणि भावी पिढ्यांना आमच्या भागाच्या समाजाचा इतिहास ज्ञात होईल. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या क्रांतिकारी विचारांना आपले ध्येय मानून सत्यशोधक चळवळ त्या काळात मराठवाड्यामध्ये सुद्धा कार्यरत होती. म्हणून त्यावर सकारात्मक दृष्टीकोनातून चिकित्सा आणि अभ्यास होण्याची गरज आहे.

**संदर्भसूची :**

१) मराठा शिक्षण प्रसारक मंडळ, हैद्राबाद संस्थान, स्थापन १३४३ फसली कार्यवृत्तांत व अहवाल, प्रकाशक भगवंतराव गाडे, जनरल सेक्रेटरी, दि. २५ मे १९४६ ते २० तीर सन् १३५५ फसली,सुदर्शन प्रेस नाशिक.

२) हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळाची घटना, नियम व धोरण,किंमत १ आणा. प्रकाश बलभीमराव कदम बी.ए. एलएल.बी.वकील जनरल सेक्रेटरी, मुद्रक गंगासागर आर्ट प्रेम जालना. (प्रकाशन दिनांक दिलेला नाही पण पुस्तिकेची छपाई १९४२ मध्ये झालेली आहे असे संदर्भावरून दिसून येते.)

३) कित्ता (२)

४) कित्ता (१)

५) परिपत्रक नं. ३ (पॉम्पलेट) हैद्राबाद राज्य मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषद, जालना अधिवेशन ६ वे अध्यक्ष व्यंकटराव जाधव,एम.ए., एलएल.बी. प्रकाशक-विनीत, भाऊसाहेब अंकुशराव घारे, मे १९५४.

६) हैद्राबाद संस्थान मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषद, औरंगाबाद ४ थे अधिवेशन अहवाल तारीख २०-२१ तीर सन १३५५ फसली (२५-२५ मे १९४६) इसवी-अध्यक्ष श्री.डॉ. पंजाबराव देशमुखअमरावती, प्रकाशक-पंडितराव गव्हाणे,वकील, स्वागत समिती चिटणीस.

७) हैद्राबाद राज्य मराठा शिक्षण परिषद जालना ६ वे अधिवेशन अध्यक्ष श्री. व्यंकटराव जाधव यांचे भाषण १९५४ प्रकाशक अंकुशराव घारे, चिटणीस स्वागत मंडळ, जालना.

८) कित्ता

९) मराठा विद्यालय, औरंगाबाद, अहवाल (इ.स.१८४७ ते ५१) प्रकाशक पंडितराव गव्हाणे, संस्थेची चिटणीस, संस्थेचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ पाटील ढाकेफळकर, मुद्रक जगन्नाथ प्रेस औरंगाबाद.

१०) श्री छत्रपती मराठा वसतीगृह, औरंगाबाद, अहवाल १९५२-५३ प्रकाशक श्री.पी.के. गरूड, व्यवस्थापक-वसतीगृह, मुद्रक प्रेस, औरंगाबाद.

✧ ✧ ✧ ✧ ✧

# मानवी हक्क : जारवा आदिवासी स्त्रिया (व्यष्टी अध्ययन)

प्रा. मंदा वाघ *

**प्रस्तावना**

ॲरिस्टॉटल म्हणतो की, राज्य मनुष्याच्या सुरक्षीततेसाठी निर्माण होते व मनुष्याच्या कल्याणाकरीता ते टिकून राहते. मनुष्याचे कल्याण साधायचे असेल तर त्यासाठी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे की, ज्यात सर्वांगीण उन्नती होऊ शकते. ॲरिस्टॉटल असेही म्हणतो की, जीवन केवळ जगणे नव्हे तर उत्तमप्रकारे जगणे होय, जर उत्तम प्रकारे जीवन जगायचे असेल तर तशा प्रकारची परिस्थिती निर्माण करणे आवश्यक असते. व्यक्तीला अशा प्रकारे सर्वांगीण विकास करायचा असेल तर त्यासाठी काही साधने उपलब्ध करुन दिली पाहिजेत ही साधने म्हणजे हक्क वा अधिकार होत.

**मानवी हक्काचे स्वरुप**

भाषा, धर्म, लिंग, वंश, देश कोणताही असला तरी माणुस हा एकच असतो. माणूस म्हणून त्याच्याही काही गरजा व प्रश्न सारखेच असतात या गरजाची पुर्तता होण्यासाठी तसेच माणसाचे अस्तित्व व प्रतिष्ठा कायम ठेवून त्याचा विकास होण्यासाठी त्याला काही हक्काची आवश्यकता असते. विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, जावित जपण्याचे स्वातंत्र्य संचार व संघटना स्वातंत्र्य समतेचे हक्क, धर्म स्वातंत्र्य असे काही महत्वाचे हक्क आहेत. वंश, धर्म जाती, लिंग राष्ट्र या आधारावर माणसामाणसात भेदभाव न करता हे हक्क सर्वानाच उपयोगात आले पाहिजेत असा विचार दुस-या महायुध्दांनंतर प्रकार्षाने पुढे आला यालाच "मानवी हक्क" असे म्हणतात.

संयुक्त राष्ट्रांच्या स्थापने मागे एक प्रमुख उद्देश असा होता की, मानवी हक्क सुरक्षित राहीले पाहिजेत. यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहिरनामा घोषित केला. 'संयुक्त राष्ट्राच्या सभासद राष्ट्रांनी हे मानवी हक्क आपआपल्या देशातील नागरीकांना द्यावेत असे स्पष्ट करण्यात आले.

या मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यात एकूण ३० अनुच्छेद असून त्यात नागरी, आर्थिक, राजकीय व सामाजिक हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. यातील बरेच अधिकार लोकशाही देशांच्या संविधानात अंतर्भूत करण्यात आले आहेत.

मानवी हक्कांचा जाहिरनामा – १४ मानवी हक्क सांगितले आहेत.

- **उद्दिष्टे** – मानवी हक्क : जारवा आदिवासी स्त्रियांचे शोषन होत आहे हे जाणून घेणे.
- **गृहीतके** – भारतीय समाजात जारवा आदिवासी स्त्रियांच्या मानवी हक्काचे उल्लंघन होत आहे.
- **माहिती मिळविण्याचे स्त्रोत** –

**दुय्यम स्त्रोत** – ग्रंथ, मासिके, सर्व्हे जनगणना, अहवाल. वृत्तपत्रे, टि.व्ही, इंटरनेट इ.

- **संशोधनाचा आराखडा** – व्यष्टी अध्ययन व वर्णनात्मक आराखडा वापरण्यात आला आहे.

भारतीयांना मानवी हक्क मिळाले हे खरे पण निरक्षरता, जातीभेद, जमातवाद, दहशतवाद अशा कारणामुळे सर्व नागरिकांना हे हक्क समान / सारख्याच प्रमाणात उपभोगता येत नाहीत. संयुक्त राष्ट्रांनी

* समाजशास्त्र विभागप्रमुख, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर

१०डिसेंबर,१९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिध्द केला. बहुतेक सर्व लोकशाही देशातील नागरीकांना आपआपल्या संविधानामधुन त्याची हमी मिळाली तरी ही अनेक देशात मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे. दक्षिण अफ्रिकेतील श्वेतवर्णाय सरकारने काळे व गोरे असा नागरीकांमध्ये भेदभाव् करुन बराच काळ कृष्णवर्णियांचे मानवी हक्क नाकारले आहे. वर्णभेदाचे हे धोरण म्हणजे मानवी हक्कांची पायमल्ली होती. दक्षिण आफ्रिकेतील सरकारने कृष्णवर्णीयांचे नेते नेल्सन मंडेला यांना वीस वर्षाहून अधिक काळ तुरुंगवासात ठेवले होते तर पिटोरीयांच्या बेंजामिन नेलो नामक कृष्णवर्णाय कवीला फाशी दिले. श्वेतवर्णीयांचे हे कृत्य मानवी हक्कांना धाब्यावर बसवणारे होते.

भारतातही संविधानानुसार सर्व नागरिकांना मानवी हक्क मिळालेले आहेत. दलित, आदिवासी स्त्रियावर होणारे अत्याचार हे मानवी हक्कांच्या पायमल्लीचेच उदाहरण आहे.

- **मानवी हक्काची आवश्यकता**

जगातील मानवी समाजात विविधता आहे. सामाजात वांशिक, धार्मिक, भाषिक इत्यादी प्रकारची भिन्नता आहे. त्याचप्रामणे स्त्री आणि पुरुष यांच्या भिन्नता आहे (लिंगभेद) समाजातील विविधतेत एकात्मता असेल तर विविधतेला वैभव संपन्नता प्राप्त होते. मानवी सामाजाचे कल्याण हे एकमेव उदात्त उद्दिष्ट मानव जातीने डोळयासमोर ठेवले तर मानव जातीला प्रगतीच्या दिशेने वाटचाल करता येईल. परंतु त्यासाठी धर्म, वंश, लिंग, भाषा, इत्यादी बाबी गौण मानल्या पाहिजे. 'हे विश्वच माझे घर' हा दृष्टिकोन सर्वांनी धरला पाहिजे. प्रत्यक्षात मात्र विश्व मानवातील विविधता ही भेदात रुपांतरीत झालेले दिसून येते. या भेदाला उच्च नीचतेचा स्वरुप प्राप्त झाले आहे. त्याच्या मुळाशी मानवी अहंकार आहे. त्यातून मानवी समाजासमोर बिकट आणि गंभीर स्वरुपाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. आतापर्यंत अनेक व्यक्ती व संस्थानी यासाठी प्रयत्न केले आहे. मानवी हक्कांची सनद ही एक महत्वाचा प्रयत्न आहे. अशा प्रकारचे मानवी हक्क सर्वांनी जतन करण्याची गरज आहे. ती गरज का निर्माण झाली हे समजून घेतले पाहिजे.

आज भारतात ४२७ अनुसूचित जमाती आहेत. त्यांची लोकसंख्या २००१ मध्ये ८.२० टक्के होती. या जमाती संपूर्ण भारतभर विखुरलेल्या आहेत. १९३१ साली हटन यांनी आदिम जाती, १९४१ मध्ये जनजाती, भटके, आदिवासी, वेरिअर इल्वीन यांनी 'आदिवासी', डॉ. जी.एस. घुर्ये यांनी मासागलेले हिंदू, ठक्करबाप्पांनी 'भूमिपूत्र' तर भारतीय संविधानाने कलम ३४१ व ३४२ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) असे संबोधले आहे.

**आदिवासींची व्याख्या**

१) पेरी यांच्या मते 'समान बोली बोलणाऱ्या आणि सामान्य भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकसमूहास जमात म्हणतात.'

२) 'एक समान भाषेचा वापर करणारा, एकच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव करणारा, तंत्रशास्त्रीय दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारीत सामाजिक व राजकीय रितिरीवाजांचे पालन करणारा समूह म्हणजे जमात होय.'

ही व्याख्या १९६२ साली शिलाँग शहरात भरलेल्या जमातीच्या पहिल्या परिषदेने केलेली आहे.

जमातीची भौगोलिक आधारानुसार विभागणी. भौगालिकदृष्ट्या भारताची तीन प्रमुख भागात विभागणी केली जाते. अ) उत्तर पूर्व भारत ब) मध्य भारत क) दक्षिण भारत : अंदमान बेटावरील ओंगे, जारवा, सेंटीनली जमाती अंतर्भूत आहेत.

अंदमान निकोबार बेटावरचे ओंगे व जारवा हे निग्रिटो वंशाचे असून त्यांचा निर्देश सुदूर पुर्वेकडील

पिग्मी असा सुध्दा केला जातो. ग्रामीण आणि शहरी सांस्कृतिक जीवनापासून दूर राहणाऱ्या जमाती ह्या जमाती अद्यापही अविकसित आहेत. उदा. जारवा, ओंगे, सेंटीनली वगैरे.

**जारवा आदिवासी : सामाजिक स्थिती**

निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या आदिमानावाचे उरलेसुरले समुह आणि तथाकथित संस्कृतीरक्षक यांच्यातील एक बखेडा नव्याने जगासमोर आला आहे. 'द ऑब्झर्व्हर' तसेच 'द गार्डियन' या ब्रिटीश माध्यमाच्या संकेतस्थळावर अलिकडेच जारवांच्या अर्थनग्नअवस्थेतील नृत्यांची चित्रफीत झळकली. मुख्य म्हणजे पर्यटकांनी अन्नाची लालूच दाखवत त्याबदल्यात त्यांना नाचायला लावले, त्यातून देशात एक नवे वादळ उठले आहे.

अंदमान-निकोबारच्या पट्ट्यात आजही ओंगी, सेन्टेनलीज, ग्रेट अंदमानीज, शॉम्पेन आणि जारवा या आदिम मानवी प्रजाती टिकून आहेत. त्यांच्यापैकी जारवांची चर्चा अधिक होत राहिली. त्याचे एक कारण म्हणजे ही जमात नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे. मंगोलियन वंशाचा प्रभाव असलेली ही जमात हजारो वर्षापूर्वी केव्हातरी आफ्रिकेतून भारतात स्थलांतरीत झाली असे म्हणतात. त्यांचा काळा वर्ण, निबर करीही नितळ कांती, दाट कुरुळे केस, बेताची उंची आणि काटक शरीराचा मध्यम बांधा ही त्यांचे रुपही या तकाला पुष्टी देते. आजही धनुष्य-बाणाने शिकार करणारी ही जमात पुर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. यांची संख्या २४० आहे. तशी ही भटकी जमात त्यातही ते सगळे एकत्र राहत नाहीत. ४०-५० च्या गटामध्ये ते विखरून राहतात. जारवांसाठी अंदमानच्या जंगलात आदमासे १०२१ चौरस कि.मी. चा टापू सुरक्षित केलेला आहे. ब्रिटीश वसाहत १८५८ मध्ये या बेटावर आली. स्वातंत्र्यानंतर अंदमान बेट हे भारताचे केंद्र शासीत राज्य झाले. जारवांची लोकसंख्या पुढील प्रमाणे -

## अंदमान मधील आदिवासांची लोकसंख्या

| वर्ष | ग्रेट आदमानी | ओंगे | जारवा | सेन्टीलेसी | एकूण | लोकसंख्या वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| १९०९ | ६२५ | ६७२ | ५८५ | ११७ | १९९९ | - |
| १९११ | ४५५ | ६३१ | ११४ | ११७ | १३१७ | -३४.१२ |
| १९२१ | २०९ | ३४६ | ११४ | ११७ | ७८६ | -४०.३२ |
| १९३१ | ९० | २५० | ७० | ५० | ४६० | -४१.४७ |
| १९४१ | - | - | - | - | -- | - |
| १९५१ | २३ | १५० | ५० | ५० | २७३ | -४०.६५ |
| १९६१ | १९ | १२९ | ५०० | ५० | ६९८ | १५५.६ |
| १९७१ | २४ | ११२ | २५० | ८२ | ४६८ | -३२.९५ |
| १९८१ | २६ | ९७ | २५० | १०० | ४७३ | १.०१ |
| १९९१ | ४५ | ९५ | २८० | १०० | ५२० | ९.९३ |
| २००१ | ४३ | ९६ | २४० | ३९ | ४१८ | -१९.६१ |

(संदर्भ : भारत जनगणना १९९० : ॲन्थॉमोलिटीकल सर्व्हे ऑफ इंडिया)

वरील तक्त्यात आपणास हे आढळून येते की, जारवांची लोकसंख्या ही घटतांना आढळते.

१९९८-९९ मध्ये जारवांचा बाह्य जगाशी संपर्क आला तेव्हा पासून ह्या जमातीमध्ये वेगाने बदल झाले. अंदमान ट्रंकरोड (ATR) ३५ कि.मी. जारवांच्या भू क्षेत्राच्या आरक्षीत क्षेत्राच्या मध्यातून जात होता. येथे अनेक पर्यटक बसने जात येत असत. यातून जारवा भिक मागण्यास शिकले ते नवीन तंत्रज्ञान शिकले, जाळण्यासाठी माचिसचा वापर करणे, प्लॅस्टीक बॅगचा जंगलातील फळे गोळा करण्यासाठी वापर करू लागले.

**सैध्दांतिक दृष्टीकोन**

**इल्विनचा अलिप्तवादी सिध्दांत**

इल्विन या वंशशास्त्रज्ञ व मिशनरीने या आदिवासीयांना स्वतंत्र राहू द्या त्यांच्या संस्कृतीत व जीवनमानामध्ये बदल करू नये, त्यांना आहे तसेच जंगलामध्ये राहू द्यावे. त्यांच्या संस्कृती, आचार विचारात ढवळा ढवळ करू नये. ज्याप्रमाणे जंगली प्राणी नॅशनल पार्कमध्ये राहतात त्याप्रमाणे त्यांचे जीवन मुक्त वातावरणामध्ये जगू द्यावे. या सिध्दांताला नॅशनल पार्क सिध्दांत असेही म्हणतात.

**सम्मीलीकरणाचा दृष्टीकोन**

वरील सिध्दांताला डॉ. जी.एस.घुर्ये यांनी विरोध केला. जर आपण या जमातींना जंगलात अलिप्त ठेवले तर त्यांचा नागरी संस्कृतीप्रमाणे विकास होणार नाही. ते मागासच राहतील. स्वतंत्र भारतामध्ये इतर नागरिक जे स्वातंत्र्य अधिकार विकासाची फळे उपभोगतात ते त्यांच्या वाट्याला येणार नाही. व राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडसर निर्माण होईल. त्याकरिता या जमातींना प्रमुख प्रवाहामध्ये एकरुप करून घ्यावे. त्यांना ही अधिकार उपभोगू द्यावा. यातून त्यांनी सम्मीलीकरणाचे विचार मांडले.

२००८ मध्ये जारवा स्त्रियांना अर्धनग्न अवस्थेत बिस्किट, केळी, फळे यासारख्या खाद्य पदार्थांचे आमिष दाखवून बसमधील पर्यटकांनी नृत्य करण्यास भाग पाडले. याची ब्रिटीश पत्रकाराने चित्रफित तयार करून विविध वाहिन्यांवर दाखविली. हे कृत्य सर्व जगभर दाखविण्यात आले आहे. यावर जगभर चर्चा होत आहे. भारत सरकारलाही त्यामुळे जाग आली आहे. आधुनिक समाजातील बारबालाप्रमाणे त्यांच्याकडून एका बिस्कीटाच्या तुकड्यासाठी नृत्य करायला लावणारे आधुनिक माणसं एक कृत्य करताना आढळतात. विशेष म्हणजे यामध्ये पोलिस कर्मचारी आणि संरक्षक अधिकाऱ्यांचा समावेश असलेला दिसून येतो.

भारताच्या संविधानात वय, लिंग, वंश, धर्म, जात सर्वांना समान अधिकार प्रधान केले आहेत. सर्वांना नैसर्गिक मानवी हक्क प्रदान केलेले आहेत. जगण्याचा अधिकार सर्वांना आहे. जारवा ही जमात अत्यंत विरळ आहे. त्यांचे फक्त २४० सदस्य उरलेले आहेत. त्यांनाही जीवन जगण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यांचे हे स्वातंत्र्य नागरी संस्कृती हिरावून घेत आहे. त्यांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होतांना आढळते.

**उपाय**

१. राष्ट्रीय स्त्री आयोगाने जारवा स्त्रियांवरील अन्याय अत्याचार दूर करण्याचा प्रयत्न करावा.
२. सुप्रिम कोर्टाने रोड बंद करण्याचा आदेश दिलेला आहे. त्याची कडक अंमलबजावणी करण्यात यावी.
३. भारत सरकारने जारवांचे कुपोषण थांबविण्यासाठी सकस आहार पुरविणे तसेच त्यांच्या आरोग्याचे प्रश्न सोडविणे.
४. भारत सरकारने जारवांची सुरक्षा वाढवावी. तसेच त्यांची घटती लोकसंख्या यावर काबू करावा.

**निष्कर्ष**

भारतातील इतर नागरिकांप्रमाणे जारवा भारताचे नागरिक आहेत. त्यांना मिळालेले सर्व मूलभूत अधिकार तसेच त्यांच्या मानवी हक्कांची जतन व्हायला पाहिजे. ही जमात हळू हळू नष्ट होत आहे. बाह्य समाजाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांना वाईट व्यसनं लागले आहेत. तसेच जारवा स्त्रियांचे शारीरिक शोषण होत आहे. त्यांचे

रक्षण होणे गरजेचे आहे. समाजाने त्यांना **नॅशनल पार्क**, **ज्युरासिक पार्क**, तसेच **'ह्यूमन सफारी'** असे अनेक नावाने संबोधले आहे. परंतु जारवा जमात ही प्राणी नाहीत ते मनुष्य प्राणी आहेत. **'जगा व जगू द्या'** हा मानवी दृष्टीकोन लक्षात घेतला तर त्यांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होणार नाही.

**संदर्भ ग्रंथ आणि नियत कालिके**


१. चोले, रावसाहेब (प्रकाशव), १९८८,**राष्ट्रीय एकात्मता**, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

२. वडनेरे राजेंद्र (प्रकाशक),२००१, **आदिवासी शेतमजूर आणि अल्प व अत्यल्प भूधारक हक्क आणि परिपूर्ता.** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३. कुलकर्णी चंद्रशेखर, जानेवारी २०१२, जारवाचा जुरासिक पार्क, दैनिक लोकमत.

४. गारे गोविंद, २००२, **महाराष्ट्रातील आदिवासी जमाती**, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

५. लोटे रा.ज. २००६, **आदिवासी समाजाचे समाजशास्त्र**, पिंपळापुरे अॅण्ड पब्लिशर्स. नागपूर.

६. खडसे भा.की.२००६, **आदिवासी समाजाचे समाजशास्त्र**, हिमालया पब्लिशीग हाऊस, मुंबई.

७. गोटे शुभांगी, २००४, **महिला सबलीकरण : स्वरुप व समस्या**, वरद पब्लिकेशन, औरंगाबाद.

८. बौराळकर कृ.दि. **'राजकिय सिध्दांत'** विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

९. नवलगुंदकर शं.ना. **'राज्यशास्त्र'** नरेंद्र प्रकाशन, पुणे.

१०. Naik Varun & Mukesh Sahni,२०१०, **Globlization & Human Rights**, Crescent Pushing Corporation, New Delhi.

११. Rosemeyer S.S. Womens Rights & Empowerment, wisdom Press, New Delhi.

१२. Pankaj Sekhsaria and Vishvajit Pandya (Edit.) The Jarawa Tribal Reserve Dossier, Cultural & biological diversities in the Andaman Islands, UNESCO, New Delhi.

१३. **'Human Safari' in the Andamans** (Editorial), **Economic & Political Weekly**, Vol. XLVII No.५, Feb. ४, २०१२.


✧ ✧ ✧ ✧ ✧

## आवाहन

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सभासदांना आवाहन करण्यात येते की, ज्यांची नावे परिषदेच्या आजीव सभासदांच्या यादीत नसतील, तसेच ज्यांचा पत्ता बदललेला असेल अशांनी सदस्य नोंदणीच्या पावतीची सत्यप्रत अर्जासह मा. अध्यक्ष म.स.प. यांना पाठवावी.**

**म.स.प. आजीवन सदस्य यादी परिषदेच्या www.msp-maha.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

# खेडेगावचा समाजशास्त्रीय अभ्यास : वसाहतकाळ ते जागतिकीकरण

प्रा. भाऊसाहेब सोनवणे *

सामाजिक शास्त्रातील महत्त्वाची ज्ञानशाखा म्हणून समाजशास्त्राने काही दशकांपूर्वीच मान्यता मिळविलेली आहे. ही मान्यता मिळविताना अनेक विचारप्रवाहामधील संघर्ष आणि चिकित्सा यांना महत्त्व मिळाल्यामुळेच आज समाजशास्त्राची इतर ज्ञानशाखांच्या तुलनेत वेगळी प्रतिमा तयार झाल्याचे दिसते. भारतीय समाजशास्त्राचा विचार केला तर सुरुवातीला 'पाश्चात्य' समाजशास्त्राच्या रूपरेषेखाली सामाजिक मानववंशशास्त्र म्हणून मान्यता पावलेल्या भारतीय समाजशास्त्राने केव्हाच कात सोडून दिली आहे. आज एक स्वतंत्र अस्तित्व घेऊन आपली ज्ञानशाखीय पाळेमुळे भक्कम करण्याचे काम करत आहे. सुजाता पटेलसारख्या समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजशास्त्राला पाश्चात्य समाजशास्त्रापासून वेगळे होताना कोणकोणत्या चिकित्सेतून वाट काढावी लागली याबद्दल सविस्तर मांडणी केली आहे. भारतीय समाजशास्त्राला जागतिक स्तरावर सामाजिक मानवशास्त्र म्हणूनच शिक्का दिला गेलेला होता. त्यामुळे हा शिक्का खोडून काढणे हा भारतीय समाजशास्त्रज्ञांपुढचा महत्त्वाचा मुद्दा होता. समाजशास्त्रीय अभ्यासकांच्या अथक परिश्रमातून आणि विचारांवर ठेवलेल्या चिकित्सात्मक व विश्लेषणात्मक दृष्टिकोनामुळे आज हा शिक्का खोडून काढण्यास मदत झालेली आहे. तसेच भारतीय समाजशास्त्र द्वैतामध्ये अडकले आहे अशी टीकादेखील काही समाजशास्त्रज्ञांकडून केली जात आहे. पटेलसारख्या अभ्यासकांच्या मते या द्वैताच्या पुढे जाणे म्हणजेच समाजशास्त्राची पुढची अवस्था ठरू शकते. पाश्चात्य विरुद्ध एत्तदेशीय परंपरा, विरुद्ध आधुनिकता, शहर विरुद्ध ग्रामीण असे द्वैतामध्ये राहून या घटकांचा वेगवेगळया पद्धतीने अभ्यास केला जातो; परंतु हा अभ्यास वेगवेगळया राहून न करता दोन्ही घटकांना एकत्र आणून कसा केला जाऊ शकतो. याविषयी बरेच विचार मांडले जाऊ लागले आहेत. या विचारांची एक री ओढण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखामधून केला आहे.

ग्रामीण विरुद्ध शहर या द्वैताला ओलांडून ग्रामीण विशेषत: खेडेगावांचा अभ्यास नव्याने कसा केला जाऊ शकतो याची मांडणी करताना प्रामुख्याने दोन भागात करण्यात आली आहे.

## १

पहिल्या भागामध्ये भारतीय समाजशास्त्राने खेड्यांचा अभ्यास कशाप्रकारे अधोरेखित केला आहे व हा वसाहतकाळी परिपेक्षातून कशाप्रकारे मांडण्यात आला. याविषयीचे विवेचन केले आहे. तर दुसऱ्या विभागामध्ये खेड्यांचा अभ्यास विविध मुद्यांना घेऊन आंतरविद्याशास्त्रीय परिप्रेक्षातून कसा केला जाऊ शकतो याचे व्यष्टी अध्ययन करून मांडणी करण्यात आलेली आहे.

### खेडी ही एक स्वायत्त केंद्रे : वसाहतवादी परिपेक्षातून

खेडेगावांचा अभ्यास ही समाजशास्त्राची खूप मोठी परंपरा आहे. हा अभ्यास करण्यामध्ये ए.आर. देसाई, एम.एन. श्रीनिवास, योगेंद्र सिंग यासारख्या समाजशास्त्रज्ञांचा मोलाचा वाटा आहे. समाजशास्त्रात खेडेगावाचा अभ्यास करताना खेडी ही एक स्वतंत्र केंद्र आहेत. खेड्यांतील बलुतेदारी पद्धतीमुळे खेड्यांना सार्वभौम स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे खेड्यांचा पूर्णपणे

* समाजशास्त्र विभागप्रमुख, न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

विकास हा खेड्यातील व्यवस्थेवरच अवलंबून होता (बोबडे : १९९६). खेडेगावामध्ये जी जाती व्यवस्था अस्तित्वात होती ती एकमेकांना परस्पर पूरक कार्य करत होती. गावातील कारू आणि नारू या जाती खेडेगावाच्या भौतिक विकासासाठी कार्यरत असतात. त्यामुळे राष्ट्रराज्याची कल्पना मांडताना खेडेगावाची प्रतिमा 'आदर्श' स्वरूपाची मांडण्यात आली. त्यामुळे भारतीय राष्ट्रराज्याची एकात्मता ही खेडेगावामध्येच पाहायला मिळते. त्याचबरोबर भारताची जवळजवळ ७० टक्के लोकसंख्या ही खेड्यामध्ये राहते. त्यामुळे जगाच्या पटलावर भारतीय राष्ट्रराज्याचे नेतृत्व हे भारतीय खेड्यांनी केलेले आहे. (बोबडे : १९९६) त्यामुळे नागरी विभाग आणि ग्रामीण विभाग असे विभाजन मांडण्यात आले व भारतीय राष्ट्रराज्याची संस्कृती ही खेड्यांमध्ये आहे असे गृहीत धरण्यात आले व पर्यायाने नागरी विभाग हा संस्कृती ऱ्हास पावणारे क्षेत्र म्हणून पुढे आले.

खेडेगावांचा अभ्यास करण्यामध्ये ब्रिटिश शासनानेही मोठ्या प्रमाणावर रस दाखविला. कारण ब्रिटिशांना भारतामध्ये शासन करावयाचे असेल तर भारतातील भौगोलिक व सामाजिक माहिती असणे आवश्यक होते. यासाठी त्यांनी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून खेड्यांचा अभ्यास करण्यावर भर दिला. भारतीय खेड्यांचा अभ्यास हा महसूल गोळा करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा होता. त्यामुळे खेडेगावांतील प्रत्येक कुटुंबाची माहिती असणे आवश्यक होते ही माहिती मिळविताना खेड्यांचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक रचनेला कोणताच धक्का बसला नाही. कारण या रचनेला जर धक्का लागला असता तर धार्मिक अस्मिता वाढून भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची निर्मिती झाली असती आणि ती भावना ब्रिटिशांना शासनव्यवस्था निर्माण करण्यासाठी अडथळ्यंची ठरली असती. (Breman J : 1997)

२

हा अभ्यास करताना भारतीय खेडी ही स्वयंपूर्ण आहेत असे भासवले आणि तेव्हापासून ते आजपर्यंत भारतीय खेड्यांचे अध्ययन करताना खेड्यांची स्वयंपूर्णता आणि स्वायत्तता गृहीत धरण्यात आली. खेड्यांचा अभ्यास घेताना ही राष्ट्रवादी विचारप्रणालीला अनुसरून एक आदर्शात्मक भारताची खेडी आहेत हे मानून करण्यात आला.

प्रकार्यवादी अभ्यासकांनी खेड्यातील संस्कृती, धर्म इत्यादी गोष्टींना डोळयासमोर ठेवून त्यामध्ये होणारा बदल दाखवताना परंपरा व आधुनिकता हे द्वैत गृहीत धरले तर मार्क्सवादी अभ्यासकांनी खेड्यातील नेतृत्व, सत्ता संघर्ष या निगडित प्रक्रियांना महत्त्व दिले. अनेक अभ्यासकांनी खेड्यांचा वर्णनात्मक रचनेच्या स्वरूपात अभ्यास केला आणि खेडी एक स्वतंत्र व स्वयंपूर्ण केंद्र कशी आहेत हे दाखवले. त्यामुळे आज समाजशास्त्राला खेड्याच्या अभ्यासाकडे एक वेगळ्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक अहे.

### खेडेगावचा अभ्यास : एक व्यष्टी अध्ययनातून

यान ब्रेमण यांनी भारतीय खेड्यांचा अभ्यास नव्याने करण्याची गरज मांडली. त्यांनी आजपर्यंत खेड्यांचा अभ्यास हा वसाहतीकरण, राष्ट्रवादीकरण, विकासीकरण, मानवंशीकरण, पुर्नभेट व जागतिकीकरण अशा सहा टप्प्यांमध्ये झाला आहे. त्यामुळे खेडेगावचा इतर खेड्यांशी, शहरांशी, राज्यांशी असलेल्या संबंधाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. त्यांच्या मते आज खेड्याला 'एकक' मानून अभ्यास होणे गरजेच आहे. हे एकक मानताना प्रत्येक खेड्यातील कुटुंबाचा इतर कुटुंबाशी असलेला सहसंबंध, आंतरक्रिया, एका गावचा इतर गावांशी, शहरांशी, राज्यांशी, व्यापार, बाजारपेठा आप्तववस्था, विवाह इत्यादीमुळे येणारा संबंध तपासून पाहणे गरजेचे आहे. या संबंधामध्ये काळानुसार जे बदल झाले याची दिशा, गतीशीलता, बाहेरच्या जगाशी येणारा संबंध खालून वरती व वरून खाली कशा स्वरूपात

प्रस्थापित झाला याचा अभ्यास केला गेला पाहिजे. (Breman J. : 1997) हा अभ्यास पाहताना या ठिकाणी अकोळनेर या गावचा विचार करता येईल.

अकोळनेर हे खेडेगाव अहमदनगर शहरापासून १५ कि.मी. अंतरावरती आहे. या गावाची लोकसंख्या साधारणपणे ६००० च्या आसपास आहे. भारताच्या पारंपरिक रचनेनुसार या गावाचीदेखील जातीव्यवस्था आधारित रचना होती. गावातील वस्त्याही त्याच स्वरूपात होत्या. हे खेडेगाव साधारणपणे शेती आधारित आहे. मराठा जातीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे राजकीय क्षेत्रात मराठा जातीचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर आहे. शासकीय योजनांमुळे आणि शिक्षणामुळे या गावातील सर्व जातीच्या लोकांचा शैक्षणिक व आर्थिक स्तर उंचावलेला आहे. या गावचा १९५० पासून आर्थिक, सामाजिक व राजकीय इतिहास पाहिला तर या खेडेगावात औद्योगिकरण, नागरिकीकरण, लघुउद्योग,

३

विवाह, आप्तव्यवस्था, बाजारपेठा अशा विविध घटकांद्वारे अहमदनगर शहराशी शेजारच्या गावांशी सहसंबंध आलेला दिसतो. या घटकांशी आलेल्या सहसंबंधामुळे या गावात आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाबतीत अनेक स्थित्यंतरे घडून आलेली दिसतात. जसजशी स्थित्यंतरे घडून आली त्या त्या प्रमाणात आंतरक्रियात्मक गुंतागुंत वाढत गेली.

आज या गावच्या भौगोलिक व सामाजिक रचनेत मोठ्या प्रमाणावर बदल झालेला दिसतो. कारण शासकीय योजनांमुळे अनुसूचित जाती जमातीसाठी ज्या सुविधा आल्या त्याचा लाभ घेतल्यामुळे गावाची पूर्वीची जी सामाजिक रचना होती त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाला; परंतु हा बदल जातीव्यवस्था संपुष्टात येते असे सूचित करत नाही तर जातीव्यवस्थेची चौकट वेगळ्या पद्धतीने बसलेली दिसते. विवाहासारख्या घटकांमध्ये जातीव्यवस्था काटेकोरपणे पाळली जाते. दळणवळणाची साधने, उच्च शिक्षण, व्यवसाय यामुळे अहमदनगर शहर आणि अकोळनेर यामध्ये फारसा फरक राहिला नाही. नागरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती यामध्ये फारसा फरक पडत नाही तर त्यांची सरमिसळ झालेली दिसते. त्यामुळे आज या सहसंबंधाचे भान ठेवून खेड्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे गरजेचे आहे.

आज समाजशास्त्र मोठ्या स्वरूपात आपली कात टाकत आहे. त्यामुळे आज खेडेगावांचा अभ्यास ही सद्यस्थितीला अनुसरून एका विमर्शात्मक व आंतरविद्याशास्त्रीय दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. हाच प्रयत्न प्रस्तुत संशोधनपर लेखातून सांगण्याचा आहे. त्यामुळे समाजशास्त्राने फक्त समाजशास्त्राच्या अखत्यारित कोणते घटक येतात एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक अशा सर्वशास्त्रीय अंगाने विचार करून समाजशास्त्राला एक विकसित ज्ञानशाखा म्हणून मान्यता प्राप्त करून देणे हे आजच्या संशोधकाचे काम आहे.

## संदर्भ


1. Breman J. and P. Kools, ed. The Village in Asia Revisited, oxford universaity Press, 1997.
2. Dahiwale, S.M. Ed. Understanding Indian Society : The Non Brahmanic Perspective, New Delhi, Rawat Publications : 2005
3. पंडित न., जागतिकीकरण आणि भारत, मुंबई : लोकवाङ्मय गृह, २००१
4. बोबडे, भारतीय समाजरचना, नागपूर विद्या प्रकाशन, १९९६


✧ ✧ ✧ ✧ ✧

# शिक्षण : दहशतवादाच्या परिहाराचे एक साधन

डॉ. स्मृति भोसले *

'Terror' हा शब्द 'Terrere' या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे. याचा अर्थ 'घाबरवणे' असा आहे. 'Terror' म्हणजे भयानक भीती आणि 'Terrorist' म्हणजे अशी व्यक्ती की जी स्वत:ला हवे ते मिळवण्यासाठी हिंसेचा वापर करून किंवा धमक्या देऊन लोकांना किंवा सरकारला घाबरवण्याचा प्रयत्न करते.

दहशतवादी म्हणजे सर्वसाधारणपणे पाशवी किंवा क्रूर कृत्ये करणारी, जबरदस्त मानसिक हादरे देणारी, भीती, आक्रोश, यातनायुक्त वातावरण निर्माण करणारी व्यक्ती.

दहशतवादी कृत्यामुळे असहायता किंवा सर्वनाशाची भीती निर्माण करून, दहशतवादाच्या ताब्यात सापडलेल्या व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्याचा किंवा सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न होतो.

दहशतवादी विचारसरणीमागे कोणतेतरी ध्येय असते. दहशतवादी संघटनेत ध्येयधोरणांची एकवाक्यता असते. कठोर शिस्त अत्यंत आवश्यक असते. अंतर्गत बाबतीत शिस्त राखताना न्याय-अन्यायाचा विचार केला जात नाही. डावपेचाच्या बाबतीत असलेले मतभेद किंवा विवाद मोडून काढण्याकरता शिस्तीच्या बडग्याचा निष्ठूरपणे वापर केला जातो.

दहशतवादी निर्मिती सहसा लहानपणापासून काहीतरी 'हिरावून घेतल्याची' भावना, दारिद्र्य, अल्पसंख्यांकांचा दर्जा, मानवी हक्कांपासून वंचितता किंवा पूर्वग्रह इ. घटकांमुळे होते. आपल्यात काहीतरी कमी आहे ही बोचणी, भंगलेले व्यक्तिमत्त्व, एकलकोंडेपणा, कोठेही सामावू न शकलेले व विस्कळीत व्यक्तिमत्त्व, दुसऱ्यांच्या भावनांची कदर नसलेली अत्यंत आत्मकेंद्रित वृत्ती, आत्यंतिक निराशावाद ही दहशतवादी व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वसाधारण वैशिष्ट्ये आहेत. आपली ध्येय आपल्याला कायदेशीर मार्गांनी कधीच साध्य करता येणार नाहीत अशी त्यांची ठाम समजूत असते. तसेच आपली विचारसरणी योग्य व न्याय्य आहे यावर त्यांची नितांत निष्ठा असते. कायदा आणि सुव्यवस्था मोडून काढणे हाच त्यांचा उद्देश असतो.

मध्यपूर्वेकडील देशात शिक्षणाचा आणि संधींचा अभाव असल्याने तसेच दारिद्र्याचे प्रमाण जास्त असल्याने दहशतवाद जोपासला गेला आहे असे म्हटले जाते; पण खरे पाहता बरेचसे दहशतवादी हे सुशिक्षित आणि चांगले राहणीमान असणारे आहेत.

'Journal of Economics Perspectives (Fall 2003)' मधील "Education, Poverty and Terrorism : Is there a casual Connection?" या Alan Krueger आणि Jitka Maleckova यांनी लिहिलेल्या लेखात असे म्हटले आहे की, त्यांनी १९८७ ते २००२ या कालखंडातील ज्या २८५ पॅलेस्टिनीअन (Palestinian) दहशतवाद्यांचा अभ्यास केला की ज्यांनी आत्मघातकी बॉम्ब हल्ले केले आहेत; तेव्हा त्यांना असे आढळले की, त्यातील बहुसंख्य दहशतवादी हे माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षण घेतलेले तर काही कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेले होते. त्यातील दोघे तर अतिशय श्रीमंत घराण्यातील होते. यावरून हे लक्षात यते की, केवळ अज्ञान नव्हे तर ज्ञानही दहशतवादाला जन्म देते. दहशतवादी जितका अधिक शिक्षित, तितके त्याला राजकारणाचे, अर्थकारणाचे, जागतिक प्रश्नांचे ज्ञान अधिक आणि म्हणून त्याच्या भोवतालच्या

* समाजशास्त्र विभागप्रमुख, एल.जे.एन.जे. कॉलेज, विलेपार्ले, मुंबई

अन्यायकारी वातावरणात सुधारणा करण्यासाठी त्याच्याकडून मिळणारे उत्तर पाशवी स्वरूपाचे असते.

शिक्षणाचा प्रसार आणि वाढ झाल्यास दहशतवादाचे निर्मूलन होईल असे अनेक जणांना वाटते. कारण शिक्षित व्यक्ती चांगले व वाईट, योग्य आणि अयोग्य यांत फरक करू शकते. दहशतवाद्यांच्या केलेल्या अभ्यासात, दहशतवादी हे बरेचदा शिक्षित किंवा उच्चशिक्षित आढळले असले तरी शिक्षण हे निश्चितच दहशतवादावर नियंत्रण ठेवण्यात सकारात्मक भूमिका निभावू शकते. यादृष्टीने शिक्षणाचा एक साधन म्हणून वापर करता येणे शक्य आहे. एक असे साधन की ज्यामुळे लोकांना आपण शांतीने आणि एकजुटीने कार्य केल्यास बरेच काही साध्य करू शकतो याची जाणीव होऊ शकेल.

परंतु प्रश्न असा आहे की, जर लोक शिक्षण हे दहशतवादाच्या निर्मूलनाचे एक साधन आहे याचा पाठपुरावा करत असतील तर मग शिक्षणाचा प्रसार होत नाही. दहशतवाद का वाढतो आहे?

सध्याच्या शिक्षणव्यवस्थेत काही त्रुटी आहेत हे निश्चित. कोणतीही कृती विचारपूर्वक करायला हवी हे शिकवणे जरूरीचे आहे. शेजार-समुदायामध्ये आपलेपणा आणि परस्परांत सुरक्षिततेची भावना शिक्षणातून वाढीस लावणे महत्त्वाचे आहे. एकीकडे हिंसेला उत्तेजन देणारे टी.व्ही. वरील कार्यक्रम आणि दुसऱ्या बाजूने शैक्षणिक कार्यक्रमांतून नवनिर्माण क्षमतेचा अभाव यामुळे तरुणांमध्ये हिंसक कृत्यांचे प्रमाण वाढले आहे. दूरदर्शनचा वर्तनावर होणारा परिणाम शिक्षणातून नियंत्रित करता येईल. हिंसा व अत्याचार यावर नियंत्रण ठेवायचे असेल तर शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. ताठर शिक्षणव्यवस्था ही तरुणांमध्ये निराशाच निर्माण करते. शिवाय शिक्षण आणि व्यवसाय यांची सांगड घातली गेली नाही तर निराश झालेले सुशिक्षित तरुण गैरमार्गांकडे वळण्याची शक्यताही वाढते. दुसऱ्या बाजूने, शिक्षणाचा अभावही व्यक्तीला व्यवसायाच्या संधींपासून परावृत्त करतो आणि मग निराश झालेल्या व्यक्ती त्यांचे कुटुंब चालवण्यासाठी कोणताही मार्ग अनुसरतात. म्हणून शिक्षण व्यवस्थेने ताठर भूमिका न ठेवता ज्यांना लहानपणी शिक्षणाची संधी मिळाली नाही अशा तरुण पालकांसाठी शिक्षणाची दारे खुली करायला हवीत.

शिक्षणव्यवस्थेत लवचिकता असणे भावी पिढीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी पडणारे आणि गुन्ह्यांपासून परावृत्त करणारे मूल्य संस्कार रूजविण्याच्या दृष्टीने शिक्षण महत्त्वाचे आहे. तसेच स्वयंशिस्तीचे धडे आणि जबाबदारीची जाणीव करून देण्यातही शिक्षणाचा वाटा महत्त्वाचा आहे. मूल्यसंस्कार, स्वयंशिस्त आणि जबाबदारीची जाणीव नसेल तर वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञान हे व्यक्तींच्या दृष्टीने हानिकारक ठरू शकते.

दहशतवादाशी सामना कसा देता येईल हे शिकवणे, प्रत्येकाच्या मानवी अधिकाराचा आदर करण्यास शिकवणे, नेतृत्वावर विश्वास ठेवणे या गोष्टी शिक्षणातून साध्य करता येतील. 'ज्ञान हीच शक्ती' आणि 'शिक्षित राष्ट्र हेच शक्तिशाली राष्ट्र' असू शकते हे समजावून सांगण्यासाठी जनशिक्षण खूप महत्त्वाचे आहे. व्यक्तीचे आणि समाजाचे वर्तमान व भविष्य शिक्षणावरच अवलंबून आहे. सर्व नागरिकांना शिक्षण मिळाले तर लोकशाही राज्यव्यवस्थेत नागरिक पुरेशा प्रमाणात सहभागी होऊ शकतात. सर्व प्रकारच्या शासकीय तसेच स्थानिक पातळीवर प्रतिनिधी निवडून देताना नागरिक सर्व प्रश्नांचा विचार करून योग्य निर्णय घेऊ शकतात. शिक्षणामुळे, राज्य घटनेने प्रदान केलेल्या सुरक्षा व स्वातंत्र्याचा अधिकाराचा नेमका अर्थ समजून सर्व लोकांना त्यांच्या 'स्व-अधिकारांचे' महत्त्व कळू शकेल. जर शिक्षित व्यक्तींनी नि:स्वार्थी भावनेने देशहिताचा विचार केला तर राष्ट्राचा कारभार चांगल्याप्रकारे चालू शकेल तसेच नागरिकांवर परिणाम करणाऱ्या प्रश्नांबाबत निर्णय

घेण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होऊ शकेल.

दारिद्र्याचे चक्र आणि अज्ञान मोडून काढण्याचा आणि दहशतवादाविरुद्ध लढण्याचा 'उत्तम शिक्षण' हाच एकमेव मार्ग आहे. शिक्षण नसेल तर गरीब कुटुंबातील मुले लहान वयात विवाह करतील. अशिक्षित विवाहित जोडपी आपल्या मुलांनाही शिक्षणापासून वंचित ठेवतील. परिणामी, दारिद्र्य हे असेच पुढे सरकत राहील. त्यातून असे नागरिक निर्माण होतील की ज्यांची समजूत अशी असेल की त्यांच्या परिस्थितीला समाज किंवा राष्ट्रच जबाबदार आहे. अज्ञान आणि चुकीच्या समजुतीतूनच गुन्हेगार किंवा दहशतवादी निर्माण होतात ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी. (उदा. खऱ्या इस्लामी धर्माचे शिक्षण दिल्यास, चुकीच्या इस्लामी धर्माबाबतच्या मतांचा परिणाम मध्य पूर्वेकडील लोकांच्य विचारांवर होणार नाही.) २१ व्या शतकात, दहशतवाद कमी करण्यास आणि दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्यात 'चांगले शिक्षण' हेच सहायक ठरू शकेल.

बरेचसे दहशतवादी हे 'अधिकारांचा' आणि 'सत्तेचा अभाव' या कारणामुळे दहशतवादाचा मार्ग निवडतात. म्हणूनच लोकांना त्यांचे अधिकार आणि सत्ता यांची माहिती असायलाच हवी आणि त्यांचे अधिकार त्यांना उपभोगताही यायला हवेत. आपल्यालाही विशिष्ट अधिकार आहेत याची लोकांना जाणीव व आठवण करून देण्यासाठी शिक्षणाचा उपयोग व्हायला हवा. तसेच अंतर्गत कलह नाहीसे करण्यासाठी चर्चा आणि मध्यस्थीचा वापर व्हायला हवा. सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. लहानपणापासून होणारे संस्कार आणि शिक्षण यांचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर फार महत्त्वाचा परिणाम होतो. जर तरुणांना योग्य प्रकारे शिक्षण दिले, त्यांच्या चांगल्या वागणुकीबद्दल जर त्यांना प्रोत्साहन मिळाले तर ते हिंसेच्या मार्गाकडे वळण्याचे प्रमाण कमी होईल. मग प्रसारमाध्यमातून त्यांच्यावर कितीही प्रहार झाले तरी त्याचा त्यांच्या वर्तनावर परिणाम होणार नाही.

हिंसक किंवा हानिकारक वृत्ती नाहीशी करण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे. जर आपल्या मुलांच्या शाळेबाहेरील वर्तनाकडे जागरूकतेने लक्ष पुरवले तर तरुण मुले विघातक गोष्टींकडे वळणार नाहीत. पालक - मुले यांच्यातील संबंधाचा मुलांच्या वर्तनावर खूपच प्रभाव पडतो. जर किशोरवयीन मुलांवर दूरदर्शनचा विपरित परिणाम होत असेल तर आपली मुले दूरदर्शनवर नेमके काय पाहतात यावर पालकांनी अधिक लक्ष ठेवले पाहिजे. जर पालकांनी चित्रपटांतील हिंसा आणि एम.टी.व्ही. चे व्हिडिओज पाहण्यावर बंधन घातले तर मुले गुन्हेगारी टोळ्यांकडे, ड्रग्जकडे वळणार नाहीत किंवा हिंसकही बनणार नाहीत. बरेचसे पालक किशोरवयीन मुलांवर सर्व प्रकारचे नियंत्रण ठेवू शकत नाहीत किंवा मुले टी.व्ही. वर नेमके काय पाहतात. याकडे लक्ष पुरवू शकत नाहीत. तरीही पालकांनी आपल्या मुलांना एक अशी दृष्टी दिली पाहिजे की, ज्यायोगे ते अमली पदार्थ सेवनापासून स्वत:ला रोखू शकतील. कारण अमली पदार्थांच्या आहारी जाणे हा हिंसेकडे वळण्याचा एक मोठा मार्ग आहे. याबरोबरच मुलांच्या रिकाम्या वेळात त्यांना काहीतरी अर्थपूर्ण आणि सर्जनशील (Creative) गोष्टी करायला दिल्यास हिंसेकडे वळण्यावर आणि टोळया किंवा कंपूंमध्ये जाण्यावर प्रतिबंध ठेवता येईल.

जर मुलांना पैशाचे तसेच स्वत:च्या मेहनतीच्या कमाईचे मूल्य समजावून सांगितले (स्वत: काहीती तयार करून त्याची विक्री करून त्यातून कमाई उदा. 'Earn White you Learn' सारखी योजना) तर मुले टोळ्यांना जाऊन मिळणार नाहीत किंवा झटपट श्रीमंतीचा हव्यास त्यांना होणार नाही.

प्रश्न असा आहे की, पालकांनी आपल्या मुलांसाठी चांगले 'Role Model' व्हावे यादृष्टीने शिक्षण कसे सहायक ठरू शकेल? बरेचसे पालक हे स्वत: अशिक्षित असतात. कही वेळेला गरिबी इतकी असते की, रोजच्य

जेवणाचा प्रश्न जिथे समोर असते तिथे पालक आपली मुले काय करतात यावर पहारा करणे ही गोष्ट दूरच राहते. अनेक मुले अशी असतात की, ज्यांनी पालकांकडून "माझा तुझ्यावर विश्वास आहे", "तू फार चांगले काम करतो आहेस" असे शब्द कधी ऐकलेलेही नसतात. जे पालक मुलांशी प्रेमाने वागतात, त्यांना उत्तेजन देतात, त्या पालकांच्या किशोरवयीन मुलांच्या वागण्यात बराच फरक दिसून येतो. अर्थात जर पालकांना मुलांवर नियंत्रण ठेवणे अशक्य असेल, मुलांना योग्य ती दृष्टी देणे जमत नसेल तर मग मुलांना योग्य त्या भूमिकेसाठी तयार करणे ही शाळांची आणि शिक्षकांची जबाबदारी बनते.

किशोरवयीन मुलांमध्ये कल्पकता वाढवण्याला उत्तेजन देणे जितके आवश्यक तितकेच गुन्हेगारी कृत्यांना चालना देणाऱ्यांना शिक्षा देणेही महत्त्वाचे. जर दहशतवाद्यांबद्दल मवाळ धोरण ठेवले तर तरुण वर्ग गुन्हेगारी कृत्यांपासून परावृत्त होणे कठीण होईल. या दृष्टीने कायद्यांमध्येही परिवर्तन होण्याची गरज आहे. न्यायव्यवस्थेनेही गुन्हा आणि हिंसक कृत्यांचा गंभीरपणे विचार करणे जरूरीचे आहे.

किशोरवयीन मुलांवर टी.व्ही आणि चित्रपटांमधील हिंसक दृश्यांचा परिणाम तर होतच असतो; पण सेटेलाईट आणि केबल कार्यक्रमाचा परिणामही लक्षात घेण्याजोगा आहे. दूरदर्शनचा उपयोग शालेय विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम साधण्यासाठी करायला हवा. आपल्या पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीचे संस्कार मुलांवर घडवणे आणि त्यातून त्यांच्या संवेदना व्यापक करणे हे शिक्षणापुढचे एक आव्हान आहे. आपल्या संस्कृतीचे अध्ययन करण्यामुळे हिंसेविरुद्ध लढा द्यायला आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्याला मदत होऊ शकेल. लोकनीती, लोककथांमधून मिळणाऱ्या संदेशांमुळे 'आपण सर्व एक आहोत' ही भावना आणि समाजाची मूल्ये । प्रमाणके ही समाजाच्या भल्यासाठीच आहेत. ही जाणीव उत्पन्न व्हायला मदत होऊ शकेल. 'Skit', 'Role Play' चा शालेय अभ्यासक्रमात समावेश करून त्या माध्यमातून नीतीकथांमधील संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोचवणे शक्य होऊ शकेल. नीतीकथांमध्ये शेवटी तात्पर्य दिलेले असते. त्यातून एक धडा मिळत असतो. संस्काराचे कार्य करण्यात नीतीकथा महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. (औपचारिक व अनौपचारिक शिक्षणात याचा वापर करता येईल) तसेच ध्यानधारणा, योगविद्या याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छांवर, दुःखांवर ताबा कसा मिळवावा हे शिकवता येईल.

मौखिक संवाद (oral communications), Public Speaking याद्वारे शब्दांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना त्यांच्या भावना, त्यांचे विचार व्यक्त करायलाही वाव द्यायला हवा. विद्यार्थ्यांच्या भावना दाबून ठेवल्या तर त्यांचा स्फोट घातक मार्गांनी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विघातक कृत्ये किंवा गुन्हेगारी हे त्यांच्या समस्येचे उत्तर नाही हे त्यांना समजायला हवे. विद्यार्थ्यांना त्यांचा आवाज (Voice), 'Public Speaking' द्वारे मिळवून देता येईल. यासाठी अभ्यासक्रमात 'भूमिका-अभिनय' (Role Play) आणि 'सर्जनशील लेखन' (Creative Writing) चा समावेश करावा लागेल. तसेच, मानव्यविद्या शाखांतून (Humanities Courses) आपल्या भावना व्यक्त करणे मुले शिकू शकतील. मात्र त्यासाठी शिक्षणपद्धती लवचिक असणे आणि मुलांना तशी संधी मिळणे जरूरीचे आहे.

शालेय व्यवस्था ताठर असली, मुलांवर दबाव टाकणारी असली तर मुले निराश होणारच. विफलतेच्या आहारी जाऊन हिंसक कृत्ये करणाऱ्या व स्वतःचाही घात करून घेणाऱ्या तरुणांचे प्रमाण पाश्चात्य देशात तर फारच वाढले आहे. भारतातही शिक्षणव्यवस्था आणि पालक विद्यार्थ्यांवर बराच दबाव आणतात. परीक्षेत नापास होण्याची भीती किंवा नापास होणे म्हणजे पुढे आशादायी काहीच उरलेले नाही ही भावना विद्यार्थ्याच्या मनात कमालीची निराशा निर्माण करणारी आहे. "Demanding Academic System" ही विघातक वर्तनाला / हिंसेला निश्चितपणे जबाबदार ठरते. जर

ताठर शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजांमध्ये रिव्हॉल्व्हर आणण्यास, शिक्षकांवर/विद्यार्थ्यांवर गोळ्या झाडण्यास भाग पाडत असेल आणि विद्यार्थ्यांना स्वतःचाही घात करण्यास उद्युक्त करत असेल तर मग ती शिक्षणव्यवस्थाच वादग्रस्त आहे असे समजायला हरकत नाही.

हिंसा ही ज्वालामुखीसारखी आहे. ती भडकली तर बरीच घातक आहे. आपल्या सामाजिक - आर्थिक दर्जामुळे, अशिक्षितपणामुळे किंवा नोकरी - व्यवसायाच्या अभावामुळे निराश झालेले युवक हिंसेला खतपाणी घालतात. त्यांच्या भावना व्यक्त करण्याचा दुसरा मार्ग त्यांना माहीत नसतो आणि त्यांच्या खवळलेल्या भावना शांत करणेही अशक्य असते; परंतु शिक्षणाच्या माध्यमातून यावर प्रतिबंध ठेवणे खात्रीने शक्य होऊ शकेल. अहिंसेच्या मार्गाने आपल्या भावना जनतेसमोर व्यक्त करण्याचे शिक्षण 'role play' आणि 'oral communication' च्या द्वारे शक्य आहे. शिक्षकांनी श्रोत्याची भूमिका घेऊन विद्यार्थ्यांचे विचार लक्षपूर्वक ऐकले पाहिजेत, त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. त्याचबरोबर त्यांना मार्गदर्शनही केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या स्फोटक भावनांवर बंदी घालण्यात, त्यांना हिंसेपासून परावृत्त करण्यात आणि पुन्हा सामुदायिक - सांस्कृतिक मिलाफ घडवून आणण्यात शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, दहशतवादाला शिक्षण हेच एक उत्तर आहे. समीक्षात्मक आणि सर्जनशील विचार, आदर आणि जबाबदारी तसेच नवनिर्मायक सकारात्मक परिवर्तनाची साधने हे सर्व स्वस्थ व सुखदायी भविष्याचे मार्ग आहेत. शिक्षणाच्या ध्येयांचा पुनःर्विचार करण्याची गरज आहे. शिक्षणाचे ध्येय, शांती कशी राखावी हे विद्यार्थ्यांना शिकवणे हे आहे, नैतिकता व चारित्र्याची घडण करणे हे आहे. माणुसकीचे धडे देणारे शिक्षणच समाजातील दडपण, जुलूमजबरदस्ती, शोषण आणि विनाश थांबवून शांतीपूर्ण, शाश्वत आणि मानवतावादी जगताकडे समाजाची वाटचाल घडवून आणू शकेल. दारिद्र्यावर मात करण्याच्या दृष्टीने, स्वास्थ्यदायी भविष्य घडवण्याच्या दृष्टीने शिक्षण हाच सामर्थ्यशाली घटक आहे.

## संदर्भ


1. Becker, Grary S. (1968) : "Crime and Punishment : An Economic Approach", Journal of Political Economy, March/April, 76:2
2. Berrebi Claude (2003) : "Evidence About the Link Between Education, Poverty and Terrorism among Palestinians", Mimeo, Princeton University.
3. Combs, Cindy C & Martin W. Slann. (1997) : International Encyclopedia of Terrorism. Chicago and London : Fitzroy Dearborn Publishers.
4. Freedman Lawrence Z.& Alexander Yonah (ed.), (1985) : "Perspectives on Terrorism", Hindustran Publishing Corporation (India), Delhi.
5. Freeman Richard (1996) : "Why do so many young American Men Commit Crimes and what might we do about it?", Journal of Economic Perspectives, Winter, 10:1.
6. Piehl, Ane Morrison (1998) : "Economic Conditions, Work and Crime", in handbook on crime and Punishment, Michael Tonry, (ed.), Oxford : Oxford University Press.
7. Wilkinson Paul (1977) : "Terrorism and the Liberal State, The Mac Millan Press Ltd., London."


✧ ✧ ✧ ✧ ✧

# ७४ वी घटना दुरूस्ती आणि महिला नेतृत्व, सबलीकरण व परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्यास, विशेष संदर्भ बीड जिल्हा

डॉ. प्रमिला जाधव *

**प्रस्तावना**

१९ व्या शतकातील समाजसुधारकांनी प्रथमच स्त्रियांना समाजात दिला जाणारा विषम दर्जा व वागणुकीचा प्रश्न उपस्थित केला. राजाराम मोहनरॉय, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, महादेव रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर अनेकांनी स्त्रियांच्या समाजातील स्थानाविषयी चिंता व्यक्त केली.

१५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्यानंतर नव्या भारताचा आराखडा मांडायला सुरूवात झाली. पहिल्याच टप्पयावर देशातील सर्व नागरीकांना समतेची ग्वाही देणारी सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय देणारी, अविष्कार, धर्म आणि मतांचे स्वातंत्र्य देणारी 'राज्यघटना' स्वीकारण्यात आली. या 'राज्यघटनेचा' आधार घेऊन देशात पुन्हा एकदा 'स्त्री-पुरूष समानता' हा संदर्भ घेऊन वैचारिक लढा सुरू झाला. या वैचारिक लढ्याचा परिणाम म्हणून भारत सरकारने महिलांच्या जीवनात सर्वांगिण परिवर्तन घडवून आणण्यासाठी विविध स्वरूपाचे धोरणात्मक निर्णय घेतले.

१९९२ मध्ये भारत सरकारने ७३ वी व ७४ वी घटना दुरूस्ती करून 'स्थानिक स्वराज्य संस्थेत' महिलांना ३३% आरक्षण देऊन संपूर्ण जगात पहिल्यांदाच महिलांच्या जीवनात क्रांतीकारी ठरेल असा निर्णय घेतला. २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींच्या सहीने स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांना ३३% आरक्षणाचे विधेयक संमत झाले आणि तेव्हापासून संपूर्ण देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नव्या युगाला प्रारंभ झाला. यातील ७४ वी घटना दुरूस्ती 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या' संदर्भात आहे. या दुरूस्ती अधिनियमाच्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेस "भाग ९ अ नगरपालिका" या शिर्षकाने हे दुरूस्ती विधेयक जोडण्यात आले. घटनेच्या कलम २४३ मध्ये बदल करून (२४३)(प) ते २४३ (झ.ज.) अशी सुधारणा करून त्याला १२ वे परिशिष्ट जोडून त्यात अठरा विषय समाविष्ट केले.[१] या दुरूस्ती विधेयकातून सत्तेच्या विकेंद्रीकरणा बरोबरच समाजातील उपेक्षितांना आणि महिलांना खऱ्या अर्थाने न्या मिळाला ही भावना तयार झाली. महिलांच्या जीवनात आता परिवर्तन होईल, महिलांचा राजकीय सहभाग वाढेल, प्रभावी महिला नेतृत्व उदयास येईल अशी खात्री निर्माण झाली.

परंतु भारतातील महिलांचा सामाजिक-आर्थिक व राजकीय दर्जा उंचावण्याच्या संदर्भात शासकीय पातळीवर आवश्यक ते प्रयत्न होऊन देखील आज पुन्हा एकदा स्थानिक स्वराज्य संस्थेत नेतृत्व करणाऱ्या महिलांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले जात आहेत ३३% आरक्षणाच्या माध्यमातून महिलांचा सामाजिक, राजकीय दर्जा उंचावला काय? सामान्य महिलांना राजकीय वाटा मिळाला काय? महिलांचा राजकीय सहभाग दर्जा उंचावला काय? प्रभावी महिला नेतृत्व उदयास आले काय? ज्या महिला स्थानिक स्वराज्य संस्थेत लोकप्रतिनिधी म्हणून भूमिका करतात त्या केवळ नावाला असतात त्यांच्या अडून पुरूषच राजकारण खेळतात. असे विविध प्रश्न आज निर्माण केले जात आहेत.

वरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील मागासलेला जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्याची निवड करून त्या अंतर्गत असलेल्या बीड, माजलगाव, गेवराई, धारूर, अंबाजोगाई, परळी, या तालुक्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत लोकप्रतिनिधित्व करणाऱ्या निर्वाचित महिला सदस्यांचा ७४ वी घटना दुरूस्ती आणि महिला

* समाजशास्त्र विभागप्रमुख, बलभीम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बीड

नेतृत्व, सबलीकरण व परिवर्तनः एक समाजशास्त्रीय अभ्यास, विशेष संदर्भ बीड जिल्हा, या अनुषंगाने व्यापक स्वरूपातून अभ्यास केलेला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्टे**

१) ७४ व्या घटना दुरूस्तीमुळे बीड जिल्ह्यातील नगर परिषदांमध्ये लोकप्रतिनिधि म्हणून, वावरणाऱ्या महिलांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय पार्श्वभूमी जाणून घेणे.

२) राजकारणामध्ये वावरणाऱ्या महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन किंवा सार्वजनिक जीवनात वावरत असतांना त्यांना कोणत्या समस्या उद्‌भवतात किंवा त्यांना कुटुंबियाकडून कशी वागणूक मिळते हे जाणून घेणे.

३) ७४ व्या घटना दुरूस्तीमुळे जवळपास १५० लाख महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करत आहेत परंतु खऱ्या अर्थाने त्यांना राजकीय स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य आहे काय? किंवा यातून महिलांचा सामाजिक दर्जा उंचावला काय? किंवा सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली काय?

**७४ व्या घटना दुरूस्तीनंतर**
**महिला नेतृत्वाचे स्थानः बीड जिल्हा**
**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | नगर परिषद | महिला प्रतिनिधींची संख्या |
|---|---|---|
| १ | बीड | १३ |
| २ | परळी | ११ |
| ३ | अंबाजोगाई | १० |
| ४ | माजलगांव | ०८ |
| ५ | धारूर | ०६ |
| ६ | गेवराई | ०६ |
| | **एकूण** | **५४** |

२

वरील माहिती नुसार बीड जिल्हयातील नगर परिषदेमध्ये ७४ व्या घटना दूरूस्तीनंतर एकूण ५४ महिलांना सद्स्यत्व मिळाले. यावरून हे स्पष्ट होते की, ७४ व्या घटना दुरूस्ती पूर्वी बीड जिल्ह्यात केवळ ०९ महिला सदस्य होत्या. परंतु घटना दुरूस्तीमूळेच महिला सद्स्यांची संख्या वाढली हे स्पष्ट दिसून येते.

**नगरपरिषद सदस्यत्वाचा अनुभव**
**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | सद्स्यत्वाचा अनुभव | उत्तरदात्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | पहिलीच वेळ | ५० |
| २ | दुसरी वेळ | ०४ |
| ३ | तीसरी वेळ | ०० |
| | **एकूण** | **५४** |

३

व्यक्तीला कोणत्याही क्षेत्रात सक्षम, प्रभावी भूमिका पार पाडण्यासाठी अनुभव हा घटक महत्वपूर्ण असतो. राजकारणा सारख्या क्षेत्रात अनुभव हा घटक खूपच महत्वाचा मानला जातो.

बीड जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत लोक प्रतिनिधीत्व करणा–या महिलांना नगर परिषद सदस्यत्वाचा अनुभव पहिलाच आहे काय असा प्रश्न विचारला असता. पहिलीच वेळ आहे असे ५० महिला म्हणाल्या तर दुसरी वेळ आहे. असे केवळ चार महिला म्हणाल्या याच दरम्यान महिलांना नगर परिषदमध्ये नेतृत्व करताना काही अडचणी येतात काय असा प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की सुरूवातीच्या काळात अडचणी उद्‌भवल्या परंतू नंतर सर्व कारभाराची माहिती झाली.

### राजकीय स्वातंत्र्य आणि निर्णय स्वातंत्र्य

**तक्ता क्र. ३**

| अ. क्र. | राजकीय निर्णय स्वातंत्र्य | उत्तरदाते |
|---|---|---|
| १ | होय | १० |
| २ | नाही | ४४ |
| | **एकूण** | **५४** |

४

वरील तक्ता हे स्पष्ट करतो की, १० महिलाच्या म्हणण्यानुसार त्यांना लोक प्रतिनिधी म्हणून कार्य करित असताना राजकीय स्वातंत्र्य आणि निर्णयांचे स्वातंत्र्य मिळाले तर ४४ महिलांना स्वातंत्र्य मिळत नाही. असे सांगितले यावरून बहुतेक महिला राजकारणात नावाला असतात. असे दिसून येते.

### ७४ व्या घटना दुरूस्ती बाबत माहिती

**तक्ता क्र. ४**

| अ. क्र. | राज्य घटनेची माहिती | उत्तरदाते |
|---|---|---|
| १ | होय | ५१ |
| २ | नाही | ०३ |
| | **एकूण** | **५४** |

५

भारतीय राज्यघटना देशातील सर्वोच्च कायदा आहे. परंतु या संदर्भात लोकप्रतिनिधी गांभीर्याने अभ्यास करतात काय हा एक महत्वाचा प्रश्न भारतात निर्माण झाला आहे. राष्ट्रीय आणि राज्यपातळीवरील प्रतिनिधि या बाबत अभ्यास करीत असतील, परंतु महिला लोकप्रतिनिधी या संदर्भात अधिक जागृत असाव्यात ही मोठी अपेक्षा बाळगली जाते.

या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील नगर परिषदामध्ये नेतृत्व करणाऱ्या महिला प्रतिनिधिना वरील प्रश्न विचारला असता. केवळ ०३ महिलांनी या बाबत होय असे उत्तर दिले. मिळालेले उत्तर स्पष्ट करते की, आज देखील राज्यघटने संदर्भात महिलांमध्ये फारशी जागृती झालेली नाही. ज्या घटनादुरूस्तीमुळे महिला राजकारणात आल्या तथा घटना दुरूस्ती विषयी त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. परंतु त्यांना या बाबत फारशी माहिती नाही हे या पाहाणीतून स्पष्ट झाले.

### संशोधनातील ठळक निरिक्षणे

पुरूषांचे क्षेत्र समजल्या जाणाऱ्या राजकारणात आज एक तृतीयांश महिला ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे थेट सत्तेच्या राजकारणात आल्या. नगरसेवक, नगरपरिषद अध्यक्ष, महापौर अशा महत्वाच्या पदावर भुमिका करू लागणाऱ्या महिलांच्या ह्या राजकीय जीवनाचा अभ्यास करण्यासाठी बीड जिल्ह्यातील काही महिलांची संदर्भ म्हणून निवड केली. त्या अभ्यासातून जी माहिती मिळाली त्याबाबतची काही निरिक्षणे.

१) प्रथम निवडून आलेल्या बहुसंख्य महिला लोकप्रतिनिधींचा प्रथम कालखंड निष्प्रभ ठरलेला दिसला. त्याच्या बाबत नाममात्र अशी नकारात्मक भूमिका दिसून आली. आज तिसऱ्या कार्यकालापर्यंतचा त्यांचा प्रवास मात्र आशादायक वाटतो. शहरी भागातील नगर सेविका त्यांच्या पातळीवर राजकारणात प्रसिध्द झाल्या. विकासाचा प्राधान्य क्रम ठरवून पाणी, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, रस्ते, असे मुलभूत प्रश्न प्राधान्याने हाताळणाऱ्या महिला लोकप्रतिनिधी या पाहाणीतून दिसल्या अनेकांनी राजकारणाला एक नवे रूप देऊन राजकारणात आपली एक प्रतिमा निर्माण केली आहे. पुरूष राजकारण्यांकडून होणाऱ्या अवमानाला काही महिलांनी मोठ्या ध्यैर्याने आणि संयमाने तोंड दिले आहे.

२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांत वावरणाऱ्या महिला प्रतिनिधिंची दुसरी ही एक बाजू या संशोधना दरम्यान दिसून आली. नमुना निवडीतील काही महिलांनी एक कार्यकाळ संपल्यानंतर पुर्णतः राजकिय संन्यास घेतला आणि पुनश्चः चार भिंतीमधील संसारी जीवन

आपलेसे केले. राजकिय पटलावरून अशा अचानक गायब झालेल्या महिला मोठ्या प्रमाणात दिसल्या. त्यामागही संसारी स्त्रियांसाठी राजकारण हा तात्पुरत्या उद्योग ठरला. याशिवाय राजकारणाचा ढासळेत जाणारा दर्जा, राजकिय मुल्यांची होत जाणारी घसरण, महिलांचे केले जाणारे चरित्र्य हनन, राजकारणातील गुंडगिरी, यांचा शहरी राजकारणावर वाढत जाणारा प्रभाव, इत्यादीमुळे बहुसंख्य महिला राजकीय प्रवाहापासून अंतरावर आहेत हे या पाहाणीत दिसले.

३) ७४ व्या घटना दुरूस्तीचे सर्वच महिलांनी समर्थन करून या घटना दुरूस्तीमुळेच महिला सत्तापदावर आल्या हे मान्य केले. मात्र अलीकडे राजकारणाचे संदर्भ बदल असल्याने महिलांवर यांचे परिणाम होतात हे सर्वच महिलांनी मान्य केले. शिवाय शासनाचे मोठे पाठबळ महिलांना मिळत आहे. असे या पाहाणीतून दिसले. या निरिक्षणाधारे काही निष्कर्ष पुढील प्रमाणे –

**काही निष्कर्ष**

१) ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्व करण्याची संधी मिळाली असली तरी सामान्य, गरिब, कोणतेही राजकिय पार्श्वभूमी नसणाऱ्या महिलांना राजकारणात संधी सहज मिळत नाही.

२) कुटुंबप्रिय स्त्रियांसाठी राजकारण, समाजकारण हा तात्पुरता उद्योग ठरतो आहे.

३) बीड जिल्ह्यातील नगर परिषदांमध्ये ७४ व्या घटना दुरूस्तीनंतर महिला सदस्यांची संख्या वाढली ७४ व्या घटनादुरूस्ती पूर्वी केवळ ०९ महिला सदस्या होत्या, दुरूस्तीनंतर महिला सदस्यांची संख्या ५४ झाली.

४) नगरपरिषदेमध्ये नेतृत्व करणाऱ्या बहुतांशी महिला प्रतिनिधिना राजकिय पार्श्वभूमी असते.

५) महिलांना ७४ व्या घटना दुरूस्ती विषयी फारशी माहिती नाही.

**प्रमुख शिफारशी**

१) सुशिक्षित स्त्रियांनी काळाचये भान ठेवून आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या संभाळून पुन्हा एकदा सार्वजनिक जीवनात सहभागी होऊन नव्याने वैचारिक लढा उभा करण्याची आवश्यकता आहे.

२) महिलांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी मेळावे, चर्चासत्रे, प्रशिक्षण, संमेलने, परिषदा असे कार्यक्रम आयोजित करावेत.

## संदर्भ


१) टि. एन. गायकवाड – महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन, प्रगती प्रकाशन, नागपुर, जुन, २००९, पृ.२१८,२११९

२) स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणी सन– २०११

३) प्रत्यक्ष नमुना पाहणी, सन २०११

४) प्रत्यक्ष नमुना पाहणी, सन २०११

५) प्रत्यक्ष नमुना पाहणी, सन २०११

६) साने गिता – ऑगस्ट १९८६ – मुंबई, भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशनग्रह–खटाववाडी – मुंबई

७) साळुंके आ.ह. हिन्दु संस्कृती स्त्री – प्रकाश विस्वासराव लोकवाड्मय ग्रह भुपेश गूप्ता भवन – मुंबई

८) महाजन टी.टी. – मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन – प्रकाशक – राजेंद्र वडनेर कुलसचिव ... नाशिक

९) मोरे दिनेश – शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टीकोन – चिन्मय प्रकाशन – औरंगाबाद


✧ ✧ ✧ ✧ ✧

# ग्रामीण मातंग स्त्री: एक सामाजिक वर्जित समूह

## ( विशेष संदर्भ: परभणी जिल्हा )

डॉ. विजय सूर्यवंशी *

डॉ. रामचंद्र भिसे **

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात अनूसूचित जातीमध्ये एकूण ५९ जातीचा समावेश होतो. त्यापैकी महार जात ३५.५१ टक्के, मातंग जात ३२.६५ टक्के, चांभार जात २२.६६ टक्के आहेत. या प्रमुख तीन जाती मिळून एकूण अनूसूचित जातीच्या एकूण टक्केवारीत ८९.६९ टक्के आहेत, तर बाकी इतर १६ जाती मिळून एकूण अनूसूचित जातीच्या टक्केवारीत १०० टक्के आहे. महाराष्ट्रात अनूसूचित जातीत एकूण लोकसंख्येत महार जातीच्या लोकसंखेनंतर मातंग जातीची संख्या हीअधिक आहे. त्यामूळेच अनूसूचित जातीत समाविष्ट असणारी मातंग ही जात महाराष्ट्राच्या बहुतेक गावांमध्ये वास्तव्यास असलेला दिसून येते अनूसूचित जातीतील वर्जीत दलित समूह म्हणून मातंग जातीची ओळख आहे. जातीच्या श्रेणीरचनेत मातंग जातीचे स्थान कनिष्ठ असलेले दिसून येते.

मातंग स्त्री कनिष्ठ जातीतील असल्यामूळे जातीच्या बंधनाला बळी पडते मातंग जातीतील स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट आहे. मातंग माता भगिणीच्या इज्जती लूटल्या जात आहेत. मातंग स्त्रियावर जातीची व धर्माची बंधने टाकली आहेत. या बंधनामध्ये तिला आपले जीवन जगावे लागते. सामाजिक बहिस्कृत जात म्हणूनही तिची ओळख आहे. गावामधील अस्पृष्य कनिष्ठ जातीतील स्त्री म्हणून तिच्या अनेक कार्यक्रमामधून सामाजिक बष्क्रित केले जाते तिच्या वरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. मातंग जातीने स्त्रियावर अनेक प्रकारची बंधने टाकलेली आहेत. मातंग जातीची निर्बंध तिच्यावर टाकून तिला अनेक जीवनावश्यक बाबीपासून मुलभूत हक्कापासून तसेच सामाजिक, आर्थिक , राजकिय, शैक्षणिक , धार्मिक इ. बाबीपासून दूर ठेवलेले आहे. त्यामूळेच मातंग स्त्री ही समाजातील एक वंचित व वर्जित असलेला समुह म्हणूनच तिची ओळखत होते.

प्रा. सुजाता पटेल यांनी सामाजिक वर्जितपणाची संकल्पना ही समाज जीवनातील सहभागित्वाचा प्रशनावर मांडलेली आहे. सामाजिक वर्जितपणाचे पाच प्रमुख घटक सांगितले आहेत. त्यामध्ये निर्वाह संदर्भातील अनुभव, पायाभूत सूविधा व सेवांविषयीचे अनुभव, समुहाचे अनुभव, नागरिकत्वाचा विषयीचे अनुभव, नैतिक अनुभव या घटकांचा समावेश होतो या घटकांचा आधार घेतच प्रस्तुत शोध निबंधातून ग्रामीण मातंग स्त्रीयांचा समूह कसा सामाजिक वर्जित समूह आहे याचा आढावा घेतलेला आहे.

**निर्वाहाच्या संदर्भातील अनुभव :-**

**१. नियमीत कामाचे स्वरुप :-**

ग्रामीण मातंग स्त्रियांना मजूरीचे काम कसे उपलब्ध होते. मातंग स्त्रियांना जे काम मिळते ते महिण्यातून किती दिवस असते ते जाणून घेण्याच्या हेतूने उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रियांकडून संबंधित तथ्य केली आहे. त्या आधारे असे स्पष्ट करता येते की उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रियांना महिण्यातून फक्त २० दिवस मजूरीचे काम मिळते.

अशा सर्वाधिक म्हणजेच ५७.७८ टक्के ग्रामीण मातंग स्त्रियांनी सांगितले आहे. तसेच महिण्यातून फक्त

* समाजशास्त्र विभागप्रमुख, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

** समाजशास्त्र विभागप्रमुख, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, जि. नांदेड

दहा दिवस मजूरीचे काम मिळते असे २३.५५ टक्के स्त्रियांनी सांगितले आहे, तर केवळ घरकाम करत असल्यामुळे लागू नाही असे १८.६७ टक्के स्त्रियांनी सांगितले आहे. मातंग स्त्रिया हयांना नियमीत व सातत्याने काम मिळत नसल्यामूळे हा समुह नियमित रोजगारापासून वचित, वर्जीत समुह असलेला दिसतो. निर्वाह विषयक अनुभव पाहिला तर नियमित कामापासून हा वर्जीत समुह आहे.

**२. अतिरिक्त श्रम :-**

ग्रामीण मातंग स्त्रियांना कुटूंबातील एक मुलभूत गरज म्हणून स्वंयपाकासाठी लागणारे इंधन म्हणून सरपण गोळा करावे लागते. सरपण गोळा करतांना शारीरिक श्रम व वेळ दोन्ही दलित स्त्रियांना द्यावा लागतो सरपण गोळा करण्याचे काम दलित कुटूंबातील कोणत्या व्यक्ती करतात सरपण गोळा करण्याच्या पाठीमागे कुटूंबात लिंग भेदाची स्त्री-पुरुष कामाची विभागणीची भावना असते का उत्तरदात्या मातंग स्त्रियांच्या कुटूंबात प्रामुख्याने सरपण गोळा करण्याचे काम कोणतीव्यक्ती करते हे जाणून घेण्याच्या दृष्टीने संबंधित तथ्य संकलीत करण्यात आली आहेत. त्यानुसार उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रियांच्या कुंटूंबात सरपण आणण्याची प्रमुख भूमिका ही स्त्रियांना पार पाडावी लागत. असल्याचे दिसून येते.

ग्रामीण मातंग कुटूंबात सरपण आणण्याचे काम कुटूंबातील पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना अधिक प्रमाणात करावे लागते सरपण गोळा करण्याच्याकामाच्या विभागणीत लिंगभेदाची भावना असली दिसून येते. त्यामूळे हे अतिरिक्त परंतू अनिवार्य काम विना मोबदला मातंग स्त्रियांना करावे लागते. कनिष्ठ जातीतील स्त्री म्हणून स्वंयपाकासाठीचे आधुनिक साधने उपलब्ध नसल्यामूळे या स्त्रियांना अतिरिक्त श्रमाला सामोरे जावे लागते.

**३. मनोरंजन व दळणवळण साधने :-**

ग्रामीण मातंग स्त्रियांच्या जीवनावर त्यांच्या वस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या सेवा सुविधाचा परिणाम होतो तसाच त्यांच्या कुटूंबाकडे वापरता असलेल्या वेगवेगळया वस्तुंचा देखील परिणाम स्त्रियांच्या स्थानमानावर होतो कुंटूंबामध्ये वापरता असलेली मनोरंजनाची साधने किती आहेत. दळणवळणाची साधने किती प्रमाणात उपलब्ध आहेत. या आधारे त्यांच्या जीवनमानाचा दर्जा विषयी अंदाज येतो त्यासाठी उत्तरदात्या मातंग स्त्रियांच्या कुंटूंबाकडे वापरत असलेल्या वस्तू कोणत्या आहेत. यासंबंधी माहिती संकलित केली आहे. त्यानुसार उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रियांच्या कुटूंबामध्ये प्रसार माध्यमाचे व मनोरंजनाचे साधने म्हणून रेडीओचा वापर केला जातो असे १६ टक्के स्त्रियांनी सांगीतले आहे टी.व्ही.चा मनोरंजनाचे साधन म्हणून वापर केला जातो असे १३.७८ टक्के स्त्रियांनी सांगीतले आहे. डी.टी.एच चा वापर करणारे २.६७ टक्के कुटूंब आढळून आली. टेपरेकॉर्डर वापर करत असलेले कूटूंब २.२२ टक्के आहेत. तर व्ही.सी.डी वापर करीत असलेले कुटूंब ०.४४ टक्के आहेत.

कुटूंबाकडे वाहतूक व दळणवळणाची कोणती साधने उपलब्ध आहेत त्या विषयी माहिती मिळवली त्या आधारे असे लक्षात आले की सायकलचा वापर करणारे ८.८९ टक्के कुटूंब आहेत. दुचाकीवाहन वापरणारे १.३३ टक्के आहेत. तर ऑटो-रिक्षा/रिक्षा चा वापर करणारे १.३३ टक्के आहेत. मनोरंजन व वाहतूक दळणवळणाची एक ही वस्तुनाही असे ६२.६७ टक्के आहेत. मनोरंजन व वाहतुकीची साधने या पासून सुध्दा मातंग स्त्रीयांचे कुटूंब वंचित असलेले दिसून येते.

**नागरीकत्वाचा विषयी अनुभव :-**

**१. मतदानासंबंधी अनुभव :-**

उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रिया हया मतदान करुन राजकिय प्रक्रियेत सहभाग नोंदवत असल्या, तरी एक स्त्री म्हणून तिला तिच्या इच्छे प्रमाणे मतदान करता येत नाही. कुंटूंबातील सदस्यांच्या मतानुसार ती आपले मतदान करणा-या स्त्रिया ५८.६७ टक्के आहेत. तर कोणाचाही सल्ला न घेता स्वत:च्या इच्छूसार मतदान

करतात अशा २१.७७ टक्के स्त्रिया आहेत. मतदानाच्या वेळी मुलगा सल्ला देतो त्यानुसार मतदान करतो असे १३.३३ टक्के स्त्रियांनी सांगीतले आहे. वस्तीवरील नेते जे सांगातात त्यानुसार मतदान करतो असे ३.५६ टक्के स्त्रियांनी सांगीतले तर मतदान करत नाही म्हणून लागू नाही असेक १८ टक्के आहेत तर सासरे यांच्या सल्यानुसार मतदान करतो असे ०.८९ टक्के स्त्रियांनी सांगीतले आहे. मातंग स्त्रिया कुटूंबातील पुरुषाच्या सल्ल्याने मतदान करतात.

**संपत्तीचे मालकीचे अधिकार नसणे :-**

उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रिया हया अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट आहेत त्यामुळे जी भारतीय पातळीवर अनूसूचित जातीची स्थिती आहे, त्यापेक्षा ही अधिक प्रमाणात हया स्त्रिया भूमिहिन असलेल्या दिसून येतात भूमीहिनामध्ये ९१.५६ टक्के स्त्रियांचा समावेश आहे, कारण या स्त्रियांनी कुटूंबाकडे जमिन नसल्याचे सांगीतले, तर जमीन आहे असे सांगणाऱ्या फक्त ८.८८ टक्के स्त्रिया आहेत.

भारतीय इतिहासातील नोंदीवरुन असे दिसते की, शेतीचा शोध स्त्रियांनी लावला, निर्मितीचा संबंध स्त्रियांशी आहे. म्हणून ती जगाची निर्मितीची जननी आहे तरी देखील आज स्त्रियांना जमीन व संपत्तीत अधिकार असून नसल्या सारखा आहे.

**निष्कर्ष :-**

सामाजिक वर्जितचे जे पाच प्रमुख घटक सांगीतलेले आहेत त्या आधारे पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

१. मातंग स्त्रीयांचा निर्वाहाच्या संदर्भातील अनुभवाचा विचार कृा तर असेच लक्षात आले की आज ही महिण्यातून ३० दिवस रोजगार उपलब्ध होत नाही. नियमीत रोजगारापासून तिला वंचित राहावे लागते.

२. पायाभूत सुविधा व सेवा विषयक अनूभव पाहिले तर स्वंयपाकासाठी साधन म्हणून आजही चूलीचा वापर करतात गॅस , स्टोव्ह, बायोगॅस ,विद्युत शेगडी , सौर उर्जेवरील उपकरणे या पासून ग्रामीण मातंग स्त्रीयांची कुंटूंबे हि वर्जीत असलेली दिसून येतात.

३. सरपण गोळा करणे हि अतिरिक्त काम उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रीला करावे लागते.

४. उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रीयांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण ७६.८९ टक्के आहे. तर अर्धवट शिक्षण बालविवाह आर्थिक परिस्थितीमूळे झालेले आहे. पाल्यामध्ये शिक्षण घेण्याचे प्रमाण ७५ टक्क आढळून आले आहे. पण पाल्याचे शिक्षण अनेक कारणामुळे पूर्ण होत नाही. ते शिक्षण प्रवाहाच्या बाहेर पडतात.

५. उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रियांची कुंटूंब ही मनोरंजनाची वाहातूक दळणवळणाची साधने यापासून वंचित आहेत.

६. उत्तरदात्या ग्रामीण मातंग स्त्रियांच्या नागरीकत्वा विषयी अनूभव पाहिला तर मतदार करणाया स्त्रीयापैकी बहुसंख्य स्त्रीया कुटूंबातील पुरुष पती व मुलगा यांच्या सल्ल्यानेच मतदान करतात त्यामुळे मतदानाच्या हक्कापासून वंचित आहेत.

७. संघटनात्मक अनुभव पाहिला तर मातंग स्त्रीयांची स्वतंत्र अशी एक ही संघटना आढळून आली नाही.

८. नैतिक अनुभव गावातील सार्वजनिक मंदीरातून प्रवेश नाकारलेला आहे.

९. संपत्ती विषयक मातंग स्त्रीला मालकी हक्क नाही.

सर्वच पातळीवरील अनूभव पाहता आजही ग्रामीण मातंग स्त्री ही वर्जीत व वंचित समूह म्हणूनच जीवन जगतात आढळून येते.

**संदर्भ**

1. Caste & Race in India - Dr. G.S. Ghurye
2. Rural Society in India - Dr. A.R. Desai.
3. Social in inequality in India - Dr. K.L. Sharma
4. Village Caste & Education - Dr. Amita Baviskar

✧ ✧ ✧ ✧ ✧

# प्रख्यात समाजशास्त्रज्ञ, जैन धर्माचे अभ्यासक आणि सामाजिक इतिहासकार : प्रा. डॉ. विलास संगवे

प्रा. महेंद्रकुमार जाधव *

ज्येष्ठ आणि श्रेष्ठ संशोधक प्रा. डॉ. विलास आदिनाथ संगवे यांचा जन्म सोलापूर येथे २ जून १९२० रोजी एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. त्यांचे आईवडील प्राथमिक शिक्षक होते. सुसंस्कारमय वातावरणामध्ये त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी १९४१ साली एस.पी. कॉलेज पुणा तत्कालीन मुंबई विद्यापीठ अंतर्गत बी.ए. (ऑनर्स) ही पदवी संपादित केली. १९४४ साली एम.ए. ची पदवी मिळविली. पुढे १९५० साली थोर विचारवंत, ज्येष्ठ संशोधक, भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली 'जैन समुदाय' या विषयावर संशोधनात्मक प्रबंध सादर करून मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. ही पदवी संपादित केली.

ज्ञान देण्याचे पवित्र कार्य त्यांनी १९४७ ते ५६ या कालावधीमध्ये समाजशास्त्र विभागप्रमुख, कर्नाटक कॉलेज, धारवाड येथे केले. तसेच १९५६ ते ७५ या कालावधीमध्ये समाजशास्त्र विभाग प्रमुख, राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे कार्य. पुढे १९८० ते ८३ मान संचालक, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आदी ठिकाणचे त्यांचे शैक्षणिक योगदान विशेष उल्लेखनीय स्वरूपाचे दिसून येते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अंबादास माडगूळकर, डॉ. गुरुनाथ नाडगोंडे, डॉ. एम. जे. कशाळीकर, डॉ. एस. एन. पवार, डॉ. गोम्स (गोवा), डॉ. आशा सावर्डेकर (पणजी) आणि डॉ. राजेंद्र पाटील, जयसिंगपूर आदी सात विद्यार्थ्यांनी औपचारिकदृष्ट्या पीएच.डी. संपादन केली. अनौपचारिक पातळीवर अनेक विद्यार्थ्यांना एम.फिल. व पीएच.डी. या संशोधनाला मार्गदर्शन केले होते.

**ग्रंथसंपदा** – समाजशास्त्र, जैनधर्मशास्त्र आणि सामाजिक इतिहास या मूलभूत तीन प्रकारात त्यांनी पंच्याहत्तर संशोधन लेख व शंभर लेख लिहिले आहेत. त्यातील अनेक संशोधनपर लेख आंतरराष्ट्रीय नियतकालिकामधून प्रकाशित झालेले आहेत.

**समाजशास्त्रातील योगदान** – एक शास्त्र म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात व कर्नाटक राज्याच्या काही भागात समाजशास्त्र हा विषय विद्यार्थीप्रिय करण्यात डॉ. संगवे यांचे कार्य अतुलनीय स्वरूपाचे आहे. १९६६ ते १९७९ या कालखंडात त्यांनी समाजशास्त्र या विषयावरील पाच ग्रंथ मराठी भाषेतून लिहिले. प्रामुख्याने त्यामध्ये समाजशास्त्र, आदिवासीचे सामाजिक जीवन, समाजशास्त्र परिचय आणि भारतातील सामाजिक समस्या आदी ग्रंथांचा समावेश होतो. त्यातील भारतातील समाजशास्त्र या ग्रंथाचे कन्नड व गुजराती भाषेतून भाषांतरे झाली आहेत. सदर दर्जेदार ग्रंथांना महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांचे पुरस्कार मिळाले आहेत. क्रमिक ग्रंथाव्यतिरिक्त २० संशोधनपर लेख विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकामधून प्रकाशित झालेले आहेत. कोल्हपूर, इचलकरंजी प्रादेशिक नियोजन मंडळासाठी त्यांनी महाराष्ट्र शासनाला सामाजिक नियोजन विषयीचा एक अभ्यासपूर्ण अहवालदेखील १९७२ साली सादर केला होता. त्यांचे लिखाण म्हणजे समाजशास्त्राला मौलिक देणगीच होय.

**जैन धर्मावरील ग्रंथ** – १९५९ जैन कम्युनिटी ए सोशल सर्व्हे, १९७५ लाईफ अँड लिजसी ऑफ महावीर ए सोशल स्टडी. १९८१ द सिक्रेड श्रावणबाळेगोल ए सोशो-रिलीज स्टडी, १९९० ऑस्पेक्ट ऑफ जैन रिलीजन

* समाजशास्त्र विभागप्रमुख, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स् अॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर.

या ग्रंथांचे फ्रेंच भाषेत भाषांतर झाले आहे. १९९१ द जैन पाथ ऑफ अहिंसा, १९९२ जैन सोसायटी थ्रो द एजस् सदरच ग्रंथ १९९६ पासून अमेरिक व दुबईच्या इंटरनेटवर ठेवली आहेत. १९९७ जैन रिलीजन ॲण्ड कम्युनिटी हा ग्रंथ कॅलिफोर्निया व यू.एस.ए. मधून प्रकाशित केला आहे. १९९९ आस्पेक्ट ऑफ जैन रिलीजन हा ग्रंथ फ्रेंच भाषेत भाषांतर होऊन पॅरीस व फ्रान्समध्ये प्रकाशित झाले आहेत. २००१ फॅक्ट ऑफ जैनॉलॉजी आदी स्वरूपाचे दर्जेदार ग्रंथ त्यांनी इंग्रजी भाषेतून लिहिले आहेत.

मराठी भाषेतून जैन धर्मावरील लिहिलेली ग्रंथ संपदा पुढीलप्रमाणे आहेत. १९५२ जैन धर्माची रूपरेषा, १९५६ जैनांचा इतिहास, १९६३ भगवान महावीर, १९६९ वीर गीतांजली, १९७६ दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, १९८० एलाचार्य मुनिश्री विद्यानंद महाराज : जीवन व कार्य, १९८४ श्री क्षेत्र बाहुबली प्रकाशन : शोध व बोध, १९८७ सेठ हिराचंद नेमचंद दोशी : आद्य जैन पत्रकार आणि सुधारक, १९८८ समाजक्रांतीचे अग्रणी : अण्णासाहेब लठ्ठे, १९८९ जैन जागृतीचे जनक : हिराचंद नेमचंद, १९९१ जैन संस्कृती : परंपरा व प्रभाव, १९९४ जागतिक सर्व धर्म परिषद शिकागो : शताब्दी महोत्सव, १९९५ मोहनवीणा : कवीवर्य रणदिवे काव्यसंग्रह, १९९९ जैन जागरणके अग्रदूत : हिराचंद नेमचंद (हिंदी भाषांतर), २००० जैन साहित्य आणि संस्कृती, २००१ महावीरांची गोष्ट सचित्र रंगीत आवृत्ती २००१, राजर्षी छत्रपती शाहू महराज : कार्य व प्रभाव.

इंग्रजी भाषेतून संपादित खालील ७ ग्रंथातून जैन धर्मावर संशोधनपर प्रकरणे लिहिली आहेत. १९८१ होमेज टू श्रावणबेळगोळ, १९८१ गोटमेश्वरा कोमममेोरेशन व्हाल्यूम, १९८७ इनसायक्लोपिडिया ऑफ सोशल वर्क इन इंडिया, १९९७ आस्पेट ऑफ जैनोलॉजी, १९८८ विडो-हुड इन इंडिया, १९९० मेडीव्हल जैनीझम, षकलरचल अँड एन्वारयमेंट, १९९१ द असेंब्ली ऑफ लिसनर्स.

संगवे सरांनी जैन धर्मावरील पुढील ८ ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्या आहेत. ते ग्रंथ असे - गोमटेश गाथा, जैन फिलॉसॉफी, जैन सोशल लिडरर्स, गोमटेश थुडी, बारासअनुदेखा, मानवस्वामी, जैन रिलीजन ॲड लिटररी ट्रॅडीशन इन महाराष्ट्र, बायोग्राफी ऑफ सेठ माणिकचंद हिराचंद जवेरी इ. त्याचप्रमाणे त्यांनी तीर्थंकर, सन्मती, रत्नत्रय आदी नियतकालिकांच्या संपादक पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली होती. १९८५ साली केंब्रीज विद्यापीठाने जैन समाजविषयक पहिल्या चर्चासत्रामध्ये विशेषतज्ज्ञ म्हणून त्यांना निमंत्रित केले होते. १९८८ मध्ये पुणे येथे महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेच्या विद्यमाने आयोजित तिसऱ्या अखिल भारतीय मराठी जैन साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. २३ ऑक्टोबर १९९० साली जैन धर्मियांची पर्यावरणासंबंधी तर्कयुद्ध भूमिका प्रिन्स फिलीप यांच्या बकिंगहॅम पॅलेस लंडन येथे ठामपणे बीनचूक मांडली होती. तसेच जैन धर्म : एक पुरातन धर्म ह संशोधनपर लेख १९९३ मध्ये शिकागो येथे आयोजिलेल्या सर्व धर्म परिषदेमधून त्यांनी सादर केला होता. जैन धर्मावरील राज्याच्या व देशाच्या विविध विद्यापीठातून त्यांनी आपल्या ओघवत्या वक्तृत्व शैलीतून अनेक व्याख्याने दिली आहेत. डॉ. संगवे यांच्या संशोधन कार्यातील क्षेत्राचे महत्त्व जाणून, देशभूषण शिक्षण संस्था, कोल्हापूर या संस्थेने आचार्य विद्यानंद संस्कृती भावन, कोल्हापूर येथे डॉ. विलास संगवे संशोधन ग्रंथालय स्थापन करून, विविध विषयांवर संशोधन करणाऱ्यांची चांगली सोय केली आहे.

**सामाजिक इतिहासावरील लेखन -** 'राजर्षी शाहू छत्रपती पेपरर्स' या शीर्षकाच्या ग्रंथमालेतील ९ खंडांचे संपादन डॉ. संगवे यांनी केले आहे. यामध्ये २६५५ पृष्ठे असणाऱ्या दस्तऐवजांचा समावेश असून, ९ खंडांचे एकूण ५०८० पृष्ठे आहेत. सदरचे खंड १९७६ ते २००५ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी प्रकाशित केले आहेत.

**पारितोषिक आणि सन्मान** – संगवे म्हणजे संवेदनशील, सहनशील व साधे व्यक्तिमत्त्व. त्यांच्याशी बोलण्यातून व्यक्तीला त्यांच्या हृदयीचे निर्मळभाव व त्यांच्या पारदर्शक मुद्रेवर सहज उमटताना दिसतात. त्यांच्या बोलण्यातून जिव्हाळा, कळकळ आणि आंतरिक ओलावा जाणवायचा. मराठी, कन्नड, इंग्रजी विषयावरील प्रभुत्वामुळे अभ्यासपूर्ण दर्जेदार लेखनाद्वारे, व्याखानाद्वारे आपली एक आगळीवेगळी ओळख त्यांची होती. शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कार्याची दखल घेऊन अनेक संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन सन्मानाने गौरविलेले आहे. त्यांनी आपल्या वयाच्या ८६ व्या वर्षापर्यंत केलेल्या सेवाभावी वृत्तीच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना पुरस्कार मिळाले आहेत.

१९८९ बिहार शासन, पाटणा भगवान महावीर पुरस्कार
१९९० आचार्य कुद कुद पुरस्कार, सोलापूर
१९९४ अहिंसा इंटरनॅशनल अॅवॉर्ड, दिल्ली
१९९६ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१९९६ गोमटेश पुरस्कार, श्रावणबेळगोळ
१९९८ आचार्य विद्यानंद पुरस्कार, सांगली
१९९९ नागपूर विद्यापीठ, नागपूर
२००० पहिला शाहू ग्रंथ पुरस्कार, कोल्हापूर
२००० भगवान नेमिनाथ पुरस्कार, कोल्हापूर
२००१ कोल्हापूर भूषण पुरस्कार, कोमनपा कोल्हापूर
२००३ जनसेवा पुरस्कार, सांगली
२००६ डी.लिट. (डॉक्टर ऑफ लेटर्स) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

चिंतनशील, अभ्यासू व्यक्तिमत्त्व असणारे डॉ. विलास संगवे यांचे मंगळवार, दि. १ मार्च २०११ इ. रोजी पहाटे साडेचारच्या दरम्यान दु:खद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ९१ वर्षांचे होते. त्यांच्या दु:खद निधनाने समाजशास्त्र, जैन धर्माचे अभ्यासक आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याविषयी जाण आणि आस्था असणाऱ्या सर्वांनाच प्रचंड दु:ख झाले.

✧ ✧ ✧ ✧ ✧

# लेखांसाठी आवाहन

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा १३ वा विशेष अंक ऑगस्ट २०१२ या महिन्यात प्रकाशित होणार असून सर्व लेखकांना त्यांचे संशोधनपर लेख पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विशेष अंक 'लिंगभेद व स्त्रीभ्रूण हत्या' या संदर्भाने प्रकाशित होणार आहे. तरी विषयाशी संबंधीत तथा संशोधन पद्धतीचा अवलंब करून लिहिलेले लेख प्रकाशित केले जातील.**

**इतर तपशील परिषदेच्या www.msp-maha.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

# डॉ. अनुराधा भोईटे - काही आठवणी....

**डॉ. स्मिता अवचार ***

सातत्याने मदतीचा हात पुढे करणाऱ्या डॉ. अनुराधा भोईटे मॅडम व भोईटे सरांची व्यावसायिक जीवनाची सुरवात मराठवाड्यातील नामवंत शिक्षणसंस्था म.शि.प्र. मंडळाच्या शिवाजी महाविद्यालय, परभणी येथून झाली. तेथूनच हे दाम्पत्य तत्कालीन मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात रुजू झाले. त्याचवेळी आम्ही या विभागात एम.ए.चे शिक्षण घेण्यासाठी आलो. १९७९ मध्ये भोईटे सर पुणे विद्यापीठात रुजू झाले होते. जशी त्यावेळेस एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून सरांची ओळख होती तशीच मॅडमची देखील शिस्तप्रिय शिक्षक म्हणून ओळख होती.

१९८० च्या दशकात मराठवाडा विद्यापीठांतर्गत इतर विभागात एकदेखील महिला प्राध्यापक नव्हत्या. परंतु समाजशास्त्र विभागात डॉ. सुधाताई काळदाते व अनुराधा भोईटे मॅडम अशा दोन महिला प्राध्यापक आहेत याचे कौतुक व प्रसंगी आश्चर्य जसे इतरांना वाटत असे तसे आम्हालाही वाटत असे. त्यांचा हा आदर्शच पुढे आमच्या उभारणीत आम्हाला कामी आला.

भोईटे मॅडमचा विभागातील वावर विद्यार्थ्यांना धाक निर्माण करणारा असे. विद्यार्थ्यांचे गैरवर्तन त्यांना कधीच सहन झाले नाही. केवळ गैरवर्तनाची शंकाही आली तर त्या विद्यार्थ्याला हटकणारच. मॅडम विभागात असताना विद्यार्थी कधीही वर्गाच्या बाहेर दिसत नसे. एक प्रकारची अघोषीत संचारबंदीच जारी असे. परंतु त्याच वेळेस विद्यार्थ्यांना एखादा अडचणीचा प्रसंग आला तर प्रसंगी नियमाला बाजूला सारून मॅडम मदत करत असत.

समाजशास्त्र विषयाची एम.ए.ची विद्यार्थीनी म्हणून भोईटे मॅडमची लक्षात राहणारी प्रतिमा म्हणजे मराठवाड्यात अतिशय कमीप्रमाणात दिसणारा तांबुस गोरा रंग, राग आला किंवा उन्हातून चालत आल्या तर अधिकच लालबूंद होणारा चेहरा वर्गात महत्त्वाचे मुद्दे पुन्हा पुन्हा घोकून घेणाऱ्या आणि प्रत्येकाने ते मुद्दे लिहून घेतले आहेत की नाही याची खात्री करणाऱ्या मॅडम सतत लक्षात राहतात.

मॅडम पुणे विद्यापीठाच्या मुलींच्या वसतीगृहाच्या वार्डन तर होत्याच पण त्याचबरोबर पुणे विद्यापीठाच्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले. १९७८ मध्ये इंग्लंडमधील उच्च शिक्षणाच्या पाहणी करण्याकरीता ब्रिटीश कॉन्सिल फेलोशिप बरोबरच मेक्सिकन विद्यापीठ मेक्सिको येथे सांस्कृतिक देवाण-घेवाण कार्यक्रमांर्गत विद्यापीठ अनुदान आयोगकडून मिळालेली फेलोशिप, अमेरिकेतील पीटर्सबर्ग विद्यापीठात, थायलंड मधील महाचुला विद्यापीठात, कॅनडियन विद्यापीठात त्यांना व्याख्यानासाठी दिलेली विशेष फेलोशिप, १९८५ मध्ये फूलब्राईट व्हीजिटिंग प्रोफेसर म्हणून यु.एस.ए. येथे मिळालेले निमंत्रण या सगळ्या बाबी त्यांच्या ज्ञान व विस्तृत अभ्यासापोटीच त्यांना प्राप्त झाल्या.

डॉ. भोईटे मॅडम स्त्रीयांच्या सामाजिक प्रश्नांसंबंधी जागृत होत्या. त्यासंबंधीच्या अनेक पैलूंवर त्यांनी संशोधन केले. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे अनेक संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले. मॅडमनी केवळ विद्यार्थ्यांना शिकवलेच नाही तर त्यांच्यासाठी त्यांनी दर्जेदार लिखाणही मराठी व इंग्रजी भाषेतून केले. त्यांचे लेख राज्य, राष्ट्र आणि आतंरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशित झालेले आहेत. मॅडमचे अनेक विद्यार्थी एम.फिल, पीएच.डी. करून समाजशास्त्र विषयात स्वतःचे योगदान देत आहेत. त्यांच्या एमफीलच्या विद्यार्थ्यांपैकी मी एक त्यांची विद्यार्थीनी आहे.

* सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद.

भारतातील अनेक विद्यापीठाच्या सिनेट, विद्यापरिषद, अभ्यास मंडळे अशा विविध अधिकार मंडळावर त्यांनी काम पाहिले. भारतातील विविध विद्यापीठात व्हीजिटिंग प्रोफेसर म्हणून त्यांनी काम केले आहे. अनेक अधिवेशनात बीज भाषणे दिलीत. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्गिय समुदायाच्या आयोगावरही महाराष्ट्र शासनाने सदस्य म्हणून २००४ ते २०११ या काळासाठी त्यांना नियुक्त केले होते. मॅडमचे समाजशास्त्र विषयावरील अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. साधी स्पष्ट अशी वाचकांनुवर्ती भाषा हे त्यांच्या लिखाणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

२००९ मध्ये ऑल इंडिया सोशिऑलॉजीकल सोसायटीच्या कार्यकारीणीच्या सदस्य म्हणून मॅडम निवडून आल्या होत्या. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या मुखेड येथील अधिवेशनाच्या त्या अध्यक्ष होत्या.

वेंगुर्ला येथील अधिवेशनात त्या खास निमंत्रीत म्हणून उपस्थित राहिल्या होत्या. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनातील त्यांची ही उपस्थिती व त्यांचे मार्गदर्शन हे या अधिवेशनातील शेवटचेच ठरले.

नवीन भूमिकेबद्दल उत्साहाने बोलणाऱ्या मॅडम एका दिवशी उठल्यावर कोसळतात काय? आणि ३ महिने जीवन मृत्यूचा संघर्ष सुरू असताना स्वत: मात्र अलिप्तपणे जणू पाहत असाव्यात असेच वाटत होते.

इंग्रजीतील समाजशास्त्रीय ज्ञान मराठीत आणण्याची व्यक्त करणाऱ्या, समाजशास्त्रा संबंधी राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी आलेली असतानाच आणि लौकीक अर्थाने शारीरिक प्रकृती चांगली दिसत असतानाच डॉ. भोईटे मॅडम यांनी जगाचा घेतलेला निरोप सर्वांनाच रुखरुख लावून गेला.

✧ ✧ ✧ ✧ ✧

## आवाहन

**मराठी समाजशास्त्र पत्रिकेच्या प्रकाशनासाठी ज्यांना देणगी द्यावयाची असेल, त्यांनी 'सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद' या नावाने डिमांड ड्राफ्ट/चेक/अथवा रोखीने डॉ. दिलीप खैरनार, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा, समाजशास्त्र विभाग पदवी आणि पदव्युत्तर संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे जमा करावे. देणगीदारांची नावे पुढील अंकात छापण्यात येतील.**

**कार्यकारी संपादक,**
**म. स. प.**

# २१ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा वृत्तांत

- सचिव, म.स.प.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २१ वे अधिवेशन दि. ४ व ५ फेब्रुवारी २०११ रोजी शिवराज साहित्य, वाणिज्य आणि बी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथे यशस्वीपणे संपन्न झाले. या अधिवेशनात ४३९ प्रतिनिधी सहभागी झाले होते. 'ग्रामिण विकास व परीवर्तन' हा अधिवेशनाचा प्रमुख विषय होता. अधिवेशनाचे उद्‌घाटन मा.ना.श्री. हसन मुश्रीफ यांनी केले. बीज भाषणासाठी डॉ. के.एल. शर्मा कुलगुरु राजस्थान विद्यापीठ जयपूर यांना निमंत्रीत केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे हे होते. व्यासपीठावर डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. प्रल्हाद जोगदंड, डॉ. दादासाहेब मोटे, प्राचार्य एस.ए. जोडगुद्री, प्रा. सिद्धार्थ निसर्गंध यांची उपस्थिती होती.

उद्‌घाटनपर भाषणामध्ये मा.ना. हसन मुश्रीफ यांनी ग्रामिणविकास व परिवर्तनाच्या अनुषंगाने अधिवेशनात जे शोधनिबंध सादर होतील त्याची एक प्रत महाराष्ट्र शासनाला सादर करण्याची सूचना केली.

अधिवेशनाच्या बीजभाषण प्रसंगी डॉ. के.एल. शर्मा यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामिण विकासाचा सखोल आढावा घेऊन परिवर्तनाची दिशा स्पष्ट केली. ग्रामिण विकाससंबंधी केंद्र शासनाच्या विविध योजनांचाही ग्रामपरिवर्तनाच्या संदर्भात त्यांनी आढावा घेतला.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्रा. किसन कुराडे यांनी ग्रामीण भागाच्या, शेतीच्या, उद्योगांच्या समोरील विविध प्रश्न उपस्थित करून ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मराठी समाजशास्त्र परिषद समाज व शासनाला योग्य दिशा देण्याचे कार्य करू शकेल असा विश्वास व्यक्त केला.

अधिवेशनाचे पहिले सत्र ग्रामीण उद्योगातून रोजगार निर्मिती याविषयावर संपन्न झाले. या सत्रात १३ प्रतिनिधींनी सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केले. ग्रामीण उद्योगातून रोजगार निर्मितीच्या विविध संधी कशा उपलब्ध होऊ शकतात यावर सविस्तर चर्चा झाली.

दुसरे सत्र ग्रामीण विकासातील शासकीय योजनांची भूमिका या विषयाशी संबंधित होते. या सत्रात २५ प्रतिनिधींनी सहभागी होऊन शोधनिबंध सादर केले. ग्रामीण विकासासाठी १९५२ पासून विविध पंचवार्षिक योजनांमध्ये ज्या योजना आखण्यात आल्या त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून ग्रामीण भागाचे चित्र बदलत असल्याचे सर्व शोधनिबंधकर्त्यांच्या चर्चेतून जाणवले. कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासारख्या कृषीनिगडित प्रश्नांवरही चर्चा झाली. सदरील सत्रात शोधनिबंधांची संख्या अधिक असल्यामुळे ते दोन विभागात विभागले होते. सत्र अध्यक्ष म्हणून

डॉ. प्रल्हाद जोगदंड, मुंबई विद्यापीठ व डॉ. स्मीता अवचार, डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद हे होते.

तिसरे सत्र जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय शेती याविषयावर संपन्न झाले. यासत्राचे अध्यक्ष डॉ. सुशिला फुले, औरंगाबाद या होत्या. सदर सत्राअंतर्गत शेती आणि जोड व्यवसाय, निसर्ग आणि शेती, हरीत क्रांती, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील संधी, शेतकऱ्यांच्या जीवन शैलीत झालेले बदल, कर्ज बाजारीपणा, बी-बीयाणे खते यांचा तुटवडा या सारख्या विविध पैलूंवर चर्चा झाली. याच सत्रात प्रसिद्ध समाजवादी विचारवंत माजी खा. डॉ. बापूसाहेब काळदाते यांनी भारतीय ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने मोलाचे मार्गदर्शन केले.

४ थे सत्र 'ग्रामीण विकासातील सहकार क्षेत्राचा सहभाग' या विषयावर संपन्न झाले. सदर सत्रामध्ये २७ प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. सत्र अध्यक्ष म्हणून डॉ. जगन कराडे यांनी काम पाहिले. सहकार क्षेत्राचा ग्रामीण समाज जीवनावर पडत असलेला प्रभाव, सहकारातून आर्थिक उन्नती, सहकारामधून सामाजिक व रादकीय क्षेत्रात झालेली जागृती या सारख्या पैलूंवर सकारात्मक चर्चा झाली.

५ वे सत्र 'सीमा भागातील समाजिक व सांस्कृतिक समस्या' या विषयावर संपन्न झाले. या सत्रात २८ प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. सत्र अध्यक्ष म्हणून डॉ. सूर्यवंशी यांनी काम पाहिले. आदिवासींचे शिक्षण, रोजगार, खानपान, पायाभूत सुविधा, पर्यावरण अशा विविध पैलूंना अनुसरून चर्चा झाली. बेळगाव भागातील सीमावासींयांच्या विविध समस्यांचाही आढावा या सत्रात घेण्यात आला.

दि. ४ फेब्रवारीला म.स.प.ची आमसभा सायंकाळी ५.३० वा. पारीत झाली. यात म.स.प.चे वार्षिक ताळेबंद, पुढील वर्षासाठीची आर्थिक तरतूद, समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या अंकाचे वर्षातून २ वेळा प्रकाशन, निवडणूक प्रक्रीया इत्यादी विषयांवर चर्चा झाली. आमसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

दि. ५ फेब्रु. २०११ ला समाजशास्त्र परिषदेचा समारोप कार्यक्रम मा.ना. लक्ष्मणराव ढोबळे, पाणी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य व डॉ. बी.बी. मलिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय विद्यापीठ लखनौ यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. सुधाताई काळदाते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. परिषदेचे सर्व पदाधिकारी तसेच प्रा. अनिल कुराडे, प्रा. किसनराव कुराडे, श्री. अमृत बोरुडे इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते. समारोप कार्यक्रम प्रसंगी डॉ. मा.ना. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांनी परिषदेसाठी अर्थसाहाय्य म्हणून एक लाख रुपये, तर डॉ. सुधाताई काळदाते यांनी ५०,००० रुपयांची घोषणा केली आहे. प्रा. किसनराव कुराडे यांनीही संशोधन पत्रिकेची अंक छपाई व इतर कामांसाठी रु. १ लाख अर्थ साहाय्य देण्याचे मान्य केले. प्रा. अनिल कुराडे यांनी आभार मानून परिषदेची सांगता झाली.

**- डॉ. दादासाहेब मोटे**
सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद

✧ ✧ ✧ ✧ ✧

## समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (नियतकालिकांच्या नोंदणीविषयी नियम ८ प्रमाणे)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मराठी समाजशास्त्र परिषद<br>द्वारा - समाजशास्त्र विभाग,<br>पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र<br>देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद |
| २) | नियतकाल | : | वार्षिक<br>ISSN 2230 - 7745 |
| ३) | मुद्रकाचे नाव | : | डॉ. दादासाहेब मोटे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | मत्सोदरी कला व वाणिज्य महाविद्यालय, जालना. |
| ४) | मुद्रण स्थळ | : | राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद |
| ५) | प्रकाशकाचे नाव | : | डॉ. दिलीप खैरनार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | देवगिरी महाविद्यालय, पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद |
| ६) | संपादकांचे नाव | : | डॉ. दिलीप खैरनार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | कॉलम क्र. ५ प्रमाणे |
| ७) | मालकाचे नाव | : | मराठी समाजशास्त्र परिषद |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

मी. डॉ. दिलीप खैरनार असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. दिलीप खैरनार
प्रकाशक व संपादक

# - लेखकांना सूचना -

१) समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा वार्षिक अंक दरवर्षी डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध होईल. या अंकासाठी लेखन साहित्य त्या-त्या वर्षीच्या ३० ऑक्टोबरपूर्वी पाठविता येईल. या पुढील आलेल्या लेखांचा विचार करता येणार नाही. लेखनसाहित्य पाठविताना लेखकांनी आपला आजीव सदस्य क्रमांक कळविणे अनिवार्य आहे.

२) संशोधन पत्रिकेत समाजशास्त्र विषयाशी संबंधित मराठी भाषेतीलच लेख प्रसिद्ध करण्यात येतील. पत्रिकेसाठी पाठविलेला लेख इतरत्र कोठेही प्रसिद्ध झालेला किंवा प्रसिद्धीसाठी पाठविलेला नसावा.

३) अन्य भाषांमधील उत्कृष्ट लेखांचे अनुवाद मूळ लेखकांच्या अनुमतीसह संपादक मंडळाकडे पाठवावयास हवे.

४) प्रसिद्धीसाठी पाठवावयाचे लेख शक्यतो संगणकीय अक्षरजुळणी करून ई-मेलद्वारा पाठवावे. तसेच वापरलेला फॉन्ट व सॉफ्टवेअरचा तपशीलही कळवावा. संगणकीय लेखाची मुद्रीत प्रत व सीडी स्वतंत्र टपालाने पाठवावी. लेखासोबत स्वत:विषयी संक्षिप्त माहिती, मोबाईल नंबर, ई-मेल इ. वेगळ्या कागदावर पाठवावे.

५) प्रकाशनासाठी पाठविलेले संशोधनात्मक लेख विशेष करून संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक असावेत. आढाव्यात्मक नसावे व लेखाची कमाल शब्दमर्यादा ५००० शब्दापर्यंत असावी. लेखाचा थोडक्यात गोषवारा सोबत जोडावा.

६) लेखामध्ये तक्ते व आकृत्या मर्यादित असाव्यात.

७) लेखातील टीपा लेखाच्या अखेरीस द्याव्यात. संदर्भ ग्रंथांची यादी, लेखकाचे आडनाव, प्रकाशन वर्ष, ग्रंथाचे शीर्षक, प्रकाशकाचे नाव व संदर्भाचा पृष्ठ क्रमांक देण्यात यावा. एखाद्या लेखाचा संदर्भ द्यावयाचा असल्यास लेखकाचे आडनाव, प्रकाशनाचे वर्ष, लेखाचे शीर्षक (अवतरण चिन्हात), संपादकाचे नाव, प्रकाशकाचे नाव तसेच नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला असल्यास लेखाच्या शीर्षकानंतर नियतकालिकाचे नाव, प्रकाशनाचा सप्ताह, महिना, वर्ष, संदर्भ पृष्ठ क्र. या पद्धतीने असावेत.

८) विस्तृत परीक्षणासाठी तज्ज्ञांना संपादकामार्फत प्रत पाठविली जाईल. त्यासाठी संपादकीय पत्त्यावर परिक्षणार्थ ग्रंथाच्या दोन प्रती लेखकाने किंवा प्रकाशकाने पाठविणे आवश्यक.

९) परीक्षणात्मक लेखाची मर्यादा १००० ते १५०० इतकी असावी.

१०) समाजशास्त्र संशोधन पत्रिकेतील लेखाच्या प्रकाशनाबाबत संपादक मंडळाचा निर्णय अखेरचा राहील.

डॉ. दिलीप खैरनार यांनी मराठी समाजशास्त्र परिषद या संस्थेकरिता हे वार्षिक राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद येथे छापून मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा : समाजशास्त्र विभाग, पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथून प्रसिद्ध केले.